आपण सावध असलें पाहिजे ही गोष्ट **रिचर्डाच्या** मनांत बिंबली.

पुढल्या वर्षी, म्हणजे १३८९त, मी आतां तेवीस वर्षांचा झालों, ह्यास्तव मी ह्यापुढें जातीनें सारा राज्यकारभार करणार, असें **रिचर्डानें** अकस्मात् एके दिवशीं कौन्सिलांत कळविलें, त्यानें ते सर्व लार्ड्स चकित झाले. त्यानें **आरन्डेलचा अर्ल** ह्याला राज्याचा मोर्तब (शिक्का) आपल्या हवालीं करण्यास सांगितलें; आणि त्याची ती धिटाई आणि तो वाजवी हक्क ह्यांनीं दचकून, ते लार्ड्स त्याच्या सर्व गोष्टींस मान्य झाले; आणि त्यानें राज्यकारभारसंबंधी हरएक गोष्ट खुद्द आपल्या हातीं घेतली.

रिचर्ड राज्यकारभार आपल्या हातीं घेतो, १३८९.

पुढें आठ वर्षेंपर्यंत त्यानें राज्यकारभार फार शाहणपणानें आणि चांगल्या प्रकारें केला. त्यानें नवीन चांगले कायदे केले. **प्रेम्यूनायरचा** जो दुसरा कायदा केला तो ह्याच काळांत. त्या कायद्यानें, जीं कोणी माणसें **इंग्लंडांत पोपाचीं** धर्मबहिष्काररूप शासन करण्याविषयीं आज्ञापत्रें किंवा ठराव अमलांत आणतील, तीं कैदेच्या शिक्षेस पात्र होऊन आपल्या मालमत्तेला मुकतील, असा ठराव झाला. पुढें पाहण्यांत येईल कीं, ह्या कायद्यापासून **आठव्या हेन्रीच्या** कारकीर्दीत मोठीं महत्वाचीं कार्यें झालीं. नंतर **रिचर्ड आयर्लंडास** गेला. तेथें तो लोकांशीं ममतेनें वागला. त्याच्या दोस्तांचा ज्यांनीं प्राण घेतला होता त्यांविषयीं त्यानें कोणत्याही प्रकारचा वैरभाव दाखविला नाहीं. परंतु ती गोष्ट तो विसरला नव्हता. **बोहिमियाची आन** ह्या नांवाची त्याची बायको १३९४ त वारली, आणि **फ्रान्सं**

दुसरा प्रेम्युनायरचा कायदा, १३९३.

रिचर्ड फ्रान्स देशाशीं कांहीं मुदतीचा सल्ला करतो, १३९६.

देशाशीं पंचवीस वर्षांच्या मुदतीचा तह करण्याचें त्याच्या मनांत होतें, त्याची तजवीज लागावी म्हणून, त्यानें १३९६ त फ्रान्सच्या राजाची उमरीनें फक्त आठ वर्षांची लहानशी कन्या होती, तिच्याशीं लग्न केलें.

आतां त्याचे हात मोकळे झाले, आणि इतक्या वर्षांचें चाललेलें युद्ध बंद केलें म्हणून जेव्हां थोर थोर लार्ड्स (बडे लोक) रागावले, आणि त्याच्या विरुद्ध फंदफितूर करूं लागले, तेव्हां त्यानें आपला सूड उगविला. **ग्लास्टर, वारिक,** आणि **आरन्डेल,** ह्या तिघां लार्डांना थोड्या तासांत पकडून कैदकेलें. **ग्लास्टरला काले** एथें पाठविलें, आणि एका पंधरवड्यांत खबर आली कीं तो तेथें वारला. **आरन्डेल** ह्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्याची **पार्लमेंटा**समोर चौकशी होऊन त्याचा शिरच्छेद केला, आणि **वारिका**ला जन्मभर कैदेंत टाकलें. नंतर **पार्लमेंटा**ला पुढारी म्हणून कोणी राहिले नाहींत.

रिचर्डानें घेतलेला सूड, १३९७.

त्यामुळें राजानें जें जें मागितलें तें सारें त्यानें दिलें, त्याला जन्मभर काईम उत्पन्न करून देण्याचें वचन दिलें, आणि आपल्याकडे (पार्लमेंटाकडे) पाठविलेल्या अर्जांचें अधिकारबलानें निरसन करण्यासाठीं, त्याला, त्याच्या दोस्तांची एक तात्पुरची कमिटी (मंडळी) नेमण्याला परवानगी दिली. सारांश **रिचर्डानें** आपल्याला स्वतंत्र किंवा अनिर्बंध राजा करून घेतलें, परंतु तेंच त्याच्या अपकर्षाला कारण झालें. त्या वेळेपासून त्याच्या उच्छृंखळपट्टीला, किंवा त्याच्या बळावलेल्या इच्छेला, अटक म्हणून कसली ती राहिली नाहीं, आणि त्यानें करांनीं लोकांस जेर करण्यास,

रिचर्ड हा स्वतंत्र राजा होतो.

आणि न्यायाच्या कोडतांत ढवळाढवळ करण्यास आरंभ केला. जेव्हां त्याचें करणें रास्त असे, उदाहरणार्थ जमीनदारांच्या विरुद्ध मजूरांचें त्यानें रक्षण केलें, किंवा त्यानें लॉर्डस लोकांचा छळ करण्याची मनाई केली, तेव्हां देखील लोक त्याचा द्वेष करूं लागले. त्याचें कारण, त्या रास्त गोष्टी त्यानें आपल्या इच्छेनें केल्या, आणि मला आवडेल तसें मी करणार, ही दांडगाई लोकांना जाणवे अशी त्यानें केली.

दरम्यानच्या वेळांत, "लार्ड्स अप्पेलंट" म्हणविणारे जे बडे लोक होते त्यांपैकीं, आतां नार्फकचा ड्यूक झालेला नाटिंग्हम, आणि आतां हेरिफोर्डचा अर्ल झालेला हेन्री बालिंग्ब्रोक, हे दोघे अद्यापि इंग्लंडांत राहिले होते. हेन्री बालिंग्ब्रोक हा, गांटच्या जानाचा मुलगा, आणि रिचर्डचा चुलतभाऊ होता. ते दोघे राजाशीं मित्रभावानें होते. परंतु राजाला त्यांपासून मी निर्भय आहें असें वाटेना. म्हणून, त्या उभयतांच्या दरम्यान १३९८ त कांहीं तंटा उपस्थित झाला, ती संधि साधून राजानें त्या दोघांनाही देशपार केलें. नार्फकला जन्मभर, आणि हेन्रीला सहा वर्षें. हें कृत्य अतिशय अन्यायाचें होतें, आणि हेन्रीवर लोकांचें प्रेम होतें त्यामुळें त्या कृत्यानें त्यांना फार राग आला. परंतु रिचर्ड आपली सत्ता वाढविणें ह्या गोष्टीखेरीज इतर सर्व गोष्टींविषयीं अगदीं अंध झालेला होता. पुढल्या वर्षी जेव्हां गांटचा जान मरण पावला, तेव्हां त्याची सारी वतनवाडी, हक्कानें हेन्रीची असतां, रिचर्डानें जबरीनें जप्त केली. नंतर, आपले सारे शत्रु

हेरिफोर्डचा अर्ल, हेन्री, ह्याला देशपार करण्याची सजा होते, १३९८.

झाडून घालवून **इंग्लंड** साफ केलें असें त्याला वाटून, तो १३९९ च्या मे महिन्यांत पुनः **आयर्लंडांत** गेला.

मी सर्वथा निर्भय झालों असें त्याला वाटूं लागतें तोंच त्याच्या ऐश्वर्याचा चुराडा झाला. **हेन्री** हा आतां **लांकास्टरचा ड्यूक** झालेला होता, तो आपली वतनवाडी हक्कानें मागून घेण्याकरितां

रिचर्डाचा अपकर्ष, १३९९.

यार्कशायरमध्यें येऊन जमिनीवर उतरला. तो **इंग्लंडांत** येऊन दाखल झाला हें वर्तमान कळतांक्षणींच **नार्थबर्लंडाहून** **धि पर्सीझ** (पर्सी ह्या उपनांवाच्या घराण्यांतील पुरुष), **वेस्टमर्लंडाहून अर्ल नेव्हिल,** आणि **रिचर्डानें** आपला चुलता **यार्कचा ड्यूक** ह्याला आपला प्रतिनिधि करून मागें ठेवलें होतें तो देखील, हे सारे त्या **हेन्री**भोंवतीं येऊन जमले. **रिचर्ड** हा जुलुमी असा प्रत्ययास आला म्हणून, सारें **इंग्लंड** त्याच्या विरुद्ध उठलें. पुढें एका पंध्रवड्यानें तो परत येऊन **वेल्सांत** जमिनीवर उतरला, आणि पाहतो तों, आपलें राज्य गमावलें असें त्याला समजून आलें. **रिचर्डासारखाच, हेन्री** हा **तिसऱ्या एड्वर्डाचा** नातू होता, आणि तसेंच मातृपक्षाकडून **तिसऱ्या हेन्री**पर्यंत त्याचें नातें जाऊन भिडत होतें (१४२ व्या पृष्ठावरील वंशावळ पहा). **मार्चचा अर्ल** हा **क्लारेन्सच्या ड्यूकाचा** पणतू होता. तो वास्तविक गादीला अति जवळचा वारस होता, खरा (२०९ वें पृ. पहा), परंतु तो फक्त सहा वर्षांचा बालक होता. सारें राष्ट्र **रिचर्डाला** कंटाळलें होतें म्हणून, **हेन्री** आपणावर अमल करावयास आलेला पाहून त्या राष्ट्रानें त्याचें अभिनंदन केलें.

नार्थबर्लंडच्या अर्लाच्या विश्वासघातानें **रिचर्ड, वेल्स** देशांतील **फ्लिंट** नांवाच्या किल्ल्यांत, **हेन्रीच्या** हातीं सांपडला. त्याला

टौअर(लंडनचा किल्ला)मध्यें पाठविलें, आणि त्यानें, १३९९ त, सेप्टेंबरच्या २९ व्या तारिखेस, गादीविषयीं लेखी राजीनाम्यावर सही केली. दुसऱ्या दिवशीं पार्लमेंटानें हेन्रीला राजा केलें म्हणून ठराव करून तो जाहीर केला. पुढें एका वर्षानें, रिचर्डाला पुनः गादीवर बसविण्याकरितां बंड उठलें तेव्हां, तो मरण पावला असें म्हणूं लागले, आणि त्याचें प्रेतही लोकांस दाखविलें. परंतु, गुप्त रीतीनें त्याचा वध केला असावा असा जरी अतिशय संभव दिसतो, तरी त्याला मृत्यु कसा आला हें खरोखर कोणासही आजपर्यंत माहीत नाहीं. असो, ह्या प्रकारें राज्य लांकास्टरच्या घराण्यांत गेलें. परंतु हेन्री आणि त्याचे वंशज ह्यांकडे गादी, पार्लमेंटानें हेन्रीला पसंत केल्यामुळें आली, आणि त्या वेळीं अतिशय जवळचा वारस म्हटला म्हणजे क्लारेन्सच्या घराण्यापैकीं होता, ही गोष्ट नेहमी स्मरणांत ठेवली पाहिजे; कारण, ज्या कलहापासून पुढें परिणामीं "वार्स आफ् धि रोझिझ," म्हणजे गुलाबांचीं युद्धें म्हणून ज्यांना म्हणतात, तीं उद्भवलीं तो कलह त्या गोष्टीपासून उत्पन्न झाला.

रिचर्ड नाहींसा होतो.

धि ग्रेटचार्टर ह्यानें (मोठ्या सनदेनें) इंग्लिश लोकांच्या स्वातंत्र्याचा पाया घातला तेव्हांपासून आम्हीं जवळ जवळ दोनशें वर्षांइतका काळ ओलांडून आलों. त्या काळांत ज्या मुख्य गोष्टी घडलेल्या आम्हीं पाहिल्या त्या येणेंप्रमाणें. पार्लमेंटाचा उदय झाला. त्यांत देशांतील साधारण लोकांनीं निवडलेले सभासद घेऊं लागले. पार्लमेंटानें करांवरची हुकमत आपल्याकडे घेतली. राजाला द्रव्याची पुरवणी करण्यापूर्वी लोकांना जाच असतील ते दूर करण्याचा उपाय राजानें केलाच पाहिजे,

१२१६ पासून, १३९९ पर्यंतच्या इतिहासाचा गोषवारा.

आणि राजाच्या प्रधानांनीं आपल्या कृत्यांबद्दल आम्हांला जबाब किंवा हिशेब दिलाच पाहिजे, असा पार्लमेंटानें आग्रह धरला. शिवाय, लार्ड्स आणि कामन्स हीं दोन हौसिझ (सभा) वेगळालीं बसूं लागलीं, परंतु तीं एकमेकाचा सल्ला घेऊन एकत्र काम करूं लागलीं, आणि प्रजेच्या अनुमतावांचून स्वच्छंद वागूं लागल्यामुळें दोघां राजांस राज्याधिकारावरून काढून एकीकडे ठेवलें, ह्या गोष्टीही आम्हीं पाहिल्या. ह्या दोघां राजांच्या प्रकरणांत थोर थोर बडे लोकांनींच अग्रेसर होऊन मार्ग काढला; कारण, अजून, जानाच्या दिवसांतल्याप्रमाणेंच, राजा जेव्हां गयाळ, दुबळा, किंवा कोणालाही न जुमानतां यथेच्छ वागणारा, असे तेव्हां, राज्यांत अमल बडे लोकच करीत. ह्याच दोनशें वर्षांच्या काळांत आम्हीं घडलेल्या गोष्टी आणखी पाहिल्या त्या येणेंप्रमाणें. वेल्स देश इंग्लंडाला जोडला. स्काट्लंडानें स्वातंत्र्य आणि वेगळें राजांचें घराणें मिळविलें. जानानें आपणाला पोपाचा बंदा म्हणून तिसरा इन्नोसेन्ट ह्या नांवाच्या पोपापासून आपलें राज्य भिक्षेदाखल घेतलें त्या वेळेपासून पोप इंग्लंडांतून जबर जबर द्रव्याच्या देणग्या उकळीत असे, त्या देणग्यांपासून इंग्लंडानें आपल्याला हळू हळू मुक्त करून घेतलें. फ्लांडर्स देशाशीं चाललेल्या लोंकरीच्या मोठ्या उदीमापासून, व्यापार फैलावत चालला, आणि प्राचीन राजे त्रासदायक जकाती पट्ट्या वगैरे बसवीत, त्या न देतां व्यापार करण्याचे हक्क शहरांनीं हळू हळू मिळविले, त्यांपासून व्यापाराचा फायदा झाला. लोकांच्या संघांच्या उदयाची पहिली सुरवात झाली; बंदेलोक बंदेगिरीपासून आपली सुटका कशी हळू हळू करून घेऊं लागले, आणि बारेकरी आंगमेहनतीबद्दल धन्याला धारा कसे देऊं लागले; आणि मनु-

ह्यांना अंतःकरणस्वातंत्र्य आहे अशा **वुइक्लिफाच्या** उपदेशानें, आणि त्यानें **बायबलाचें** (ख्रिस्तीधर्मपुस्तकाचें) भाषांतर केलें त्याच्या योगें, माणसांना आपलें आपण वाचून आपला आपण निर्णय करण्याची मुभा मिळून, **रेफर्मेशनचीं** (धर्मसुधारणेचीं) पहिलीं बीजें कशीं पेरलीं गेलीं; ह्या सर्व गोष्टीही आम्हीं पाहिल्या. **वुइक्लिफ** हा स्वतः, **लंडनच्या बिशपाशीं** फार दिवस झगडून, शेवटीं **लट्टरवर्थ** एथील आपल्या **पारिशाला** (वृत्तीच्या प्रदेशाला) निघून गेला, आणि तेथें १३८४ त मरण पावला. तथापि त्याचे अनुयायी **लॉल्लर्ड्स** ह्यांची हकीकत ह्या संपलेल्या कारकीर्दीच्या पुढील कारकीर्दीत ऐकण्यांत येईल.

शेवटीं, **रिचर्डानें फ्रान्स** देशाशीं केलेला मुदतीचा तह त्याच्या मृत्यूबरोबरच संपला, त्यामुळें **फ्रान्स** देशाशीं युद्धांत गर्क झालेलें, आणि **हेन्री** हा उजू वारस नसतां त्यानें गादी बळकावली त्यापासून उत्पन्न झालेल्या झगड्यांत पडण्याच्या लागांत आलेलें, अशा स्थितींत **इंग्लंडास** तूर्त सोडून आपण पुढें जाऊं. परदेशाशीं चाललेल्या त्या युद्धांत, आणि स्वदेशीं उत्पन्न झालेल्या ह्या झगड्यांत, इतक्या पुष्कळ थोर थोर घराण्यांचा संहार उडाला कीं, जेव्हां तें युद्ध आणि तो झगडा संपला तेव्हां, राजा आणि सामान्य प्रतीचे लोक ह्यांच्या दरम्यान थोर थोर बडे लोकांचा जसा एक अटक करणारा सरहद्दीचा तट पूर्वी होता, तसा तट पुढें उरला नाहीं.

भाग ४.

लांकास्टर आणि यार्क हीं दोन घराणीं वार्स आफ् धि रोझिझ

लांकास्टर आणि यार्क ह्या दोहों घराण्यांतले राजे

तिसरा एड्वर्ड.

- एड्वर्ड, धि ब्लाक प्रिन्स.
  - **दुसरा रिचर्ड**, का. १३७७–१३९९.
- लायोनेल, क्लारेन्सचा ड्यूक.
  - फिलिप्पा ही एड्मंडमार्टिमर, मार्चचा अर्ल, ह्याची बायको.
- गांटचा जान, लांकास्टरचा ड्यूक, ह्याच्या तीन बायका.
  - १ लांकास्टरची ब्लान्श.
    - **चौथा हेन्री**, ज. १३६६, मृ. १४१३, का. १३९९–१४१३, वा. { मेरी डी बोहून, नव्हारची जोन.
      - **पांचवा हेन्री**, ज. १३८८, मृ. १४२२, का. १४१३–१४२२, वा. फ्रान्सची काथरिन.
  - २ कास्टिलची कान्स्टन्स.
  - ३ काथरिन स्विन्फर्ड.
    - हेन्री, कार्डिनल बोफर्ट.
    - जान बोफर्ट, समर्सेटचा अर्ल.
      - जान, समर्सेटचा ड्यूक.
    - टामस, एक्झीटरचा ड्यूक.
- एड्मंड, यार्कचा ड्यूक.
- टामस, ग्लास्टरचा ड्यूक.
  - आन.
    - हम्फ्रि, बकिंगहमचा ड्यूक.
      - हम्फ्रि, स्टाफर्डचा अर्ल.

राजर मार्टिमर,
मार्चचा अर्ल.

सहावा हेन्री,
ज. १४२२, मृ. १४७१.
का. १४२२–१४६१,
वा. आन्जूची मार्गरेट
(पदच्युत झाला).

मार्गरेट बोफर्ट, ही
सातव्या हेन्रीची आई.
हा ट्यूडर घराण्यांतील
पहिला राजा.

एड्मंड
मार्टिमर, मार्चचा अर्ल.
मृ. १४२४.

आन मार्टिमर . . . . . . हिचा पति . . . . . . रिचर्ड, केंब्रिजचा अर्ल.

रिचर्ड, यार्कचा ड्यूक.

चौथा एड्वर्ड,
ज. १४६१, मृ. १४८३,
का. १४६१–१४८३,
वा. एलिझाबेथ वूड्व्हिल्.

जार्ज, क्लारेन्सचा ड्यूक.

एड्वर्ड,
वारिकचा अर्ल.

तिसरा रिचर्ड,
ज. १४५०, मृ. १४८५,
का. १४८३–१४८५,
वा. आन नेव्हिल्.

एलिझाबेथ, ही
सातव्या हेन्रीची
बायको.

पांचवा एड्वर्ड,
ज, १४७०, मृ. १४८३?
का. एप्रिलपासून जूनपर्यंत १४८३.

रिचर्ड,
यार्कचा ड्यूक.

हेन्री,
बकिंगहमचा
ड्यूक, ह्याचा
शिरच्छेद
केला,
१४८३.

प्रकरण ११.

लांकास्टरचें घराणें

चौथा हेन्री, १३९९–१४१३.
|
पांचवा हेन्री, १४१३–१४२२.
|
सहावा हेन्री, १४२२–१४६१.

आपण आतां १४०० ह्या सालापर्यंत येऊन पोहोंचलों. त्या सालांत आमच्या इतिहासांतील अत्यंत अव्यवस्थेच्या कालांपैकीं एका कालाचा आरंभ होतो. पुढील ऐशींवर्षांत एकाही राजानें कलह न होतां गादीचा उपभोग केला नाहीं. नेहमी, राजपदावर एक पुरुष असतां त्यावर वारसा सांगणारा दुसरा कोणीतरी एक असायाचाच अशी स्थिति होती. तीपासून अनंत झगडे, आणि यादव्या किंवा आपआपसांतील युद्धें, उत्पन्न झालीं. त्यांत बहुतेक प्राचीन घराण्यांचा सत्यनाश झाला.

ऐशीं वर्षेपर्यंत गादीवरील वारशाच्या संबंधानें झालेला घोंटाळा.

चौथ्या हेन्रीला आधींच दोघे प्रतिस्पर्धी होते, ते हे. (१) **दुसरा रिचर्ड**, हा **यार्कशायरां**तील **पान्टिफ्राक्ट** नांवाच्या किल्ल्यांत कैदी होता; आणि (२) वयानें अगदीं लहान असा **हेन्री**चा कझन, म्हणजे त्याच्या चुलतबहिणीचा नातू, **एड्मंड मार्टिमर, मार्चचा अर्ल.** त्या **एड्मंडा**चें त्याच्या धाकट्या भावासंगतीं **वुइन्ड्झर कास्टल**मध्यें (**वुइन्ड्झर** नांवाच्या तटबंदीवाड्यामध्यें) पालनपोषण होऊन विद्याभ्यास चालला होता. तीन महिने लोटले नाहींत तों, १४०० त जान्युअरीच्या ३ ऱ्या तारिखेस, **केंट, हंटिंग्डन** आणि **साल्झ्बरी**, ह्यांचे **अर्ल**, **लार्ड डेस्पेन्सेर** ह्याच्या सह, मिळून

हेन्रीच्या विरुद्ध बंडें, १४०० पासून १४०५ पर्यंत.

चौघांनीं रिचर्डाला पुनः गादीवर बसविण्यासाठीं संगनमत करून गुप्त मसलत केली. परंतु ती मसलत विश्वासघातानें फुटली. आणि त्या सर्वांना देहांत शासन केलें. ह्या मसलतीच्या कारणानें रिचर्डाला मरण लवकर आलें, किंवा तो स्वाभाविक मरणानें मेला, ही गोष्ट आम्हांला तहकीक म्हणून हजार वांख्यांनीं कधींच कळणार नाहीं. पुढें कांहीं आठवड्यांनीं तो मरण पावला इतकेंच लोकांस विदित केलें, आणि लोकांस त्याचें प्रेतही दाखविलें; परंतु तें दाखविलेलें प्रेत खरोखर त्याचेंच होतें कीं काय, ह्याविषयीं पुष्कळांना अजून संशयच होता. नंतर लूएलिनाचा वंशज, आणि दुसऱ्या रिचर्डाचा विश्वासू खासबरदार असा एक ओएन ग्लेन्डूर नांवाचा वेल्स देशांतील राजा होता,

ओएन ग्लेन्डूर हा बंड करतो, १४००.

त्यानें वेल्स देशांत बंड केलें, आणि त्या देशाच्या सर्व भागांतून वेल्श लोक त्याला कुमक करण्याला जमले. तेव्हां हेन्री राजानें त्यावर कित्येक स्वाऱ्या केल्या, आणि आपला तरुण मुलगा प्रिन्स आफ् वेल्स ह्याला, मोठी फौज बरोबर देऊन, त्यावर पाठविलें. परंतु ग्लेन्डूर हा नेहमी डोंगरांत पळून जाऊन, आपल्या बदली, त्या देशांतल्या कहारी थंडीच्या हवेशीं शत्रूंना झुंजत ठेवी. इंग्लिश निघून गेले कीं तो लागलाच परत येई, आणि वास्तविक त्या देशावर अमल तो करी.

दरम्यानच्या वेळांत, पर्सिझ, म्हणजे नार्थंबर्लंडचा अर्ल आणि त्याचा समशेरबहादर पुत्र हेन्री हाट्स्पर हे दोघे, पूर्वी हेन्रीला गादीवर बसविण्याच्या कामीं सहाय होतेच, त्यांनीं स्काटांपासून इंग्लंडच्या उत्तरेकडील मुलुखाचें रक्षण करण्याचें काम चालविलें होतें. टाइन नदीच्या कांठीं हॉमिल्डन हिल

(हॅमिल्डन नांवाची टेंकडी) एथील लढाईंत त्या दोघां पर्सिझनीं स्काच फौजेचा पराजय करून, पुष्कळ महत्वाचे लोक धरून कैदकेले. त्या लोकांना सोडविण्यासाठीं आपणांला मोठमोठ्या खंडण्या मिळतील अशी ते पर्सिझ आशा करून होते. परंतु ते कैदकेलेले लोक आपल्या हवालीं करावे असें हेन्रीनें हक्कानें मागणें केलें असावें असें दिसतें. शिवाय हेन्रीनें हाट्स्परचा मेहुणा, एड्मंड मार्टिमर, ह्याला वेल्स देशांत कैदेंत राहूं दिल्यानें, त्या पर्सिझना राग आला. तेव्हां ह्या गोष्टीवरून राजा आपण केलेले उपकार स्मरत नाहीं असें त्यांस वाटून चिडून, ते अभिमानी पर्सिझ त्याच्यावर उलटून, ग्लेन्डूरला जाऊन मिळाले.

हॅमिल्डन हिल्ल एथील लढाई, १४०२.

इतक्यांत रिचर्ड अजून स्काट्लंडांत जीवंत आहे, असा हाकाटा उठला. तशांत फ्रेंचांनीं बंडवाल्यांना कुमक करण्यासाठीं वेल्स देशांत फौज पाठविली. तेव्हां हेन्रीला पुन: आपल्या गादीचें रक्षण करणें प्राप्त पडलें. पुढें श्रूस्बरी एथील विख्यात लढाईंत तो, आणि त्याचे दोघे तरुण पुत्र, हेन्री, प्रिन्स आफ् वेल्स, आणि जान, बेड्फर्डचा ड्यूक, ह्या तिघांनीं मिळून, बंडवाल्यांचा पराजय केला. हारि हाट्स्पर ठार मारला गेला, आणि पुष्कळ बडे लोक धरून त्यांना देहांत शासनें केलीं.

ग्लेन्डूर आणि पर्सिझ ह्यांचें मिळून बंड, १४०३.

श्रूस्बरीएथील लढाई, तारीख २१ जूलई १४०३.

तथापि अजून नार्थंबर्लंडचा वृद्ध अर्ल पर्सी राहिलाच होता; आणि १४०५ ह्या वर्षीं, त्या हतभाग्य हेन्रीनें, लेडी डेस्पेन्सेर (डेस्पेन्सेर उपनांवाची बाई) हिनें वुइन्ड्झरहून पळवून

नेलेल्या अल्पवयस्क **मार्चच्या अर्लाला**, पुनः नुकतेंच पकडून हस्तगत केलें होतें, तों उत्तरेकडे नवें बंड उठलें असें त्यानें ऐकलें. तेव्हां राजाच्या सैन्यानें पुनः त्या बंडवाल्यांना गांठलें, आणि त्यांची दाणादाण करून त्यांना उधळून दिलें. ह्या खेपेस, **अर्ल माउब्रे**, आणि **यार्कचा आर्चबिशप, रिचर्ड स्क्रोप**, ह्या दोघांना पकडून राजद्रोहाबद्दल त्यांचा शिरच्छेद केला.

माउब्रे आणि स्क्रोप ह्यांचें बंड, १४०५.

ह्यानंतर **हेन्रीनें** गादीचा उपभोग सुखशांतीनें केला. त्याच १४०५ सालीं **स्काच** लोकांच्या गादीचा वारस, **राजपुत्र जेम्स**, हा **फ्रान्स** देशीं जात असतां त्याला **इंग्लिश** जहाजांनीं धरून कैदकेलें. तेव्हां **हेन्रीनें** त्याचें **इंग्लिश** दरबारीं पालनपोषण करून, **स्काच** लोकांवर आपला कबज राखला. **फ्रान्स** देशापासूनही त्याला आतां उपद्रव होईनासा झाला. **फ्रान्स** देशाचा राजा **सहावा चार्लस** ह्याला वेड लागलें, आणि **आर्लीन्स** आणि **बर्गंडी** ह्यांचे **ड्यूक** हे दोघे राजप्रतिनिधीच्या अधिकाराविषयीं झगड्यांत इतके गर्क होऊन गेलेले होते कीं, ह्यापुढें **ग्लेन्डूरला** कुमक करणें त्यांकडून झालें नाहीं. तरुण **हेन्री, प्रिन्स आफ् वेल्स**, हा ह्यापूर्वीच कुशल सेनानायक बनला होता, त्यानें **ग्लेन्डूरला दक्षिण वेल्सांतून** हळू हळू बाहेर पिटून लावलें. तेव्हां तो **ग्लेन्डूर** डोंगरांत भटकूं लागला. शेवटीं, १४०८ त, **नार्थंबर्लंडचा अर्ल** हा लढाईत ठार मारला गेला, आणि त्यापुढें **हेन्रीची** सत्ता नष्ट करण्याविषयीं कोणींही पुनः प्रयत्न केला नाहीं.

स्वस्थतेचा काळ, १४०५–१४१३.

परंतु हीं गादीवर काईम होण्याच्या सतत संदेहाचीं साल वर्षे **हेन्रीला** फार कठीण गेलीं. आपल्या बडे लोकांवर विश्वास ठेव-

ण्याला त्याला धैर्य होईना. ह्यास्तव, त्याला **पार्लमेंटा**शीं आणि **ध-र्म**संबंधी खात्याशीं फार मित्रभावानें राहवें लागलें. **फ्रान्स** देशाशीं बहुत कालपर्यंत चाललेल्या युद्धामुळें **कामन्सां**ची सभा राजाला पुष्कळसें द्रव्य देण्याला फारच नाराजी झालेली होती, आणि राजाला तर द्रव्याची तंगी वारंवार पडे. म्हणून त्या **कामन्सां**ना पाहिजेत तसे करार करून घेतां आले. राजानें आपलें कौन्सिल बदलावें, आणि आपण सांगूं त्याप्रमाणें त्यानें आपल्या खासगी प्रपंचाची व्यवस्था ठेवावी, ह्या दोन गोष्टी त्या **कामन्सां**नीं राजाकडून अधिकारानें करवून घेतल्या; एवढेंच नव्हे, परंतु आपलीं दुःखें, किंवा गाऱ्हाणीं, ह्यांची दाद लागून विचार झाल्यावर, राजाला द्रव्याच्या पुरवण्या करण्याचा हक्क आपणा एकट्यासच सोडून देण्याला त्या **कामन्सां**नीं जबरीनें **लार्डां**ना शेवटीं भाग पाडलें, एथवर **कामन्सां**ना यश आलें.

कामन्सांना राजाला द्रव्याच्या पुरवण्या करण्याचा हक्क मिळतो, १४०७.

स्वातंत्र्यप्राप्तीच्या मार्गांत हें एक पुढें पाऊलच पडलें म्हणावयाचें. परंतु **धर्म**संबंधी खात्याच्या लोकांना खुश करण्यासाठीं एक कायदा ह्या समयीं केला. तो शुद्ध निष्ठुर जुलूम होता. तो जुलूम शंभरांहूनही अधिक वर्षें टिकला. **हेन्री**ला राज्याभिषेक झाल्यावर, जें पहिलें **कान्व्होकेशन** (धर्मोपदेशकांचें मंडल) भरलें, त्यानें **आर्चबिशप आरन्डेल** ह्याच्या सल्ल्यानें **हेन्री**ला एक अर्ज पाठविला. त्यांत **लॉलर्ड्स** (**वुइक्लिफा**चे अनुयायी) लोकांना रसातळास नेण्याविषयीं विनंति केलेली होती. आणि लागलेंच पुढें जें दुसरें **पार्लमेंट** भरलें, त्यांत एक कायदा पसार झाला, त्यानें, कोणीही पाखंडमती, पहिली ताकीद मिळाल्यावर, आपल्या मतां-

पाखंडमताविरुद्ध कायदा, १४०१.

तच राहील, तर त्याला न्यायखात्याकडील अधिकाऱ्यांच्या हवालीं करून **जिवंत जाळावें**, असा ठराव झाला. हा घोर कायदा होण्याला तीन कारणें झालेलीं असावीं असा संभव दिसतो, तीं येणेंप्रमाणें. (१) धर्मोपदेशकांना विश्वासपूर्वक वाटत होतें कीं, **लाल्लर्ड्स** हे मनुष्यांच्या आत्म्यांचा नाश करतील, आणि **धर्म**संबंधी खात्याकडील सर्व जमीनजुमला वगैरे मालमत्ता बळकावतील. (२) जमिनीच्या संबंधाचे कायदे आणि कर ह्यांत फेरफार करावा, आणि बाकी राहिलेल्या बंदे लोकांना बंदेगिरीपासून सोडवावें, अशी त्या **लाल्लर्ड्सांची** इच्छा होती, म्हणून **पार्लमेंटाला** त्यांची दहशत वाटत होती. (३) **रिचर्डाची** त्यांवर कृपादृष्टि होती, म्हणून **हेन्रीला** त्यांची भीति वाटत असे. असो, त्या कायद्याप्रमाणें १४०१ त फेब्रुअरी महिन्यांत, धर्ममताच्या कारणानें मनुष्यप्राण्याला जिवंत जाळून मारण्याकरितां **इंग्लंडांत** पहिली आग पेटविली. **वुइलियम सॉटर** नांवाचा **नार्फक** एथील **रेक्टर** (धर्माधिकारीविशेष) हा **लंडनास** **लाल्लर्ड्सांचीं** मतें शिकविण्यासाठीं आलेला होता. त्याला खुंटाला डांभून जाळलें.

आर्चबिशप आरन्डेल ह्यानें **लाल्लर्ड्सांचा** ह्या प्रकारचा छळ मांडला होता, तथापि इतर गोष्टींत तो शाहणा आणि काबील चान्सेलर (पंडितराव) होता, आणि **हेन्रीचे** **बोफर्ट्स** उपनांवाचे सावत्रभाऊ, त्याच्या कारकीर्दींत **चान्सेलर** होते, तेही तसेच शाहणे आणि काबील होते. हे **बोफर्ट्स गांटचा वृद्ध जान** ह्याचे, त्याची तिसरी बायको **काथरिन स्विन्फर्ड** हिच्या पोटीं झालेले पुत्र होते (पृ. २१८ वें ह्यावरील वंशावळ पहा), आणि ते **दुसऱ्या रिचर्डानें** असील, म्हणजे धर्मपत्नीपासून झालेले, असे ठरविलेले होतें.

टामस बोफर्ट हा चान्सेलर होतो, १४०९.

आतां **हेन्रीची** शरीरप्रकृति दिवसानुदिवस क्षीण होत चालली होती, आणि वारंवार त्याला गिरक्या येत त्यांनीं तो पीडलेला होता, त्या वेळांत ते **बोफर्ट्स** तरुण राजपुत्राला चांगले आणि विश्वासूक मसलतदार झालेले होते. असें म्हणतात कीं, आपण गादी स्वसंतोषानें आपल्या पुत्राला सोडून द्यावी, अशी त्या **बोफर्ट्सांनीं** राजाला आपली इच्छा प्रदर्शित केली होती. परंतु राजा तसें करण्यास कबूल नव्हता. तो प्रकृति सुधरून कांहीं काळपर्यंत पूर्वस्थितीवर आला, आणि राजपुत्र कौन्सिलांत पुढारीपण करीत असे तें त्यानें सोडून दिलें. **आरन्डेल** हा पुन: चान्सेलर झाला. ह्याप्रमाणें स्थिति असतां एके दिवशीं, राजा **वेस्टमिन्स्टर आबींत** निमाज पढत असतां, त्याला गिरकी आली, आणि तो १४१३ त मार्चच्या २० व्या तारिखेस मृत्यु पावला. त्याचे मागें चार पुत्र राहिले होते, ते येणेंप्रमाणें; (१) **हेन्री,** हा त्याच्या मागें गादीवर बसला; (२) **टामस, क्लारेन्सचा ड्यूक;** (३) **जान, बेड्फर्डचा ड्यूक,** हा राजपुत्र शाहणा आणि थोर मनाचा होता; आणि (४) **हम्फ्रि, ग्लास्टरचा ड्यूक,** हा आपल्या घराण्याचा भोंदगिन्हा (कथली व्याध) होता.

पांचवा **हेन्री,** १४१३–१४२२.

आतां पुन: एकवेळ नऊ वर्षेपर्यंत, परदेशीं मिळविलेल्या जयांनीं **इंग्लंडचे** डोळे दिपणार होते. बाप वारला तेव्हां **पांचवा हेन्री** हा उमरीनें पंचवीस वर्षांचा होता, आणि तो ह्यापूर्वींच पराक्रमी योद्धा, आणि अनुभवी राजनीतिकुशल पुरुष, बनून राहिला होता. असें म्हणतात कीं, तो पूर्ववयांत उच्छृंखल होता, आणि

गास्कॉइन नांवाच्या एका न्यायाधीशानें त्याला कायदा न जुमानल्याबद्दल तुरुंगांत पाठविलें होतें. अशी ही गोष्ट झाली असेल तरी, त्यानें चांगलें कामही केलेलें होतें. त्यानें **ग्लेन्डूर** ह्याला जिंकलें होतें. धर्मसंबंधी खात्याची जमीनजुमला वगैरे मालमत्ता सरकारांत घेण्याची **कामन्सांना** इच्छा झाली असतां तो धीरानें त्यांना आडवा आलेला होता, आणि कौन्सिलांत शाहणपणानें त्यानें आपला अधिकार बजावलेला होता. बापानें निग्रही परंतु मर्यादित प्रकारचा अमल करून सुदृढ केलेल्या गादीवर तो आतां बसला, आणि त्याच्यामध्यें तितकें शाहणपण असल्यामुळें, बापानें ज्या मार्गानें पाऊल टाकलें होते तो मार्ग अनुलक्षून तो जाऊं लागला. त्यानें, आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या वर्षी **कामन्सांना**, ते फार दिवस इच्छित होते अशी, एक देणगी दिली, ती ही. त्यांच्या अर्जांना आतां

बिल्स पसार होऊन स्टाटूट्स होताना त्यांत फेरफार होऊं नयेत असा ठराव होतो, १४१४.

बिल्स (खरडे किंवा मसूदे) असें म्हणूं लागले. तीं बिल्स त्यांकडून पसार झाल्यावर त्यांत गाळागाळ, किंवा फिरवाफिरव, न करतां जशींच्या तशीं तीं **स्टाटूट्स** (ठरलेले कायदे) झालीं पाहिजेत, आणि तीं राजापुढें जशीं येतील तशीं त्यानें नाकारावीं किंवा स्वीकारून मंजूर करावीं, असा त्यानें ठराव करून दिला.

एल्येन प्रायोरिझ (परदेशीय मठ) राजाला दिले, १४१४.

"एल्येन प्रायोरिझ" (परदेशीय मठ) ह्यांची मालमत्ता—म्हणजे **इंग्लंडांत** मालमत्ता असून ती त्या काळापर्यंत परदेशांतील धर्मसंबंधी मंडळ्यांच्या उपभोगाला होती अशी मालमत्ता—सारी राजानें घ्यावी, ह्या गोष्टीलाही ह्याच **पार्लमेंटानें** आपली संमति दिली.

ह्याप्रकारें त्या **हेन्रीच्या** कारकीर्दीची सुरवात तर, फार सुखाची

झाली. त्याचा भाऊ **बेड्फर्डचा ड्यूक** हा त्याचा शाहणा मित्र आणि मदतगार होता, आणि **हेन्री बोफर्ट, वुइन्चेस्टर**चा **बिशप,** हा त्याचा विश्वासू चान्सेलर (पंडितराव) होता. तो जातीनें सत्यवचनी, शूर, आणि आत्मसंयमी होता, त्यायोगें, त्याच्या थोड्या वर्षांच्या कारकीर्दींत, तो **इंग्लिश** लोकांना दैवततुल्य झाला होता. त्यानें **मार्टिमरा**ची वतनवाडी **मार्च**च्या तरुण **अर्ला**ला, आणि **नार्थबर्लंड**ची **अर्ल्डम** (अर्लीचा जाहगिरी मुलूख) ही **हाटस्पर**च्या पुत्राला, परत दिली. इतकें करण्या पुरता मी आतां सामर्थ्यवान झालों असें देखील त्याला वाटलें, आणि **रिचर्डा**चें शव **आबट्स लांग्ली** एथें पुरलेलें होतें, तेथून तें काढवून, राजाला योग्य अशा सन्मानांनीं आणवून, **वेस्टमिन्स्टर आबीं**त पुरविलें. **स्काटां**चा अल्पवयस्क राजा **इंग्लिश** दरबारांत राहिलेला होता, त्याला स्वदेशीं जाऊं देण्याला मजकडून हरकत नाहीं असें त्यानें बोलणें काढलें. परंतु त्या देशांत **आल्बनी**चा **ड्यूक** राजप्रतिनिधि असून राज्यकारभार करीत होता, त्याला तो **स्काट्लंडां**त यावयाला नको होता, आणि **राजपुत्र जेम्स** ह्याला **स्काट्लंडास** जाण्यापेक्षां **इंग्लंडां**त राहणें बरें वाटलें. १४१५ त **मार्टिमर**चा मेहुणा **रिचर्ड, केंब्रिज**चा **अर्ल,** ह्यानें एक दुबळा असा कट केला, परंतु तो लवकरच उघडकीस आला, आणि त्याला, त्याचे साथीदार मसलती, **लार्ड स्क्रोप** आणि **सर टामस ग्रे,** ह्यांसह धरून, त्या तिघांचीं डोकीं मारलीं.

पांचवा हेन्री हा खंबीर आणि लोकप्रिय होतो.

दुष्काळ पडले, आणि तशांत १४०७ त **ब्लाक डेथ** नांवाच्या सांतीचा रोग पुनः उद्भवला. ह्या आफती गुदरल्या तरी, त्या

लोकांची स्थिति.

राष्ट्रांतील लोक आतां पुष्कळ वर्षें भरभराटींत होते. मोलमजुरी करणारे लोक स्वतंत्र होत चालले होते. मिरासदार, आणि धारेकरी, ह्यांना आपल्या जमिनी साऱ्यानें देतां घेतां येऊं लागल्या. पोशाखाच्या संबंधानें उधळपट्टी बंद करण्यासाठीं स्टाटुटें, म्हणजे कायदे, केले—उदाहरणार्थ, कोणाही मजूराच्या बायकोनें रुप्यानें सुशोभित केलेला कमरपट्टा, किंवा दर वारीं दोन शिलिंगांहून ज्यास्त (त्याकाळचे दोन शिलिंग म्हणजे सुमारानें हालींच्या आमच्या वीस शिलिंगांबरोबर होते) किंमत पडणाऱ्या कापडाचा पोशाख, वापरूं नये असा कायदा होता,—त्या कायद्यांवरून, द्रव्याची कमतरता नव्हती हें अर्थात् लक्ष्यांत येईल. **हालंड**, **बाल्टिक** समुद्राच्या कांठचीं शहरें, **फ्लांडर्स**, **व्हेनिस**, वगैरे देशांशीं व शहरांशीं व्यापार वाढविण्याकरितां अनेक नवे नवे तह केले, त्यांवरून, जहाजें बांधण्याचा धंदा, आणि व्यापार, हे समृद्ध दशेंत होते असें दिसून येतें. **न्यूकास्टल** एथील खाणींतल्या कोळशांचा व्यापार महत्वाचा होत चालला होता; आणि **इंग्लिश** राजे मूर्खपणानें नाणें हिणकस करूं लागले होते, म्हणूजे नाण्यांत रुप्याचें मान कमी कमी आणि हीणाचें मान ज्यास्ती ज्यास्ती घालूं लागले होते, तरी, नाण्यांचें चलन किंवा खेळ मोकळेपणानें चालला होता. व्यापारी धनाढ्य आणि प्रबल होते. त्यांतीलच एक **डिक व्हिटिंग्टन** नांवाचा विख्यात व्यापारी होता, तो तीन वेळां **लंडनचा लार्ड मेयर** (कोतवाल किंवा नगराध्यक्ष) झालेला होता. कारिगर लोकांच्या श्रेणी स्थापित झालेल्या असून, त्या कारिगर लोकांचें रक्षण करीत, आणि चांगल्या कामाला उत्तेजन देत.

लोकांमध्यें अवघी चळवळ किंवा तळमळ म्हणून जी काय

होती ती **लाल्लर्ड्स** लोकांपासून उत्पन्न झालेली होती असें दिसतें. त्यांचीं मतें फार लांबवर पसरलेलीं होतीं. **सर जान ओल्डकास्टल** नांवाचा एक दांडगा नाइट (सरदारबहादर) होता, तो **काव्हाम**च्या जाहगिरीची वारसदारीण हिच्याशीं लग्न करून **लार्ड काव्हाम** हें नांव पावला होता. त्यानें पुष्कळ वर्षांपासून **लाल्लर्ड्स** लोकांना आश्रय दिलेला होता. तो शूर शिपाई असून **पार्लमें**टचा सर्वमान्य सभासद होता, आणि **केंट** कौंटीतील **कौलिंग** एथील त्याचा किल्ला, हें त्या **लाल्लर्ड्स** लोकांचें मुख्य ठिकाण झालेलें होतें, तथापि त्या **लार्ड काव्हामाशीं** खवदव करणें मोठें कठीण होतें. **पांचव्या हेन्रीनें** त्या **लार्ड काव्हामाचें** धर्ममत पालटविण्याविषयीं फार प्रयत्न केले, परंतु ते सारे फुकट गेले, तेव्हां शेवटीं त्याला पकडून कैदकरून मृत्यूची सजा ठरविली. परंतु ती शिक्षा अमलांत आणण्याचा दिवस येण्यापूर्वींच, तो **टौअर** (लंडनचा किल्ला)मध्यें कैदेंत होता, तेथून निसटून पळून गेला. तीच बंडाला इशारत झाली. **लंडन**च्या बाहेरील शेतांत, **सेन्ट जाइल्स**च्या देवळानजीक **लाल्लर्ड्सांचा** मोठा जमाव जमला. परंतु **हेन्रीनें** इतकी अतिशय त्वरा केली कीं, त्यांचें कांहीं चालूं दिलें नाहीं. त्यानें शहराच्या वेशी बंद करविल्या, आणि त्याच्या फौजेनें तो जमाव उधळून पिटाळून लावला. मुख्य मुख्य **लाल्लर्ड्सांपैकीं** एकुणचाळिसांस पकडून त्यांना देहांत शासन केलें, आणि **लार्ड काव्हाम** हा **वेल्स** देशीं पळून गेला. १४१७ त त्याला धरून, बेड्या हातींपायीं असतांच, त्याला फांशीं दिलें, आणि नंतर त्याचें प्रेत जाळलें.

लाल्लर्ड्स लोकांचें बंड, १४१४.

त्यानंतर **लाल्लर्ड** पंथाचा हळू हळू लोप होत गेला. परंतु त्या-

पासून देशांत सर्वत्र उत्पन्न झालेली तळमळ हीच, पुनः **फ्रेंचांशीं** युद्ध सुरू होण्याला जीं कारणें झालीं त्यांपैकीं एक कारण होती.

फ्रेंचांशीं पुनः युद्ध सुरू होण्याचीं कारणें.

लाल्र्ड्सांपासून लोकांचें लक्ष्य वळवावें, आणि **धर्म**संबंधीं खात्याची मालमत्ता सरकारांत घेण्याचा **पार्लमेंटानें** मनांत विचार आणला होता त्यापासून त्यांचें लक्ष्य वळवावें, ही बिशपांची मनीषा होती. व्यापारी लोकांना आपल्या मालांकरितां खपाचे नवीन नवीन मार्ग खुले व्हावयाला पाहिजे होते, आणि बडे लोकांना शांतीचा कंटाळा आला होता. ह्या काळांत युद्ध आणि नवीन मुलूख जिंकणें ह्या गोष्टी राष्ट्राला आणि राजाला कीर्तिप्रद मानीत, आणि **हेन्री** महत्वाकांक्षी असून, **फ्रान्स** देशीं त्या समयीं विपत्तिकारक यादवी (आपआपसांतील युद्ध) मातली होती ती मोडून टाकण्याविषयीं प्रयत्न करणें हें शाहणपणाचें कृत्य आहे असें तो खरोखर विश्वासपूर्वक मानीत होता. म्हणून, जरी **तिसऱ्या एड्वर्डा**हून देखील त्याला हक्क कमी होता, तरी, त्यानें १४१५ च्या एप्रिल महिन्यांत **फ्रान्स** देशाच्या गादीवर कायदेशीर प्रकारानें आपला दावा मांडला, आणि पुनः एक वेळ युद्ध सुरू झालें.

१४१५ त आगस्टच्या १४ व्या तारिखेस, **नार्मंडींतील हार्फ्लूर** गांवानजीक, तो खाडी ओलांडून जाऊन जमिनीवर उतरला, आणि भयानक वेढा देऊन त्यानें तें गांव घेतलें. त्या वेढ्यांत

हार्फ्लूरचा वेढा, माहे आगस्ट १४१५.

त्याच्या फौजेंत बेमारी उत्पन्न होऊन हजारों लोक प्राणास मुकले, नंतर तो कूच करून कालेकडे निघाला तों, मार्गांत **पिकर्डी** प्रांतांतील **आजिन्कोर्टच्या** मैदानांत **फ्रेंचांच्या** ६०००० फौजेची त्याची गांठ पडली. तेवढ्या वेळेपुरते उभयपक्षाच्या साधारण शत्रू-

विरुद्ध फ्रेंच लोक दुफळी मोडून एकत्र जमले होते. **हेन्री**जवळ फार फार म्हटलें तर फक्त ९००० लोक होते, तथापि पुनः एक वेळ **इंग्लिशांच्या** तीरकमानवाल्यांनीं **फ्रेंचांचें** घोडदळ उधळून लावलें, आणि ११००० **फ्रेंच** लोक रणभूमीवर मरून पडले. त्यांत राजपुत्र व बडे लोक मिळून शंभरांवर होते. असें असतांही, आपली फौज शिणली म्हणून, **हेन्रीला इंग्लंडास** माघारें येणें भाग आलें; आणि पुढें फक्त दोन वर्षांनीं, म्हणजे १४१७ त, ३२००० फौज बरोबर घेऊन तो **फ्रान्स** देशीं परतून गेला,

आजिन्कोर्टची लढाई, माहे आक्टोबर १४१५.

आणि **नार्मंडीं**तील चटसारे किल्ले, शहरें, आणि बंदरें, ह्यांसुद्धां तो प्रांत त्यानें जिंकला. १४१८ त एकट्या **रूआंग्** शहराचा वेढा सहा महिनेपर्यंत चालू होता. तेथील लोक अन्नावांचून उपाशीं मरत होते तथापि त्या शहरानें टिकाव धरला. तथल्या सुभेदाराला, पुरुष, बायका, आणि मुलें, मिळून १२००० मनुष्यप्राण्यांस शहराच्या वेशीबाहेर घालवून द्यावें लागलें. ते बिचारे, शहराचे तट, आणि **इंग्लिशांची** फौज, ह्यांच्या दरम्यान मरत पडलेले राहिले होते. शेवटी आंत राहिलेल्या शूर लोकांनीं शहराला आग लावतों अशी भीति घातली, तेव्हां **हेन्रीनें** त्यांच्याशीं अटी किंवा करार करून घेऊन समेट केला. परंतु त्यांचा **आलन ब्लॉनशार** नांवाचा शूर सेनापति होता त्याला ठार मारविलें. पुढील सालीं त्यानें **पान्ट्वस** शहर घेतलें, आणि **पारिस**वर हल्ला करतों अशी त्यानें भीति घातली, इतक्यांत त्याला दैव अनुकूल झालें. **बर्गंडीचा ड्यूक, जान,** हा **चार्लस, धि डॉफिन** (हा **फ्रान्स** देशच्या राजाच्या वडील पुत्राला प्राचीनकाळीं किताब असे), किंवा **फ्रान्स**देशच्या गादीचा वारस,

रूआंग्चा वेढा, १४१८.

ह्याकडे कांहीं बोलणेंचालणें करण्यासाठीं गेलेला होता, त्याला त्या **डॉफिना**च्या समक्ष, **आर्लीन्स** ह्याच्या दोस्तांनीं, विश्वासघातानें ठार मारलें. तेव्हां **बर्गंडी**चे लोक, त्या विश्वासघातानें क्रुद्ध होऊन, **हेन्री**ला मिळाले, आणि **फ्रेंचां**च्या वेड लागलेल्या राजाची बायको, **राणी इसाबेला**, ही देखील आपल्या पुत्रावर (म्हणजे त्या डॉफिनावर) उलटली, आणि तिनें आपली कन्या **काथरिन** हिचें **हेन्री**शीं लग्न करून दिलें. पुढें **ट्रवा** एथें १४२० त, मेच्या २१ व्या तारिखेस, तह झाला, त्या तहानें **हेन्री**ला **फ्रान्स** देशचा राजप्रतिनिधि केलें, आणि त्यावेळच्या राजाच्या पश्चात् त्याला गादीचा मालक नेमलें.

हेन्रीला फ्रान्स देशचा राजप्रतिनिधि केलें, १४२०.

आपला राजा **हेन्री, फ्रान्स** देशचा राजप्रतिनिधि होऊन, आपल्या **फ्रेंच** जातीच्या तरुण बायकोसह माघारा आला, तेव्हां **इंग्लंडा**ला त्या राजाविषयीं फार गर्व वाटला. पुढल्या कारकीर्दींत ह्या साऱ्या विजयाकरितां आणि जयश्रीकरितां आपल्याला किती भारी मोल द्यावें लागेल हा विचार त्या वेळीं मनांत आला असेल तर फारच थोड्या लोकांच्या, किंवा कोणाच्याही मनांत आला नाहीं. १४२१ त डिसेंबरच्या ६ व्या तारिखेस, **हेन्री**च्या राणीला पुत्र झाला. त्याचें नांव **हेन्री** ठेवलें. राजा त्या समयीं परदेशीं असून तो डॉफिनाविरुद्ध लढत होता. त्याची प्रकृति फार जलद क्षीण होऊं लागली होती, आणि शेवटीं तो चौतिसाव्या वर्षी इतक्या अल्पवयांत, **व्हिन्सेन्झ** एथें १४२२ त आगस्टच्या ३१ व्या तारिखेस मरण पावला. पुढें दोन महिन्यांनीं **फ्रान्स**चा तो हतभाग्य **सहावा चार्लस**ही वारला,, आणि तो **इं-**

इंग्लंडच्या आणि फ्रान्सच्या राजांचे मृत्यु, १४२२.

ग्लिश राजपुत्र (दहा महिन्यांचें लेंकरूं) इंग्लंडचा आणि फ्रान्सचा राजा झाला.

सहावा हेन्री, १४२२–१४६१.

पांचवा हेन्री वारला तेव्हां **इंग्लंड** कीर्तीच्या ऐन भरांत होतें. **पार्लमेंट**, धर्मोपदेशक, आणि सारें राष्ट्र, ह्यांनीं त्या राजानें जे यशस्कर जय मिळविले त्यांत त्याला पाठबळ देण्याला मोठ्या उत्साहानें प्रयत्न केले होते, आणि त्यानें त्यांच्याकरितां साऱ्या **यूरोपाच्या** दृष्टीला भव्य वाटे असें जयश्रीचें स्थान मिळवून दिलें होतें. परंतु ती जयश्री सारी लटकी होती. **इंग्लंडची** गादी ऋणांत खोल बुडालेली होती. देश मत्यास आला होता, आणि त्यांतून माणसांचा आणि द्रव्याचा निचरा होऊन गेला होता. **हेन्रीनें** मरणसमयीं प्रदर्शित केलेल्या इच्छेला अनुसरून **बेड्फर्डचा ड्यूक** हा **राज्याचा संरक्षक** आणि त्या अर्भक राजपुत्राचा पालक झाला. परंतु त्यानेंच **फ्रान्स** देशाचा राजप्रतिनिधिही व्हावें, आणि तो त्या देशांत राहील तोंपर्यंत त्याच्यामागें **इंग्लंडांत** कौन्सिलाच्या मदतीनें, **ग्लास्टरच्या ड्यूकानें** राज्यकारभार चालवावा असें ठरलेलें होतें. **हेन्रीनें** मरते समयीं आपल्या त्या दोघां भावांस, डॉफिनाशीं कधींही सल्ला करूं नये, आणि **बर्गंडीच्या ड्यूकाशीं** कधींही कलह करूं नये, अशी आज्ञा केलेली होती, आणि त्यांपैकीं **ग्लास्टरच्या ड्यूकाला** तर, स्वहिताभूर्वी देशहिताकडे लक्ष्य ठेवावें, अशी ताकीद के-

राजपुत्राच्या व्यवहाराक्षमतेच्या वेळांतील राज्यकारभाराची व्यवस्था.

लेली होती. **हेन्रीनें**, ती ताकीद करण्यांत, त्या **ग्लास्टरच्या ड्यूकाची** अतिशय खरी पारख केली होती ह्यांत संशय नाहीं. एक वर्ष सुद्धां लोटलें नाहीं तोंच, त्या **ग्लास्टरच्या ड्यूकानें**, आपल्या बायकोला वारशानें प्राप्त झालेल्या धनाच्या संबंधानें, **बर्गंडीच्या** ड्यूकाशीं कलह केला, आणि पुढें तीन वर्षांनीं, तो **ग्लास्टरचा ड्यूक**, आणि त्याचा चुलता **हेन्री बोफर्ट** चान्सेलर होता तो, ह्यांच्या दरम्यान सल्ला करवून भांडणाची मिटवामिटव करण्यासाठीं, **बेड्फर्डच्या** ड्यूकाला **फ्रान्स** देशांतून माघारें यावें लागलें.

ह्या **ग्लास्टरच्या** कळभांडपणाच्या उलट, **बेड्फर्डनें** परदेशीं आपलें काम चांगल्या प्रकारानें केलें. त्यानें **बर्गंडीच्या** ड्यूकाच्या बहिणीशीं विवाह केला, आणि तो महत्संकटानें **ग्लास्टरच्या** कलहांतून पार पडला. जयामागून जय मिळवून, पांच वर्षांत **ल्वार** नदीच्या उत्तरेकडील सारा **फ्रान्सांतील** मुलूख त्यानें सर केला; आणि त्यानें **आर्लीन्स** शहराला वेढा घातला होता, त्यांतही त्याला यश मिळण्याचा रंग आला होता, इतक्यांत त्या शहरची अति आश्चर्यकारक प्रकारानें सोडवणूक झाली. त्या सोडवणूकीची कथा, ही दुनिया टिकेल तोंपर्यंत, लोक सांगत राहतील.

आर्लीन्सचा वेढा, १४२८, १४२९.

झान डार्क (हिला विचित्र चुकीनें **इंग्लिश** भाषेंत **जोन आफ् आर्क** म्हणूं लागले) नांवाची एक खेड्यांत राहणारी भोळीभाबडी मुलगी होती. तें, **शांपेन** आणि **लॉरेन** ह्या दोहों प्रांतांच्या हद्दीवर असणाऱ्या **डॉमरेमी** नांवाच्या गांवीं राहणाऱ्या एका मजूराचें मूल होतें. तिचें मन, आपल्या देशाची नासाडी

आणि दुर्दशा झालेली पाहून, दयेनें किंवा कळकळीनें व्याप्त झालें. **लॉरेन** प्रांतांतील एक कुमारी **फ्रान्स** देशावरील संकट वारील असें एक जुनें भाकीत होतें, त्याची तिनें एकसारखी घोकणी घेतली. तिला स्वप्नें पडत, त्यांत मुख्यवर्गांतील देवदूत **मायकेल** ह्याचा तिला साक्षात्कार होऊन, तूं डॉफिनाकडे जा, आणि तुला अभ्यंगपूर्वक राज्याभिषेक करविण्यासाठीं मी **रीम्झ** एथें घेऊन जातें, असें त्याला वचन दे, अशी तो देवदूत तिला आज्ञा करी.

झान डार्कचा इतिहास, १४२९ पासून १४३१ पर्यंत.

हीं स्वप्नें ती श्रद्धापूर्वक खरीं मानी. तिच्या खेड्यांतील धर्मोपदेशक व लोक हे तिला आड आले, तथापि, त्यांचें न ऐकतां, तिनें **व्होकुलूर्स** एथील कप्तानाला, आपल्याला डॉफिनाच्या तळांत घेऊन जाण्याविषयीं, समजूत करून प्रवृत्त केलें. तेथें गेल्यावर तिनें आपल्याला कोणीं कशाकरितां पाठविलें तें इत्थंभूत सांगितलें; आणि बुडता तरतें पान मिळालें तरी तो आधार मानून त्याला धरावयास जातो त्याप्रमाणें, सर्वस्वीं निराशा झाली होती तींत, ही कांहीं तरी एक आशा असें मानून, तिचें म्हणणें मनावर घेऊन **डॉफिनानें** तिला वाटेल तसें करूं दिलें. नंतर न भितां किंवा मागें न सरतां, अडदांड शिपायांचें आधिपत्य स्वीकारून, पांढऱ्या रंगाचें चिलखत आंगीं चढवून, **फ्लूर-डि-ली** (लिली नांवाच्या झाडाचें फूल) ह्या **फ्रेंचांच्या** राजचिन्हाच्या चमक्या जडवलेलें निशाण डोकीवर फडकत ठेवून, १०००० हत्यारबंद शिपायांनिशीं ती **इंग्लिश** फौजेची फळी फोडून पार गेली. त्या लढाईत खुद्द तिला जखम लागली तरी, तिनें **आर्लीन्सचा** वेढा उठविला. **इंग्लिश** लोकांना भीतीची धडकी भरली. **फ्रेंच** लोक, **देवाकडून हा कोणी जासूद आला आहे, असें तिला विश्वासानें मानीत होते. फ्रेंचांक-**

डील सरदारांची ल्वार नदीवर लढत राहण्याची इच्छा होती, परंतु त्यांकडे तिनें लक्ष्य दिलें नाहीं; आणि पुढें आड आलें तें सर्व जिंकीत जाऊन, तिनें तें विजयी सैन्य रीम्झ एथें नेलें. तेथें १४२९ त जूलईच्या १७ व्या तारिखेस, सातव्या चार्लसाला फ्रान्सचा राजा करून, राज्याभिषेक करविला. नंतर माझें खेडें व माझीं मेंढरें ह्यांकडे माझ्या घरीं मला जाऊं द्यावें म्हणून त्या झान डार्कनें विनंति केली. ती म्हणाली, माझा आवाज मला सोडून गेला, ज्या कामगिरीसाठीं मला पाठविलें, ती कामगिरी आटोपली. परंतु चार्लस तिला जाऊं देईना, तेव्हां ती पुढें शौर्यानें लढली. मात्र तिचें अवसान किंवा भरवसा गेलेला होता. १४३० त कॉम्पिएनच्या वेढ्याचें काम चाललें असतां, तिला बर्गंडियन लोकांनीं धरून कैदकेलें. त्यांनीं तिला इंग्लिशांना विकलें, आणि चार्लसानें तिला वांचविण्याविषयीं बिलकूल यत्न केला नाहीं. तिचा शेवट ज्या प्रकारें झाला तो प्रकार,—ज्या फ्रेंचांना तिनें शत्रूंपासून सोडविलें त्यांना, ज्या इंग्लिश लोकांनीं तिचें शौर्य प्रत्यक्ष पाहिलें होतें त्यांना, आणि खुद्द त्या भोळ्याभावड्या कुमारीशिवाय इतरां सर्वांना,—लाजेचा झाला. तिला चेटकीण ठरवून रूआंग् एथें, १४३१ त मेच्या ३० व्या तारिखेस, जिवंत जाळलें, आणि तिचा तो थोर उदार आत्मा, खोटेनाटे मित्र आणि क्रूर शत्रु ह्यांच्या हातून सुटून, “ ज्या स्थानीं, “ दुष्ट पापी जन उपद्रव करूं शकत नाहींत, आणि शिणलेले लोक “ आरामांत असतात ” त्या स्थानीं गेला.

झान डार्कचा मृत्यु, १४३१.

फारां दिवसांपासून चाललेल्या त्या युद्धाची अद्यापि समाप्ति झाली नाहीं, कारण चार्लस पारिसास पोहोंचला नव्हता, आणि झान डार्क हिला जाळून मारलें त्याच सालीं, त्या शहरांत बोफर्टानें स-

हाव्या हेन्रीला राज्याभिषेक केला. परंतु त्या वेळेपासून **इंग्लिशांचा** मोड होऊं लागला. पुढें दोन वर्षांनीं **बेड्फर्ड** वारला, आणि **यार्कचा ड्यूक, रिचर्ड,** आणि **जान टाल्बॉट,** ह्या दोघांनीं मिळून युद्ध पुढें चालविलें, परंतु त्यांत यशाची आशा थोडी होती, कारण **बेड्फर्डाच्या** मृत्यूनंतर **बर्गंडी** (बर्गंडीचा ड्यूक) हा **इंग्लिशांचा** पक्ष सोडून **फ्रेंच** राजास मिळाला. १४४५ त जेव्हां **सहाव्या हेन्रीनें आन्जूची मार्गरेट** हिच्याशीं लग्न केलें, तेव्हां **इंग्लिशांनीं आन्जू** आणि **मेन** हे प्रांत तिचा बाप **रेने** ह्याला सोडून देण्याचें कबूल केलें, आणि **फ्रान्साशीं** कांहीं मुदतीचा तह केला. परंतु तो सतत मोडला जाई. १४४९ त **सातवा चार्लस** ह्यानें **नार्मंडी** जिंकून परत घेतली, आणि आणखी चार वर्षांत **गिएन** आणि **बॉर्डो** हीं त्याच्या हस्तगत झालीं. १४५३ त **टाल्बॉट** हा ठार मारला गेला, आणि **शंभर वर्षांचें गुद्ध** संपलें, तेव्हां **काले** एवढें एक **फ्रान्स** देशापैकीं ठिकाण **इंग्लिशांकडे** राहिलें.

शंभर वर्षांच्या युद्धाची समाप्ति, १४५३.

ह्याप्रकारें परदेशीं **इंग्लिशांवर** अरिष्टें आणि नुकसानें पडत असतां, **ग्लास्टरचा ड्यूक** आणि **चान्सेलर बोफर्ट** हे दोघे स्वदेशीं कलह करीत होते. **ग्लास्टर** हा लोकप्रिय, आणि महत्वाकांक्षी होता. परंतु तो वाकब मुतसद्दी नव्हता. **बोफर्ट** हा सर्व गोष्टी उजू राखण्याविषयीं प्रयत्न करी, परंतु ते व्यर्थ जात. त्या **ग्लास्टरा**बरोबर कारभार करणें अशक्यच झालें तेव्हां, एका वेळीं तर तो **इंग्लंड** अगदीं सोडून गेला होता. **ग्लास्टराशीं** वागणुकींत **बेड्फर्डाची** देखील सोशिकपणाची पराकाष्ठा होऊन, त्याला त्याची

ग्लास्टर आणि बोफर्ट ह्यांचे कलह.

वागणूक सहन होईनाशी झाली होती, आणि तो बिचारा अल्पवयस्क राजा फक्त अकरा वर्षांचा झाला तोंच, त्याला आपल्या त्या चुलत्यांना आपआपल्यांत समेट करा म्हणून विनवणी करावी लागली. **हेन्री**ला १४२९ त राज्याभिषेक झाला, त्यानंतर **ग्लास्टर**च्या सत्तेची समाप्ति झाली, आणि **बोफर्ट** हा आतां **कार्डिनल** (रोमनक्याथोलिक पंथांतील एक धर्माधिकारी) झाला होता, तो १४४७ त वारला, तोंपर्यंत त्याचें राज्यांत मोठें वजन होतें.

ह्या काळामध्यें **पार्लमेंट** अधिकाधिक हीनबल होत चाललें होतें, आणि राजाचें **प्रिव्हि कौन्सिल** (खास निसबतीचें मंत्रिमंडळ) अधिकाधिक प्रबल होऊं लागलें होतें. ह्याचें एक कारण होतें तें हें.

पार्लमेंटचा अपकर्ष.

सहाव्या हेन्रीच्या कारकीर्दीच्या आठव्या वर्षी **"फ्रांचिझ,"** म्हणजे शायरांच्या तर्फेचे नाइट ह्यांची निवडणूक करण्यांत मत देण्याचा अधिकार, **कौंटी** कोडतांत निवडणूक होई तेथें जे कोणी हाजिर होतील त्या सर्वांना सरसकटीनें त्यापुढें न देतां, तो अधिकार, चाळीस शिलिंग (म्हणजे हालींच्या नाण्याच्या किमतीच्या मानानें वीस आणि तीस पौन्ड ह्यांच्या दरम्यान) इतकें सालचें उत्पन्न असलेल्या मिराशी जमिनी किंवा घरें ह्यांच्या मालकांनाच ठेवला. आणि बरोझमध्यें (सनदी गांवें किंवा शहरें ह्यांत) निवडणुकी होत त्या, हळू हळू **बर्जेसिझ** (शहरकरी) लोकांचा "निवडक समुदाय" ह्याच्या हातीं जात चालल्या होत्या, आणि त्या निवडणुकींत शेरिफ्फांची हुकमत फारच चाले. त्यामुळें राजा आणि प्रमुख लोक ह्यांना त्या निवडणुकींत आपल्या वजनानें सहज हवेंतसें करून घेतां येई. ह्या प्रकारें **हौस आफ् कामन्स** ही सभा राजाच्या प्रधानांची केवळ कार्यसाधक बनली, आणि तिचें त्याहून विशेष माहात्म्य

उरलें नाहीं, आणि त्या प्रधानांचा आपआपसांत कलह लागला म्हणजे, सभासद हत्यारबंद देखील होऊन **पार्लमेंटांत** येत. १४२५ त भरलेल्या एका **पार्लमेंटाला** तर **"पार्लमेंट आफ् बाट्स"** (सोटेवालें पार्लमेंट) हें नांव पडलें, कारण सभासदांना हत्यारें आणण्याची मनाई झाली तेव्हां, त्यांनीं हत्यारांबदली आपल्या अस्तन्यांत घालून सोटे आणले. शेवटीं, १४३७ त, पहिल्यानेंच, राजानें आपलें कौन्सिल, **पार्लमेंटास** न निवडूं देतां, आपलें आपणच निवडून नेमलें. ह्या कृत्यानें तो अधिकार वास्तविक राजाच्या हातीं गेला.

पार्लमेंट आफ् धि "बाट्स."

तथापि तो अधिकार खुद्द त्याच्याच हातीं गेला असें म्हणतां येत नाहीं, कारण, **हेन्री** हा १४४२ त कायदेशीर वयांत आला, परंतु त्याच्या जातीची म्हणून इच्छा त्याला कांहीं राहिली नव्हती. तो निर्मल अंतःकरणाचा, सोशीक, नम्र, दयालु, आणि उदार, होता, परंतु इतकेंही असून तो शरीरानें व मनानें दुबळा होता. मातृपक्षाकडून तो, **फ्रान्स** देशाचा राजा तो बिचारा वेडा **सहावा चार्लस**, ह्याचा नातू होता, आणि त्याच्या आयुष्याच्या अखेरीच्या भागांत त्यावर वेडाच्या धाडी वारंवार पडत. **ईटन स्कूल** (ईटन एथील शाळा) आणि **केंब्रिज** एथील **किंग्झ कालेज** (राजाची पाठशाला) हीं दोन्ही त्यानें स्थापलेलीं होतीं, त्या दोहोंविषयीं तो फार कळकळ बागवीत असे. तो आपल्या सल्लामसलत सांगणाऱ्या लोकांच्या दरम्यान, सलूक राखण्याविषयीं यत्न करून, आपलीं अधिकारसंबंधी अवश्य कर्तव्य कामें बजावण्याविषयीं सक्त

सहाव्या हेन्रीचे गुणदोष.

प्रयत्न करी; परंतु राज्यसंबंधी सर्व गोष्टींत, त्याच्याहून शिरजोर किंवा डोईजड लोक त्याला हिकडून तिकडे, तिकडून हिकडे, हाकीत.

१४४५ त त्यानें **आन्जूची मार्गरेट** हिच्याशीं लग्न केल्यापासून, तो मुख्यत्वेंकरून तिच्या लगामीं होता, आणि तिचे मर्जीतले प्रधान, पहिल्यानें **सफक**चा ड्यूक, आणि पुढें **समर्सेट**चा अर्ल, हे होते. जेव्हां **फ्रान्स** देशाशीं चाललेल्या युद्धांत **इंग्लं**डाला हार येऊं लागली, तेव्हां गमावलेला मुलूख प्रयत्न करून परत घ्यावा, असें **ग्लास्टर**च्या मनांत होतें, परंतु **मार्गरेट** ही जातीनें **फ्रेंच** होती त्यामुळें, सहजच तह करण्याविषयीं तिची इच्छा होती. १४४७ त **ग्लास्टरा**वर घोर राजद्रोहाचा आरोप ठेवला, आणि पुढें पांचा दिवसांनीं तो निजलेल्या ठिकाणीं बिछान्यांत मेलेला सांपडला. त्याचा खून झालेला असावा असा संभव दिसतो. नंतर **सफका**कडे मुख्य अधिकार आला, आणि त्यानें तो चांगल्या प्रकारें वागविला. परंतु तो **फ्रान्स** देशाशीं अपमानकारक तह करीत आहे, असा त्याच्या गुप्त शत्रूंनीं पुकारा केला. त्यावरही १४५० त तोहमत ठेवली, आणि त्याला हद्दपार केलें, परंतु तो पलीकडच्या कांठीं **यूरोप** खंडांत पोहोंचेपर्यंत वांचला नाहीं. तो **इंग्लिश चानल** ओलांडून जात असतां मध्येंच त्याचा खून झाला.

सफक आणि ग्लास्टर ह्यांचे खून, १४४७–१४५०.

नंतर लोक, जबर करांनीं त्रस्त, पण **फ्रान्स**शीं केलेल्या मुदतीच्या तहानें क्रुद्ध, झालेले होते, आणि त्यांना आळ्यांत ठेवणारा त्यांच्या डोईवर खंबीर पुरुष नसल्यामुळें ते बंड करून उठले. **जाक केड** नांवाचा कोणीएक **आयरिश** माणूस होता.

जाक केड ह्याचें बंड, १४५०.

तो आपणाला **मार्टिमर** घराण्यांतला म्हणवीत असे. त्यानें **केंट, सरी,** आणि **ससेक्स,** ह्या कौंटींतून २०००० लोकांचा समुदाय जमविला, आणि त्यांचा मुख्य होऊन त्यानें त्यांना पहिल्यानें **ब्लाकहीथ कॉमन** एथें नेलें, आणि तेथून पुढें **लंडनास** नेलें. सत्तर वर्षांपूर्वी **वाट टाइलर** ह्याच्या हुकमतीखालीं बंड करून उठलेल्या लोकांहून हे लोक किती घरचे सुखी असावेत हें सहज लक्ष्यांत येईल, कारण, त्यांनीं बंदेगिरीविषयीं किंवा रोजमुऱ्याविषयीं गाऱ्हाणीं केलीं नाहींत, परंतु **पार्लमेंटा**करितां सभासदांची निवडणूक मोकळ्या प्रकारानें व्हावी, तींत कोणाची ढवळाढवळ असूं नये, राजाच्या मर्जींतले परदेशीय लोक होते त्यांना घालवून द्यावें, आणि प्रधानमंडल पालटावें, ही त्यांचीं मागणीं होतीं. ते लोक **लंडन** शहरांत शिरले, आणि त्यांनीं **लार्ड से** नांवाचा खजिनदार होता त्याला ठार मारलें. परंतु शेवटी **लंडन ब्रिज** (लंडनचा पूल)वर लढाई झाली तींत त्यांचा मोड झाला, आणि त्यांना क्षमा होऊन ते बारावाटा फांकले. पुढें **जाक केड लुएस** एथें ठार मारला गेला. ह्याच सालच्या नोव्हेंबर महिन्यांत **लॉर्ड मेयर**ची निवडणूक होतांना, **लॉर्ड मेयर्स शो** (लंडनच्या कोतवालाची किंवा नगराध्यक्षाची मिरवणूक) म्हणून ज्या मिरवणुकीला म्हणतात ती पहिल्यानें झाली.

रिचर्ड, यार्कचा ड्यूक, राज्यसंरक्षक होतो, १४५५.

आतां राज्यकारभार कोणी तरी खंबीर पुरुषानें हातीं घेतला पाहिजे, इतकें **जाक केडाच्या** बंडावरून स्पष्ट झालें. आणि पुढें थोड्या वर्षांनीं, **यार्कचा ड्यूक, रिचर्ड,** हा **फ्रान्स** आणि **आयर्लंड** ह्या देशीं गेलेला होता, तो **इंग्लंडास** परत आला, आणि **राणीच्या** मर्जींतला, **समर्सेट,**

ह्याची जागा त्यानें स्वीकारली. १४५४ त, त्या हतभाग्य राजाला वेड लागून बुद्धिभ्रंश झालेला होता, त्याच्या बदली राज्यकारभार चालविण्यासाठीं त्या **रिचर्डा**ला राज्याचा संरक्षक नेमलें. हाच **यार्क**चा **रिचर्ड, ग्लास्टर**च्या मृत्यूनंतर गादीचा वारस झालेला होता, कारण **हेन्री**चा पुत्र **एड्वर्ड** ह्याचें जन्म १४५३ त झालें तोंपर्यंत, त्या **हेन्री**चा तो अति जवळचा नातलग होता. **एड्वर्डा**च्या जन्मानंतर देखील, निश्चीनेंच म्हटलें तर, एका अर्थी **रिचर्डा**चा गादीवर सर्वांहून उत्तम हक्क होता, कारण त्याची आई, **आन मार्टिमर,** ही **क्लारेन्स**च्या ड्यूकापासून चालत आलेली जी **मार्टिमरा**ची वडील शाखा, तींतील होती (पृ. २१८ ह्यावरील वंशावळ पहा). त्या वडील शाखेला नेहमीच अजीबात एका आंगाला टाकलें होतें; आणि **लांकास्टर** नांवाच्या घराण्यांतील पुरुषांनीं तीन पिढ्या राज्य केलेलें होतें, आणि तो **यार्क**चा **रिचर्ड** आतां केवळ राजाला मदत करण्यासाठीं म्हणून पुढें आला. पुढील सालीं **हेन्री**चें वेड जाऊन जेव्हां तो शुद्धीवर आला तेव्हां, **मार्गरेट** हिनें, **यार्क**ला (रिचर्डाला) घालवून देऊन **समर्सेटा**ला पुनः कामावर बोलावण्याविषयीं, **हेन्री**ला समजूत घालून प्रवत्त केलें. तेव्हां, गादी मिळण्याचा कधीं तरी कदाचित् योग आला असता तो गमावला, आणि राज्यकारभारांत वजन होतें तेंही गमावलें, असें दोन्हीकडून झालेलें नुकसान त्या **यार्का**च्या मनाला अतिशयच खेदकारक झालें. तेव्हां तो शस्त्र धरून उठला, आणि **साल्झबरी, नेव्हिल्ल,** आणि **वारिक,** ह्यांचे अर्ल त्याला मिळाले, आणि त्यानें **सेन्ट आल्बन्स** एथें राणीच्या पक्षाचा पराभव केला. त्या लढाईंत **समर्सेट** हा ठार मारला गेला.

सेन्ट आल्बन्सची लढाई.

वॉर्स आफ् धि रोझिझ (गुलाबांचीं युद्धें) म्हणून ज्यांना म्हणतात त्यांची सुरवात झाली. **लांकास्ट्रियन्स,** किंवा राणीच्या पक्षाचे लोक, तांबडा गुलाब आपल्या आंगावर वापरीत. तीच त्यांची पूर्वींपासूनची नेहमीची निशाणी होती. **यार्किस्ट्स,** म्हणजे **यार्कच्या ड्यूकाच्या** पक्षाचे लोक, ह्यांनीं पांढरा गुलाब ही आपली निशाणी म्हणून पसंत केली; आणि नंतर जो झगडा जुंपला त्यांत, एकवेळ ह्यांची, एकवेळ त्यांची, अशी सरशी होई. १४५५ त राजाला पुनः एकवेळ वेड लागलें, आणि **यार्कचा ड्यूक** हा राज्यसंरक्षक झाला. नंतर राजा, वेड जाऊन पुनः शुद्धीवर आला तेव्हां, राणी आणि तो **ड्यूक** ह्यांच्या दरम्यान समेट करण्याविषयीं त्यानें प्रयत्न केला. परंतु **राणी मार्गरेट** हिला आपल्या पुत्राच्या हक्कांविषयीं चिंता होती. तिनें **यार्कच्या** विरुद्ध कारस्थान करून **पार्लमेंटाला** एक **"बिल्ल आफ् आट्टेन्डर,"** म्हणजे दूषित करण्याच्या कायद्याचा मसूदा, पसार करून आक्ट (कायदा) करण्याविषयीं प्रवृत्त केलें. त्या **बिल्लांत** त्या **यार्काला** आणि त्याच्या मित्रांना राजद्रोहाच्या गुन्हेगारांसारखे मृत्यूच्या सजेला पात्र असे अपराधी ठरविलें होतें. कोणाही दूषित ठरविलेल्या माणसाला, कायद्याच्या स्थापित रीतरिवाजावांचून, **पार्लमेंटाला,** त्यावर अपराध लागू करून, शिक्षा ठरवितां येत असे, आणि त्याच्या कुटुंबाला किंवा कुळाला सदा काळोखी लागून तें आपल्या मालमत्तेस मुके. हीं युद्धें चालू असतां एका पक्षाचे लोक, त्यांकडे सत्ता येई तेव्हां, दुसऱ्या पक्षांतील प्रमुख प्रमुख लोकांना **पार्लमेंटाच्या** द्वारें दूषित ठरवीत, आणि लढायांत जितके बडे

वॉर्स आफ् धि रोझिझ, १४५५ पासून १४८५ पर्यंत.

बिल्ल्स आफ् आट्टेन्डर.

लोक खपले, तितकेच बहुशः ह्या दूषित ठरविण्याच्या प्रकारानें प्राणांस मुकले. त्या बिल्ल आफ् आट्टेन्डरनें (दूषित ठरविणाऱ्या कायद्यानें) यार्कोला कांहींच धका पोहोंचला नाहीं, कारण तो त्यासमयीं हातीं लागूं नये इतका दूर **आयर्लंडांत** होता; आणि १४६० त तो फौज घेऊन **इंग्लंडास** माघारा आला तेव्हां, **नार्थहाम्टन** एथें जी लढाई झाली तींत त्याचा जय झाला, आणि **सहाव्या हेन्रीला** धरून कैदकेलें, आणि **मार्गरेट** ही आपल्या पुत्रासह **स्काट्लंडांत** पळून गेली.

नार्थहाम्टनची लढाई, माहे जूलई १४६०.

नंतर तो **यार्कचा ड्यूक** गादीवर आपला हक्क सांगूं लागला, आणि त्या सालच्या शरत्कालांत जें **पार्लमेंट** भरलें, त्यानें त्या अल्पवयस्क **एड्वर्ड प्रिन्स आफ् वेल्स** ह्याला एका बाजूस ठेवून, त्या **यार्कच्या ड्यूकाला हेन्रीच्या** मागें गादीचा मालक नेमलें. असें असतां पुढें पांच महिन्यांनीं **वेक्फील्ड** एथें जी लढाई झाली तिनें हें सर्व पारडें फिरलें. तींत **लांकास्ट्रियन** पक्षाच्या लोकांचा जय झाला, **यार्कचा ड्यूक** ठार मारला गेला, आणि त्याचा मुलगा, **रट्लंडचा अर्ल**, ह्याचा त्या लढाईनंतर दग्यानें खून झाला.

वेक्फील्डची लढाई, तारीख २४ डिसेंबर १४६०.

नंतर **रिचर्डाचा** वडील मुलगा, **एड्वर्ड**, हा बापाच्या मरणानें **यार्कचा ड्यूक** झाला. त्यानें तो झगडा पडूं न देतां पुढें चालविला. त्यानें **हेरिफर्डशायरांत मार्टिमर्स क्रास्** एथें **पेंब्रोकच्या अर्लाचा** पराभव केला, आणि तो थेट **लंडनावर** चाल करून आला. इंग्लंडच्या उत्तरेकडील मुलूख **लांकास्ट्रि**-

मार्टिमर्स क्रास्सची लढाई, १४६१.

यन्सांना अनुकूल होता, तरी मोठमोठीं व्यापाऱ्यांचीं शहरें **यार्केच्या** घराण्याचीं अढळ पुरस्कर्तीं होतीं. **वारिकचा अर्ल** हा राणीवर हल्ला करीत असतां त्याचा राणीनें पराभव करून, ती **सहाव्या हेन्रीला** सुरक्षित उत्तरेकडे घेऊन गेली. इतक्यांत **एड्वर्ड** (यार्कच्या ड्यूकाचा पुत्र) **लंडनांत** शिरला होता, आणि "**राजा एड्वर्ड** बहुकाल वांचो" अशा आरोळ्यांनीं तेथील लोकांनीं त्याला सलामी दिली. त्या शहरांतले लोक **हेन्रीच्या** दुबळ्या अमलाला कंटाळलेले होते, आणि बलाढ्य राजा आपणांस प्राप्त होऊन त्याच्या सत्तेखालीं आपणांला विश्रांति मिळेल अशी ते आशा करून होते. पुढें दोन दिवसांनीं **वारिकचा अर्ल लंडन** शहरांत येऊन पोहोंचला, **यार्कच्या** पक्षाचे लार्ड्स (बडे लोक) एकत्र जमले, आणि त्यांनीं १४६१ त मार्चच्या ४ थ्या तारिखेस, **एड्वर्ड** राजा झाला म्हणून जाहीर केलें.

एड्वर्ड राजा झाला असें जाहीर केलें जातें, १४६१.

परंतु त्याचा विजय झाला त्याचा उपभोग घेण्याला **एड्वर्डाच्यानें** थांबवलें नाहीं, कारण राणी **उत्तरेकडे** मोठी फौज जमवीत होती म्हणून तिकडे तो आणि **वारिक** हे दोघे त्वरेनें गेले. दोहींकडल्या फौजांची **यार्कशायरांतील टाउटन फील्ड** नांवाच्या ठिकाणीं गांठ पडली, आणि तेथें साऱ्या युद्धांतील अतिशय रक्तपाताची किंवा कत्तलीची लढाई झाली. २०००० **लांकास्ट्रियन्स** लोक रणभूमीवर मरून पडले, आणि **यार्किस्ट्सही** जवळ जवळ तितकेच मेले, परंतु त्यांचा जय झाला. **हेन्री** आणि **मार्गरेट** ह्या उभयतांनीं पळून जाऊन **स्कार्टडांत** आश्रय

टाउटनची लढाई, तारीख २९ मार्च १४६१.

केला, पुष्कळ बडे लोक मारले गेले, किंवा त्यांना देहांत शासनें केलीं, आणि एड्वर्ड हा लंडनास माघारा आला, आणि त्याला १४६१ त जूनच्या २८ व्या तारिखेस, वेस्टमिन्स्टर एथें राज्याभिषेक झाला.

प्रकरण १२.

यार्कचें घराणें

चौथा एड्वर्ड, १४६१–१४८३.　　तिसरा रिचर्ड, १४८३–१४८५.

पांचवा एड्वर्ड, एप्रिल–जूलई १४८३.

पुढल्या दहा वर्षांत सांगावयाचें म्हटलें म्हणजे, दुर दुरून चकमकी आणि मोठ्या लढाया, ह्यांच्या लांबट वृत्तांताशिवाय दुसरें कांहीं नाहीं. आपला पति आणि पुत्र ह्यांच्याकरितां गादी परत मिळविण्यासाठीं, मार्गरेट राणी शौर्यानें झुजली. १४६४ त हेज्लिमूर आणि हेक्सहाम एथील लढायांत, तिला फ्रेंचांकडून आणि स्काटांकडून कुमक असतांही, तिचा पराभव झाला. नंतर ती आपल्या पुत्रासहवर्तमान फ्लांडर्स देशांत पळून गेली, आणि हेन्री राजा, लांकाशायरांत लपून राहिला असतां, त्याला धरून कैदकरून टौअरांत (लंडनच्या किल्ल्यांत) पाठविलें. त्या काळीं त्या टौअराचा, राजमंदिर आणि किल्ला, ह्या दोन्ही प्रकारांनीं उपयोग होत असे. तेथें त्याला सुदामत पण बंदोबस्तानें ठेवलें होतें.

सहावा हेन्री टौअरमध्यें कैदेंत पडतो.

दरम्यानच्या वेळांत, **सर जान ग्रे** ह्याची विधवा, **एलिझाबेथ वूड्व्हिल्ल**, नांवाची होती, तिच्याशीं **एड्वर्डानें** लग्न करून **वारिक**च्या **अर्ला**ला फार चिरड आणली. राजाचा एकाद्या **फ्रेंच** राजपुत्रीशीं विवाह करवून त्याचें ऐश्वर्य सुदृढ करावें, किंवा, जर तशी गोष्ट घडून न आली तर, त्याला आपली एक मुलगी द्यावी, असा **वारिक** संकल्प करून होता. आतां **एड्वर्डानें**, संपत्तीनें किंवा पदवीनें थोर नाहीं, अशा स्त्रीशीं लग्न केलें एवढेंच नव्हे, परंतु तिचा बाप, **लार्ड रिव्हर्स**, व तिचे इतर नातलग, ह्यांना तो महत्वाचे हुद्दे देऊं लागला. **वारिका**नें नंतर आपली कन्या, **इसाबेला नेव्हिल्ल**, हिचें, एड्वर्डाचा भाऊ, **क्लारेन्स**चा **ड्यूक**, ह्याच्याशीं लग्न केलें. तो ड्यूक गादीला **एड्वर्डा**च्या पाठचा वारस होता, म्हणून **वारिका**च्या त्या कृतीनें **एड्वर्ड** राजा नाखुश झाला.

राजकीय लग्नें.

ह्या वेळेच्या सुमारास **इंग्लंड**च्या उत्तरेकडे एक **लांकास्ट्रियन** तरफेच्या लोकांचें बंड उद्भवलें, आणि तें फार दूरवर पसरलें. पुढें **आक्सफर्डशायरां**तील **एज्जकोट** नांवाच्या गांवाजवळ लढाई झाली, तींत **एड्वर्डा**च्या पक्षाचा पराभव झाला, आणि त्याचे पुष्कळ बडे लोक मारले गेले. त्यांत त्याच्या राणीचे कित्येक नातलग होते. तो स्वतः, जवळ रक्षण करणारें सैन्य कांहीं नसून एकटा राहिला, तेव्हां **वारिका**चा भाऊ, **आर्चबिशप नेव्हिल्ल** याच्या हातीं सांपडून तो थोडा वेळ कैदेंत होता. तथापि त्याला कैदेंतून सोडून **लंडना**स माघारें जाऊं दिलें, आणि तेथें पावल्यावर त्यानें लवकरच, **वारिक** आणि आपला भाऊ **क्लारेन्स**, हे

एज्जकोटची लढाई, १४६९.

दोघेही राजद्रोही आहेत, असा त्यांविरुद्ध जाहीरनामा लावला, त्यामुळें त्यांना **फ्रान्स** देशीं पळून जाणें भाग आलें. तेथें **वारिक** पदच्युत झालेल्या **मार्गरेट राणीला** भेटला, आणि माझी मुलगी **आन** हिला आपला पुत्र, **लांकास्टरचा एड्वर्ड, प्रिन्स आफ् वेल्स,** ह्याला बायको करण्यासाठीं स्वीकारून वाक्प्रतिग्रह करून ठेवा, म्हणजे मी, गादी परत मिळविण्याच्या कामीं आपणास मदत करीन, असें त्यानें तिच्याशीं बोलणें लाविलें. ह्या लग्नाचा योग जमून येईल तर, **यार्किस्ट,** म्हणजे **यार्कच्या** घराण्यांतला, **क्लारेन्स,** ह्याला लग्न करून दिलेली आपली कन्या **इसाबेला,** किंवा **लांकास्ट्रियन** घराण्यांतला, **प्रिन्स आफ् वेल्स,** ह्याच्याशीं लग्नाचा वाग्निश्चय करून ठेवलेली आपली दुसरी कन्या **आन,** ह्या दोघींपैकीं कोणती तरी एक गादीवर खास बसेल, अशी **वारिक** आशा करून होता.

वारिक हा मार्गरेटला मिळतो.

मार्गरेट राणी तो वाक्प्रतिग्रह करून ठेवण्यास कबूल झाली. नंतर **वारिक डार्टमौथ** एथें जाऊन जमिनीवर उतरला. तेव्हां, आपला विश्वासघात केला असें पाहून, **चौथा एड्वर्ड, फ्लांडर्स** देशांत पळून गेला. त्याची राणी, **एलिझाबेथ वूड्विह्ल,** हिनें **वेस्टमिन्स्टर** नांवाच्या देवळांत आश्रयस्थान होतें त्याचा आश्रय केला. तेथें, तिचा सर्वांत वडील पुत्र, जो पुढें **पांचवा एड्वर्ड** ह्या नांवानें हीनभाग्य राजा झाला, त्याचें जन्म झालें. नंतर त्या बिचाऱ्या दुबळ्या **हेन्रीला** १४७० त आक्टोबरच्या ५ व्या तारिखेस **टौअर** मधून बाहेर काढलें, आणि त्यानें सहा महिने

एड्वर्ड पळून जातो.

सहावा हेन्री पुनः सहा महिने राज्य करतो.

पुनः राज्य केलें. ह्या कृत्यानें वारिकाला "किंग मेकर (राजे करणारा)" हें निंदासूचक किंवा ठेंगमताचें नांव मिळालें. परंतु आतां आपण शेवटीं, जय आणि अपजय ह्यांच्या ह्या कंटाळवाण्या झुलाझुलीच्या खेळाच्या समाप्ती जवळ जवळ येत आहों. बर्गंडीच्या ड्यूकानें एड्वर्डाच्या बहिणीशीं लग्न केलेलें होतें, त्यापासून एड्वर्डानें कुमक मिळविली, आणि परदेशीय शिपायांची लहानशी तुकडी बरोबर घेऊन येऊन, यार्कशायरांत बहात्तर वर्षांपूर्वी ज्या ठिकाणीं चौथा हेन्री येऊन जमिनीवर उतरला होता, त्याच ठिकाणीं जमिनीवर उतरला. तेव्हां त्याचा भाऊ क्लारेन्स हा येऊन त्याला मिळाला. नंतर ते दोघे कूच करून लंडनास गेले. तेथें एड्वर्डाचा पुनः जयघोषपूर्वक सत्कार झाला. त्यानें वारिकाला बार्नेट एथें लढाई दिली. वारिक त्या लढाईत ठार मारला गेला. नंतर मार्गरेट राणीनें जमवतील तितके शिपाई जमा करून, एड्वर्डाला ग्लास्टरशायरांत ट्यूक्सबरि एथें गांठलें. तेथें तिचाही पूर्ण पराभव झाला, आणि तिचा तरुण पुत्र, प्रिन्स आफ् वेल्स, ह्याला एड्वर्ड राजाच्या समक्ष, रणभूमीवर भोसकून ठार मारलें. पुढें एका पंथ्रवड्यानें सहावा हेन्री टौअर मध्यें वारला. हजार वांट्यांनीं त्याचा खूनच केलेला असावा असें दिसतें, आणि तो दीर्घकालपर्यंत चाललेला झगडा संपला. मार्गरेट राणीला कैदेंत टाकलें. परंतु तिचा बाप रेने ह्यानें तिला १४७५ त खंडणी देऊन सोडविलें, आणि ती फ्रान्स देशांत परत गेली.

ट्यूक्सबरीची लढाई तारीख ४ माहे मे १४७१.

शेवटीं देश शांत झाला; मात्र इतकें खरें कीं, ह्या साऱ्या काळांत बडे लोक आणि त्यांच्या पदरचे नौकर हे एकमेकांचा संहार करीत होते, परंतु नवीन मध्यम स्थितींतल्या लोकांचा वर्ग, म्हणजे धारेकरी, खातेपिते शेतकरी गृहस्थ, छोटे छोटे जमीनदार, उदीमधंदा करणारे, आणि व्यापारी, ह्यांची उत्तरोत्तर चढती कळा होत आली होती. लढाया चालल्या असत, त्यांत ह्या लोकांचा बिलकूल संबंध नसे. त्या केवळ पक्षापक्षांच्या झुंजी असत, आणि सामान्य जनसमुदाय त्या भानगडींत पडत नसे. तरी, **नार्फक** मधील **मार्गरेट पास्टन** नांवाच्या एका कुलीन बाईनें ह्या कालीं लिहिलेलीं कांहीं मनोरंजक पत्रें आहेत त्यांवरून कळतें त्याप्रमाणें, सामान्य जनसमुदायांतील लोकांचीं घरें जबरीनें फोडून आंत शिरून जिन्नसपानस घेऊन जात, तेव्हां त्यांची दाद लागणें मुष्किल होतें. परंतु एकंदरीनें मध्यम स्थितींतल्या लोकवर्गाची संपत्ति वाढत होती, आणि जेव्हां **एड्वर्डा**चा गादीकरितां झगडा संपला, आणि त्यानें **फ्रान्स** देशावर स्वारी करण्याचा विचार मनांत आणला (ती स्वारी त्यानें शेवटीं केली नाहीं परंतु **फ्रान्स**च्या राजाकडून वार्षिक पेनशन म्हणजे बैठें वेतन मिळूं लागल्यावर तो माघारा फिरला), तेव्हां, **"बेनेव्होलेन्स"** (परोपकारबुद्धीनें दान) किंवा बक्षीस ह्या नांवानें द्रव्य देण्याजोगे, असे त्याला श्रीमंत व्यापारी व इतर लोक पुष्कळ सांपडले. ह्यावरून द्रव्याची वाण नव्हती असें स्पष्ट होतें. हे **बेनेव्होलेन्सिझ** पहिल्या पहिल्यानें लोकांनीं स्वसंतोषानें दिले, कारण, शांतिसुख देणारें सरकार शहरांत राहणाऱ्या लोकांना अभिनंदनीय होतें. परंतु कांहीं काळ लोटल्यावर.

मध्यम स्थितींतील लोकांचा वर्ग ह्याची चढती कळा.

बेनेव्होलेन्सिझ.

तेच बेनेव्होलेन्सिझ हा एक लोकांना जाचच झाला. १४७९ त स्वेटिंग सिक्नेस (अति स्वेदक रोग) नांवाच्या एका सांतीच्या रोगाचा भयंकर घाला पडला, त्यानें शेंकडों लोक मृत्युमुखीं पडले; ह्या आपत्तीला न जुमानून, एकंदरीनें देश आबाद झाला.

एड्वर्डानें आपल्या कारकीर्दीच्या अवलीलाच स्वतःला जन्मपर्यंतचें काईम उत्पन्न करून घेतलेलें होतें, म्हणून, आठ वर्षांत त्यानें पार्लमेंट एकच वेळ पाचारण करून भरविलें, आणि राजा आणि कौन्सिल ह्यांच्या अधिकारांला बहुशः कसलीच अटक राहिली नव्हती. राजाचें आचरण अनीतीचें आणि बदफैलीचें असे. दुसऱ्या रिचर्डानें जशी केली होती तशी तो सर्व गोष्टींत अधिकारबलानें सक्ती करूं लागला, आणि लोखंडासारख्या कठोरपणानें तो अमल करूं लागला. तथापि तो लोकप्रिय होता, आणि त्याला आडवे येत त्या सर्वांची आहुति देऊन, त्यानें युक्तीनें स्वस्थता राखली. परंतु ती स्वस्थता फार मोल खर्चून त्यानें विकत घेतली, कारण, आपला द्रोह लोक करतील अशी त्याला फार भीति वाटे, आणि तिनें प्रवृत्त होऊन त्यानें प्रत्यक्ष आपला भाऊ, क्लारेन्सचा ड्यूक, ह्यावर दोषारोप करवून, १४७८ त फेब्रुअरीच्या १८ व्या तारिखेस, टौअरमध्यें त्याला जिवें मारविलें; कोणी म्हणतात कीं माम्सें नांवाच्या द्राक्षांच्या मद्याच्या पिंपांत त्याला बुडवून मारलें.

क्लारेन्सला जिवें मारविलें, १४७८.

हा प्रकार चालला असतां मध्यावधींत, वेस्टमिन्स्टर एथील पवित्रस्थानाच्या (देवळाच्या) एका लहानशा कोपऱ्यांत, जेथें पूर्वी एक भजनमंदिर आणि कांहीं भिक्षागृहें (धर्मशाला) होतीं तेथें, राजा आणि त्याचे बडे लोक कलह करून जें काम करीत होते, त्याहून फार महत्वाचें, इतकेंच नव्हे, परंतु शहरांतले व्यापारी आणि कारागीर

जें काम करीत होते त्याहून देखील कदाचित् महत्वाचें, असें काम एक पुरुष करीत होता. हा पुरुष, **वुइलियम काक्स्टन** नांवाचा होता. तो पोरवयांत असतां, **केंट** प्रांतांतून **फ्लांडर्स** देशीं गेला होता. तेथें त्यानें तीस वर्षे घालविलीं, आणि नंतर तो तेथून १४७६ त पहिला ठशांनीं छापण्याचा प्रेस, म्हणजे यंत्र, आपल्याबरोबर घेऊन माघारा आला. परदेशीं छापण्याच्या कलेचा उदय होऊन, ठोकळ्यांनीं छापलेलीं पुस्तकें छापण्याच्या कामांत लांकडी खोदलेले ठोकळे वापरीत ते माजी पडून त्यांच्या जागीं सहज काढतां घालतां यावे असे सर्व अक्षरांचे वेगळाले ठसे कसे हळू हळू तयार होऊन उपयोगांत येऊं लागले, ह्या गोष्टींचा इतिहास फार लांब आहे. परंतु **काक्स्टनानें इंग्लंडांत** छापण्याचें काम सुरू केलें, त्या वेळीं त्या सर्व गोष्टी सिद्ध झालेल्या होत्या. १४७६ सालाच्या पूर्वी ग्रंथांच्या आमच्या ह्या देशांत केलेल्या नवीन प्रती साऱ्या हातानें लिहाव्या लागत, आणि त्या प्रती किती विरळ, आणि मोठ्या मोलाच्या, असतील ह्याविषयीं सहज कल्पना करतां येईल. परंतु आतां **काक्स्टनानें** आपल्या निवांत कोपऱ्यांत, **एड्वर्ड राजा**, आणि **ग्लास्टरचा ड्यूक, रिचर्ड**, ह्यांच्या आश्रयाखालीं, अनेक काव्यग्रंथ छापले, आणि "धर्मोपाध्यायांकरितां उपासनापुस्तकें, धर्मोपदेशकांकरितां धर्मोपदेश किंवा धर्मकथनें, आणि नाइट्स आणि बारन्स ह्यांकरितां सरदारबहादरीचे इतिहास," छापून तो रोजचें पोटाला मिळवी. **"धि डिक्टेस आन्ड् सेइंग्स आफ् धि फिलासोफर्स"** (तत्वमीमांसकांच्या उक्ति आणि वचनें), हा १४७७ त त्यानें **इंग्लंडांत** छापलेला पहिला ग्रंथ होता. त्यामागून **चॉसर** कवीचे काव्यग्रंथ, आणि

काक्स्टन आणि त्याचा ठशांनीं छापण्याचा प्रेस (यंत्र), १४७६.

"मार्टे डि आर्थर" ह्या नांवाची **साक्सनांच्या आर्थर** नांवाच्या वीराची कादंबरी, हे ग्रंथ छापले. ह्यांशिवाय, **रेनर्ड धि फॉक्स** (कोल्ह्याची गोष्ट) आणि **धि हिस्टरी आफ् ट्रॉय** (ट्रॉयचा इतिहास) हे व ह्यांसारखे पुष्कळ परदेशीय ग्रंथ ह्यांचीं त्यानें भाषांतरें करून छापलीं. परंतु जे वास्तविक ग्रंथ त्यानें उत्पन्न केले त्यांहून विशेष महत्वाची गोष्ट म्हटली म्हणजे ही कीं, तो **१४९१** च्या सुमारास मरण पावला तेव्हां, ज्या मुद्रणकलेनें (छापण्याच्या कलेनें) सर्व दुनियेंत असले अद्भुत फेरफार केले आहेत, ती **इंग्लंडांत** स्थापित झालेली होती.

त्या सालाच्या पूर्वीच पुनः आपत्ति उद्भवलेली होती. १४८३ त एप्रिलच्या ९ व्या तारिखेस, **चौथा एड्वर्ड** मरण पावला. त्याच्या मागें त्याचे दोघे अल्पवयस्क पुत्र राहिले; एक, **एड्वर्ड, प्रिन्स आफ् वेल्स,** हा वयानें तेरा वर्षांचा होता, आणि दुसरा, त्याचा भाऊ **रिचर्ड, यार्कचा ड्यूक,** हा वयानें दहा वर्षांचा होता. ह्या बिचाऱ्या दोघां लहान मुलांच्या संबंधानें दुसरा एक झगडा सुरू झाला.

पांचवा एड्वर्ड, एप्रिल तागाईत जूलई, १४८३.

जेव्हां **चौथा एड्वर्ड** राजा वारला, तेव्हां अधिकाराकरितां एकदम उडीवर उडी घालण्यास सिद्ध असे दोन पक्ष होते. राणी आणि तिचे नातलग, ह्यांचा एक पक्ष, आणि त्या राजाचा भाऊ, **ग्लास्टरचा ड्यूक, रिचर्ड,** ह्याचा दुसरा पक्ष. **प्रिन्स आफ् वेल्स, एड्वर्ड,** हा, आपल्या आईचा भाऊ, **लार्ड रिव्हर्स,** आणि आपला सावत्र भाऊ, **सर रिचर्ड ग्रे,** ह्या उभयतांच्या रखवालीखालीं

लड्लो एथें होता. राणी **वेस्टमिन्स्टर** एथें होती. **कौन्सिलानें**, मला आपल्या मुलाची आणि राज्याची पालनकर्त्री करावें असें तिनें हक्कानें मागणें केलें. परंतु कौन्सिलदार, **ग्लास्टरचा ड्यूक, रिचर्ड**, ह्याला संरक्षक करावें असें इच्छित होते, आणि तो **रिचर्ड** त्या समयीं **यार्क** एथें लार्ड–लेफ्टेनंट ह्या हुद्द्यावर असून अमल करीत होता, तेथून त्यांनीं त्याला मुजरत निरोप पाठवून बोलावलें. राणीच्या पक्षाचा एकदम चुराडा करून टाकावा असा त्या **रिचर्डानें** निश्चय केलेला असावा असें दिसतें. **लंडनास** येतांना मार्गांत तो आणि **बकिंग्हमचा ड्यूक** ह्या दोघांची मिळून, त्या अल्पवयस्क राजपुत्राला बरोबर घेऊन **रिव्हर्स** आणि **ग्रे** हे दोघे **लंडनास** येत होते, त्यांची गांठ पडली तेव्हां, त्या दोघांना त्यांनीं **पकडून** कैदकरून **यार्कशायरांतील पान्टिफ्राक्ट** नांवाच्या किल्ल्यांत पाठविलें.

रिव्हर्स आणि ग्रे ह्या दोघांना पकडून अटकेंत ठेवलें.

नंतर त्या राजपुत्राला **रिचर्डानें** सांगितलें कीं, तुझा मामा आणि सावत्र भाऊ ह्या उभयतांनीं तुला दग्यानें शत्रूंच्या स्वाधीन करून राज्य बळकावण्याची मसलत केलेली होती. तें ऐकून त्या गरीब मुलाला रडें कोसळलें, आणि त्यानें आपल्या त्या आतांच्या तरफेचें बोलून त्यांवर ठेवलेल्या दोषांचें निवारण केलें, परंतु तें सारें व्यर्थ गेलें. पुनः कधींही **रिव्हर्स** आणि **ग्रे** हे दोघे त्याच्या दृष्टीस पडले नाहींत.

आपल्या भावाला पकडून कैदकेलें हें वर्तमान राणीनें ऐकलें तेव्हां तिला दहशत पडली, आणि आपला धाकटा मुलगा, आणि आपल्या मुली, ह्यांस घेऊन ती **वेस्टमिन्स्टर आबींतील** आश्रयस्थानांत पळून गेली; आणि मेच्या ४ थ्या तारिखेस, जेव्हां तो

अल्पवयस्क राजा, आणि ते दोघे **ड्यूक्स**, ह्यांनीं **लंडनांत** प्रवेश केला, तेव्हां राणीच्या विरुद्ध पक्षांतला नवीन बडे लोकांपैकीं एक **लार्ड हेस्टिंग्स** नांवाचा गृहस्थ होता, त्याच्या वजनदारीनें मुख्यत्वेंकरून **रिचर्डला** राज्यसंरक्षक नेमलें. **पांचव्या एड्वर्डला**, पहिल्यानें, **सेंन्ट पालच्या** देवळाजवळ **लंडनच्या बिशपाचा** वाडा होता त्यांत उतरविलें होतें. परंतु पुढें लवकरच **टौअरांतील** राजमंदिरांत त्याला राहवयास नेलें, आणि आपला धाकटा मुलगा, **यार्कचा ड्यूक**, ह्याला तेथें त्याबरोबर राहूं देण्याला, समजून सांगितल्यावर, राणी दुर्भाग्यामुळें कबूल झाली.

रिचर्डला राज्यसंरक्षक नेमलें, तारीख ४ मे.

एथवर सर्व स्पष्ट आहे. परंतु आतां **रिचर्डाचा** (ग्लास्टरचा ड्यूक रिचर्ड ह्याचा) पहिल्यापासूनच गादी बळकावण्याचा बेत होता, किंवा चहूंकडून त्यावर चालू असलेल्या फंदफितुरांपासून आपला बचाव करण्यास त्यानें प्रथम आरंभ करून नंतर महत्वाकांक्षा उत्पन्न होऊन तो गादी बळकावण्यास प्रवृत्त झाला, हें सांगणें फार कठीण आहे. त्याच्या शत्रूंनीं त्याचें वर्णन केलेलें आहे तितका तो पाहतांच त्रासानें मागें सरावें असा दिसणारा, किंवा अप्रीतिजनक बिलकूल नव्हता. तो सुकुमार असून त्याच्या एका खांद्यांत थोडा ऐब होता. त्याची मुद्रा विचारी, परंतु जोमदार, रीतभात खुश करणारी, आणि सवई बुद्धिमत्तेच्या होत्या. तो कपटी आणि वाईट काम करण्याला निश्शंक होता ह्यांत संशय नाहीं; परंतु तो, त्याचा भाऊ, **चौथा एड्वर्ड**, जिवंत होता तोंपर्यंत, त्याच्याशीं निरंतर खरा किंवा निष्कपट होता, आणि पुढें त्यानें केलेल्या गु-

रिचर्डाचे गुणदोष.

त्यांची योजना त्यानें आरंभीं केलेली नसावी इतकी तरी आशा आम्हांस करण्यास हरकत नाहीं.

वर सांगितलेली हकीकत झाल्यावर एक महिना लोटला. राणीच्या पक्षाचे लोक कारस्थानें करीत होते, आणि आपल्याला संधि केव्हां मिळते म्हणून टपत बसले होते, आणि **रिचर्ड** (ग्लास्टरचा ड्यूक) हा आपणावर अतिशय मोठें जोखीम घेत आहे असें वाटून, **लार्ड हेस्टिंग्स** ह्यानें आपला पक्ष पालटला. तेव्हां अकस्मात् जूनच्या १३ व्या तारिखेस, **रिचर्ड कौन्सिलाच्या** दिवाणखान्यांत (कचेरींत) शिरला, आणि आपल्या विरुद्ध **लार्ड हेस्टिंग्स** ह्यानें मसलती मांडल्या आहेत

लार्ड हेस्टिंग्स ह्याचा शिरच्छेद, तारीख १३ जून.

असा त्यावर आरोप ठेवून, त्याला आपल्यावरील आरोपाच्या निवारणार्थ कांहीं बोलूं न देतां, त्यानें (रिचर्डानें) एक हत्यारबंद लोकांची टोळी आंत बोलावून त्यांकडून त्याला (लार्ड हेस्टिंग्स ह्याला) पकडून नेववून दिवसाचे पहिले दोन प्रहर भरण्यापूर्वी, **टौअर ग्रीनवर** (टौअर पुढील हिरवळीच्या मैदानांत) एका लांकडाच्या टोणक्यावर त्याचा शिरच्छेद करविला. पुढें नऊ दिवसांनीं, **सेन्ट पाल्स क्रास्स** एथें एका धर्मोपदेशकानें, आणि **गिल्ड हालांत बकिंग्हमच्या** ड्यूकानें, लोकांना एक थोतांड सांगितलें कीं, **एलिझाबेथ वूड्व्हिल्** ही **चौथ्या एड्वर्डाची** धर्मशास्त्रानुसार लग्नाची बायको नव्हे, कारण तिच्याशीं विवाह करण्यापूर्वी, दुसऱ्या एका स्त्रीला त्याचें वाग्दान झालेलें होतें, ह्यास्तव **एलिझाबेथ** राणीच्या पोटीं झालेले ते दोघे राजपुत्र, दासीपुत्रासारखे असून गादीचे यथान्याय वारस नव्हत. असे ते राजपुत्र कदाचित् गैरवारस ठरते, तथापि देखील, **रिचर्ड**, आणि गादी

१७

ह्यांच्या दरम्यान क्लारेन्सचा पुत्र, वारिकचा तरुण अर्ले, हा एक आडकाठीसारखा होता; परंतु त्या अर्लाच्या बापाला बिल्ल आफ् आटेन्डर होऊन दूषित ठरविलेला होता, म्हणून त्या अर्लाला एका बाजूस टाकलें. जूनच्या २५ व्या तारिखेस, लंडनचा मेयर, आणि त्या शहरांतले लोक, व आल्डर्मेन, ह्यांसहवर्तमान, लार्ड्स आणि कामन्स ह्यांच्या एका समुदायानें, रिचर्डाला मुकुट किंवा गादी अर्पण केली, आणि २६ व्या तारिखेस, वेस्टमिन्स्टर हाल (वेस्टमिन्स्टर हाल नांवाचें राजमंदिर) ह्यांत प्रवेश करून तेथील संगमरवरी पाषाणाच्या खुर्चीवर (सिंहासनावर) तो, तिसरा रिचर्ड ह्या नांवानें आरूढ झाला. पुढें थोड्या दिवसांनीं, अर्ले रिव्हर्स आणि सर रिचर्ड ग्रे ह्यांचीं पान्टिफ्राक्ट एथें डोकीं मारलीं. ह्या प्रकारानें पांचव्या एड्वर्डाची कारकीर्द संपली.

ते दोघे राजपुत्र ह्यांना अपबीभव म्हणजे दासीपुत्र ठरविलें.

तिसरा रिचर्ड, १४८३–१४८५.

परंतु त्या कारकीर्दीची खेदकारक समाप्ति अजून व्हावयाची होती. जो थाटमाट त्याच्या पुतण्याकरितां तयार केलेला होता त्या साऱ्या थाटमाटानें, १४८३ त जूलईच्या ६ व्या तारिखेस, रिचर्डाला राज्याभिषेक झाला. नंतर, इंग्लंडच्या उत्तरेकडील मुलुखांतील लोकांना तो नेहमी फार आवडता होता, तिकडे जाण्याकरितां तो आपल्या राणीसहवर्तमान निघाला. तो तिकडे गेलेला असतां मागें, आपण त्याला गादी बळकावण्याच्या कामीं

साहाय्य केलें म्हणून **बकिंगहमच्या ड्यूकाला** पश्चात्ताप झाला असावा असें दिसतें, आणि त्या दोघां राजपुत्रांना कैदेंत ठेवलें होतें म्हणून लोक कुरकुरूं लागले. इतक्यांत लवकरच, त्या दोघां राजपुत्रांचा **टौअरांत** वध केला, अशी अवई उठून दूर दूरवर पसरली. तथापि असलें घोर कर्म कोणाच्यानें करवलें असेल, ही गोष्ट लोक खरी मानीनात, आणि **रिचर्ड** त्या दोघां मुलांना हाजीर करून आपली कीर्ति निर्मल करील अशी ते वाट पाहत होते. परंतु **रिचर्डानें** तसें कधींही केलें नाहीं. पुढें सुमारें दोनशें वर्षांनीं, **दुसरा चार्लस** ह्याच्या कारकीर्दींत, त्या राजपुत्रांच्या उमरींच्या दोघां मुलांचीं प्रेतें **व्हाइट टौअरच्या** (पांढऱ्या बुरुजाच्या) जिन्याखालीं सांपडलीं, आणि **वेस्टमिन्स्टर आबींतील सातव्या हेन्रीच्या चापेलांत** (खासगी भजनमंदिरांत) तीं नेऊन पुरलीं. जरी तथ्य म्हणून काय तें आम्हांला माहीत नाहीं तरी, **रिचर्डाच्या** हुकुमानें त्या दोघां मुलांना त्यांच्या बिछान्यांत घुसमटवून मारलें आणि जिन्याखालीं पुरलें असें जेव्हां **सर जेम्स टिरेल** ह्यानें कबूल केलें, तेव्हां सत्य होतें तेंच त्यानें सांगितलें ह्यांत कांहीं संशय नाहीं.

त्या दोघां राजपुत्रांचा वध केला अशी अवई उठते.

ह्या वेळेपासून **रिचर्डाच्या** मनाची शांति म्हणून सर्वथा गेली. त्याला पश्चात्तापानें इतकी पीडा होऊं लागली कीं, तो स्वप्नांत दचकून उठे आणि मोठ्यानें ओरडे, असें त्याचे चाकर सांगत; इतकेंच नव्हे, परंतु त्यानें जें घोर कर्म केलें होतें, त्यायोगें तो आपल्या शत्रूंच्या कबजांत किंवा मुठींत आला. त्याच्या दोन वर्षांच्या अल्पकालिक कारकीर्दींत त्यानें अमल चांगल्या प्रकारें केला. व्यापाराच्या संरक्षणाकरितां त्यानें चांगले कायदे केले, आणि परदे-

शांत **इंग्लिश** लोक गेले असतां तेथें त्यांच्या रक्षणाची संस्था करणारा असा पहिला राजा तोच होय. त्यानें **पीझा** एथें राहणाऱ्या **इंग्लिश** लोकांकरितां, एका **फ्लारेन्टाइन** (फ्लारेन्स एथील रहिवासी) व्यापाऱ्याला, आम्ही ज्याला **"कॉन्सल"** (व्यापाराच्या संबंधाचा वकील) असें म्हणूं, अशा अधिकाऱ्याचें काम करण्यास नेमलें. **इंग्लंड**च्या उत्तरेकडून पत्रें घेऊन दौडत येणारे काईम जासूद ठेवणाराही तोच पहिला राजा होय. हा एका प्रकारचा प्रथमचा टपालचा बंदोबस्तच म्हणावयाचा; आणि **चौथ्या एड्वर्डा**नें जे "बेनेव्होलेन्सिझ" (उपकारार्थ देणग्या किंवा बक्षिसें) ह्या नांवाची पट्टी बसविली होती तीविरुद्ध त्यानें एक कायदा केला. ह्या चांगल्या गोष्टींच्या जणू भरतीलाच, त्यानें मुद्रणकलेची (छापण्याच्या कलेची), आणि पुस्तकांच्या विक्रयाची अभिवृद्धि केली. परंतु आपला द्वेष करतात, आणि आपला नाश करण्यासाठीं फंदफितूर चालू होते, हें तो जाणून होता.

रिचर्डाच्या कारकीर्दीतील सुधारणेच्या गोष्टी.

बकिंगहमचा **ड्यूक** हा आतां **रिचर्डा**च्या अगदीं विरुद्ध झालेला होता; तो राजवंशीय असल्यामुळें, गादीवर आपला हक्क सांगावा अशा विचारांत पहिल्यानें होता. परंतु **रिचमंड**चा **ड्यूक, हेन्री ट्यूडर,** ह्याला, **लांकास्ट्रियन** पक्षाच्या लोकांनीं, तो परदेशीं होता तेथून, मुजरत बोलावूं पाठविलें होतें, त्याच्याच हक्काला आपण पाठबळ द्यावें, ही गोष्ट, आपण मनांत आणलेल्या गोष्टीहून ज्यास्ती शाहणपणाची, असें पुढें लवकरच त्या **बकिंगहम**च्या ध्यानांत आलें. **यार्किस्ट** पक्षाचे लोक **रिचर्डा**चा द्वेष करीत, त्यांनीं असा उह्रू काढला होता कीं, **ट्यूडरानें**

हेन्री ट्यूडर ह्याला इंग्लंडास येण्यासाठीं बोलावणें होतें.

चौथ्या एड्वर्डाची कन्या **एलिझाबेथ** हिच्याशीं विवाह करून दोन्ही पक्षांचें एकीकरण करावें. हा **हेन्री ट्यूडर** कोण हें समजण्याला, **तिसऱ्या एड्वर्डाच्या** पुत्रांकडे, एक शतक माघारें गेलें पाहिजे (२१८ व्या पृष्ठावरील वंशावळ पहा), कारण, त्या **हेन्री ट्यूडराची** आई, **मार्गरेट बोफर्ट**, हें, **लांकास्टरचा** ड्यूक, **गान्टचा जान**, आणि त्याची तिसरी बायको, **काथरिन स्विन्फर्ड**, ह्या दंपत्याचें पणत्वंड होतें. हक्कासाठीं हें फारच दूरवर मागें जाणें होय, आणि इतकें करून देखील, तो हक्क अगदीं फुसका होता, कारण त्या **बोफर्ट**कुळांत उत्पन्न झालेल्यांना फक्त **दुसऱ्या रिचर्डानेंच** लग्नाच्या बायकोची, किंवा औरस संतति म्हणून ठरविलें होतें. तशांत **हेन्री ट्यूडराचा** बाप तरी, केवळ एक **वेल्श** जातीचा सामान्य गृहस्थ होता. तो गृहस्थ **ओएन ट्यूडर** ह्याचा पुत्र होता. त्या **ओएनानें पांचव्या हेन्रीची** विधवा, **फ्रान्सची काथरिन**, हिच्याशीं लग्न केलेलें होतें (२६६ व्या पृष्ठावरील वंशावळ पहा). असो, असल्या त्या **रिच्मंडच्या हेन्रीला** देखील स्वीकारण्याला **इंग्लिश** लोक राजी होते, ह्यावरून **रिचर्डापासून** मुक्त होण्याला ते किती उत्कंठित होते हें दिसून येतें.

रिच्मंडचा हेन्री इंग्लंडांत येऊन जमिनीवर उतरतो, तारीख ७ आगस्ट १४८५.

पहिला प्रयत्न तर व्यर्थ गेला. **रिचर्ड** जागृत होताच, आणि त्यानें **बकिंगहमाला** पकडवून त्याचा १४८३ त नोव्हेंबरच्या २ऱ्या तारिखेस शिरच्छेद करविला. **रिचर्डानें** आणखी दोन वर्षें राज्य केलें. १४८४ त त्याचा वडील पुत्र, गादीचा वारस, वारला. पुढें एक वर्षानें, १४८५ त आगस्टच्या ७ व्या तारिखेस, **रिच्मंडचा हेन्री** अवघीं २०००

माणसें बरोबर घेऊन **पेम्ब्रोकशायरांत मिल्फर्ड हेव्हन** एथें येऊन जमिनीवर उतरला, आणि तो तेथून पुढें कूचकरून निघाला. तो पुढें जाऊं लागला तसतशी त्याची फौज वाढत चालली. **रिचर्डाला**, हें मोठें अरिष्ट उद्भवलें आहे असें बिलकूल वाटलें नाहीं, तथापि तो **लेस्टर**पर्यंत पुढें गेला, आणि दोन्ही-कडच्या फौजांची **मार्केट बास्वर्थ** नांवाच्या गांवाबाहेर गांठ पडली. तेव्हां लढाई सुरू झाली न झाली तोंच, **लार्ड स्टान्ली** हा आपल्या सर्व शिपायांसह **रिचर्डाला** सोडून जाऊन शत्रूला मिळला, आणि दुसरा एक शिपायांचा समुदाय **नार्थंबर्लंडचा अर्ल पर्सी** ह्याच्या बरोबर शत्रूकडे गेला.

बास्वर्थ फील्डची लढाई, तारीख २२ आगस्ट १४८५.

तेव्हां सर्व आशा संपली असें **रिचर्डाच्या** लक्ष्यांत आलें. तो भित्रा नव्हता, म्हणून "**फितूर, फितूर**" अशी आरोळी ठोकून तो लढाईच्या घनचक्रींत घुसला, आणि तींत तो लढतां लढतां प्राणास मुकला. त्याचा मुकुट एका हॉर्थॉर्नच्या (एक कांटेरा वृक्षविशेष) झुडुपाखालीं पडलेला सांपडला, तो **हेन्रीच्या** मस्तकीं घातला. **वार्स आफ् धि रोझिझ**, म्हणजे गुलाबांचीं युद्धें, हीं, त्यांत झालेले रक्तपात, विश्वासघात, आणि खून, ह्या सर्व घोर कर्मांसह, एकदाचीं संपलीं. **रिच्मंडच्या हेन्रीनें** पुढें लवकरच **चौथ्या एड्वर्डाची** कन्या, **यार्कची एलिझाबेथ**, हिच्याशीं विवाह केला. ह्याप्रकारें त्यानें एकीकडे गादीला सुदृढ हक्क मिळविला, आणि एकीकडे **लांकास्टर** आणि **यार्क** हीं दोन प्रतिस्पर्धी घराणीं एक केलीं.

वार्स आफ धि रोझिझ ह्यांची समाप्ति.

वार्स आफ् धि रोझिझ ह्यांची समाप्ति होतांच, आपण **इंग्लंडां-**

तील **मध्यकालिक इतिहासाच्या**, अथवा **इंग्लंडांतील माध्यमिक युगांच्या इतिहासाच्या** समाप्तीला पावतों. त्या माध्यमिक युगांतल्या साऱ्या काळांत बडे लोक फार प्रबल होते, आणि राजा, म्हटला म्हणजे जणू, त्यांचा प्रमुख किंवा मुख्य जसा, तसा होता. तो वारंवार **बिशप्स** किंवा **धर्म**संबंधाचे बडे लोक, आणि **बारन्स** किंवा राजकीय संबंधाचे बडे लोक, ह्या उभयतांच्या लगामीं असे. शिवाय त्या काळांत **इंग्लंड**, हें, **यूरोप**खंडाचा एकादा भाग असावा, त्याहून कांहीं ज्यास्ती किंवा वेगळें नव्हतें. **इंग्लंडां**तले आणि **फ्रान्सां**तले बडे लोक हे वारंवार जवळजवळचे नातलग असत, आणि युद्धांत किंवा स्वस्थतेच्या काळांत, शिव्हल्रीच्या (सरदारबहादरी नांवाच्या संस्थेच्या) एका बंधनाखालीं सरदारबहादरी हेंच कोणी एक मोटें घराणें किंवा वंश मानून त्यापैकीं आम्ही आहों असें ते सर्व आपणांला लेखीत. **धर्म**ही **रोम**पासून तहद **इंग्लंड**पर्यंत एक होता. आमचे विद्वान पुरुष आणि धर्मोपदेशक हे वारंवार परदेशीय किंवा परदेशांत विद्याभ्यास केलेले तरी असत. **लंडनां**तील आमचें अतिऐश्वर्यवान किंवा बलाढ्य म्हणून जें व्यापाऱ्यांचें मंडल होतें, तें "**हान्शियाटिकलीग**" (जर्मनीच्या उत्तरेकडील शहरांनीं व्यापारसंबंधानें केलेला कट किंवा जूट) नांवाचें होतें. तें **बाल्टिक** समुद्राच्या कांठांवरून आलेल्या **जर्मन** लोकांचें होतें. आणि **इंग्लिश** राजांच्या दरबारांतील सर्वांत मोठे हुद्दे परदेशीयांकडे होते, हें त्या काळापर्यंत **इंग्लिश** लोकांचें सतत गाऱ्हाणें होतें.

माध्यमिक युगांत इंग्लंड आणि यूरोपखंड ह्यांचा निकट संबंध.

परंतु आतां कांहीं काळाच्या पूर्वीपासूनच जुनीं, बंधनें ढिलीं

होत चालली होतीं. मागल्या पन्नास वर्षांत प्राचीन बडे लोकांचीं घराणीं नष्ट होत आलीं होतीं. त्यांतून कांहीं

प्राचीन बडे लोकांचा नाश.

शंभर वर्षांच्या युद्धांत, आणि बाकीचीं पुष्कळ **गुलाबांच्या युद्धांत** नष्ट झालीं. ह्या आपआपसांतील युद्धांत एकटे राजकीय रक्ताचे राजपुत्रच ऐ-शींत एकटी कमी नाहीं इतके प्राणास मुकले; आणि जसें वारंवार घडे त्याप्रमाणें, जेव्हां बडे लोकांपैकीं एकाद्याला, **"बिल्ल आफ् आ-टेन्डर"** करवून दूषित ठरविलें जाई, तेव्हां त्याची वतनवाडी व इतर जिंदगी राजाला जाई. **सातवा हेन्री** गादीवर बसला तेव्हां, त्याच्या पहिल्या **पार्लमेंटांत**, ड्यूक्स, अर्ल्स, व्हाइकौंट्स, आणि बारन्स, हे सारे मिळून फक्त सत्तावीस होते. कांहीं गैरहाजीर असतील ह्यांत संशय नाहीं, कारण त्याला त्यांनीं राजा म्हणून अ-द्यापि मान्यच केलेलें नव्हतें; तथापि, ह्या हाजीर असलेल्या स-त्तावीसांत देखील कित्येक नवे केलेले बडे लोक होते.

ह्या उरलेल्या बडे लोकांपैकीं कांहीं फार बलाढ्य होते, हें खरें. त्या कालीं एक रिवाज होता, त्याला **"मेन्टिनन्स"** (पालनपो-षण) असें म्हणत, त्यानें त्यांचें बळ वाढलेलें होतें. त्या रिवाजानें,

मेन्टिनन्सचा रिवाज.

कोणीही बडा लोक आपल्या आसपासचे खाते-पिते शेतकरी, व इतर गृहस्थ, ह्यांपैकीं जे कोणी आपल्याकरितां लढावयास येतील त्यांना पोशाकपेहराव, आणि चपरासेसारख्या निशान्या देई, व त्यांचें संरक्षण करी. प-रंतु ह्या बलाढ्य बडे लोकांचे दिवस संपल्यासारखे होते. आतां बंदुकीच्या दारूचा उपयोग सामान्य वहिवाटींत आला होता. त्या योगें राजाच्या हातीं एक नवी शक्ति किंवा सामर्थ्य आलें, कारण तो आणि त्याचे प्रधान ह्यांकडे तोफा, आणि दारूगोळा व इतर

लढाईची सामग्री, ठेवण्याच्या कोठ्या, ह्यांवरील हुकमत आली, आणि तोफांची एक माळका, बडे लोकांचे तीरकमठेवाले आणि भालेवाले ह्यांना तेव्हांच उधळून देऊन त्यांच्या किल्ल्यांचा विध्वंस करूं शकती.

माध्यमिक युगांपासून अर्वाचीन काळांत संक्रमण.

मध्यावधींत, **इंग्लंडां**तील गृहस्थ लोक आणि मध्यम वर्गांतील लोक हे संपत्तीनें आणि महत्वानें समृद्ध होत चालले होते, आणि श्रीमान असल्यामुळें, किंवा राज्यकारभारांत उपयोग होत असल्यामुळें त्यांपैकीं जे चांगल्या किंवा उच्च स्थितींत असत ते, प्राचीन मगरूर बडे लोकांपेक्षां, राजाच्या आज्ञेंत वागणारे असत, आणि त्या लोकांना, परदेशांशीं युद्धांपेक्षां, स्वस्थता आणि व्यापार, ह्यांविषयीं परवा किंवा दरकार विशेष असे. ह्यावरून कळतें कीं, माध्यमिक युगें आणि अर्वाचीन काळ ह्यांच्या दरम्यानच्या मुख्य भेदांपैकीं एक हा भेद आहे तो हा, जुन्या वारन्स लोकांना स्वदेशाबाहेर युद्ध आणि सरदारबहादरी ह्यांविषयीं विशेष परवा असे, आणि नव्या बडे लोकांना, स्वदेशीं, मनुष्यव्यक्तिस्वातंत्र्य, व्यापार, ज्ञान, कला, आणि पदार्थविज्ञानशास्त्र, ह्यांची अभिवृद्धि व्हावी ही विशेष काळजी होती. **सातव्या हेन्रीच्या** कारकीर्दीला आरंभ करतांना आम्ही माध्यमिक युगांपासून अर्वाचीन काळांत प्रवेश करतों. नवीन वस्तुस्थितीच्या उपक्रमाला मार्ग तयार करण्याला तो राजा पुष्कळ प्रकारांनीं योग्य पुरुष होता.

भाग ५.

ट्यूडर–वंशीयांचा जबरदस्त अमल

ट्यूडरच्या घराण्यांतले राजे

यार्क.
चौथा एड्वर्ड.

लांकास्टर.
जान बोफर्ट,
मर्सेटचा ड्यूक.

वेल्स.
ओएन ट्यूडर,
बा. पांचव्या हेन्रीची विधवा,
फ्रान्सची काथरिन.

मार्गरेट बोफर्ट हिचा पति........एड्मंड ट्यूडर.

यार्कची एलिझाबेथ..........हिचा पति..........**सातवा हेन्री**,
ज. १४५६, मृ. १५०९,
का. १४८५–१५०९.

आर्थर,
हा १६ वर्षांचा
होऊन वारला.

मार्गरेट,
प. स्काट्लंडचा चौथा
जेम्स.
स्काट्लंडचा
पांचवा जेम्स.

आठवा हेन्री,
ज. १४९१, मृ. १५४७, का. १५०९–१५४७.
बा. १ आरागानची काथरिन.
२ आन बुलिन.
३ जेन सीमर.
४ क्लीव्हझची आन.
५ काथरिन हाउअर्ड.
६ काथरिन पार.

मेरी,
१ प. फ्रान्सचा बारावा लूइ.
२ प. सफकचा ड्यूक.
फ्रान्सेस ब्रान्डन,
प. हेन्री ग्रे.

मेरी,
स्काटांची राणी,
प. हेन्री स्ट्यूअर्ट.
लार्ड डार्न्ले.

इंग्लंडचा
पहिला जेम्स
आणि स्काट्लंडचा सहावा जेम्स.
हा इंग्लंडांतील स्ट्यूअर्ट
घराण्याचा पहिला
राजा.

मेरी,
ज. १५१६, मृ. १५५८,
प. स्पेनचा दुसरा फिलिप.
का. १५५३–१५५८,
ही आरागानच्या
काथरिनची
मुलगी.

एलिझाबेथ.
ज. १५३३, मृ. १६०३,
का. १५५८–१६०३.
ही आन बुलिनची
मुलगी.

एड्वर्ड,
ज. १५३७, मृ. १५५३,
का. १५४७–१५५३,
हा जेन सीमरचा
पुत्र.

लेडी जेन ग्रे.

प्रकरण १३.

ट्यूडराचें घराणें–धर्मसुधारणा

सातवा हेन्री, १४८५–१५०९.
|
आठवा हेन्री. १५०९–१५४७.

सातव्या हेन्रीच्या कारकीर्दीपासून आमच्या इतिहासांतील एका नवीन कालाचा आरंभ होतो. त्याला १४८५ त आक्टोबरच्या ३० व्या तारिखेस, **वेस्टमिन्स्टर** एथें राज्याभिषेक केला, आणि त्यानें पुढल्या वर्षी **यार्क**ची **एलिझाबेथ** हिच्याशीं विवाह केला, त्या योगें तीं दोन प्रतिस्पर्धी घराणीं (यार्क व लांकास्टर) एक झालीं.

सातव्या हेन्रीचें स्वरूप, आणि गुणदोष.

तो सडपाळत, शाहांगी, पुरुष असून, त्याचा चेहरा बुद्धिमत्तेचा, डोळे कैरे, आणि मुद्रा तेजस्वी व आनंदी, असे. ता मातृपक्षाकडून, **बोफर्टां**च्या कुळांत झालेला होता. तें कुल शाहण्या आणि विख्यात राजकार्यधुरंधर पुरुषांचें होतें. त्या **हेन्री**ला बुद्धिमत्ता त्या कुलापासून परंपरेनें आली होती. त्याची आजी **फ्रेंच** होती. तिच्यापासून त्याच्या आंगी युक्ति, आणि राजदौत्यसंबंधी चातुर्य पिढीजाद आलें होतें, आणि परागंदा होऊन तो **फ्रान्स** देशीं राहिला होता तेव्हां, परदेशीय राजकारणें समजून घेण्याचा त्याने उद्योग केला होता. आतां आपल्याला संपत्तीचा संग्रह करतां यावा, आणि ज्यांत राजाची सत्ता प्रबल असावी असें राज्य स्थापितां यावें, ह्यास्तव, स्वदेशीं स्वस्थता राखून, परदेशांशीं सख्य ठेवावें, हें त्याचें मुख्य लक्ष्य होतें.

पार्लमेंटानें त्याला, आणि त्याच्या वारसांना, गादी काईम दिली

आहे असा ठराव केला, आणि त्याचा बाप वेल्श होता त्यामुळें, वेल्स देश देखील त्यावर संतुष्ट होता, परंतु यार्किस्ट तरफेचे लोक अजून तडफडतच होते, कारण त्यांचा कैवार घेण्याला राजाची बायको एवढीच काय ती त्या घराण्यापैकीं होती. त्यांनीं चौथ्या एड्वर्डोची बहीण, बर्गंडीची मार्गरेट, आणि स्काट्लंडचा राजा, चौथा जेम्स, ह्यांच्या मदतीनें, गादीवर हक्क सांगणारे, एकामागून एक, असे दोन लटके वारस उभे केले. यार्कच्या घराण्यापैकीं वारिकचा अर्ल, तरुण एड्वर्ड, हा एक गादीला खरा वारस अजून जिवंत होता. तो एड्वर्ड, माम्सी नांवाच्या द्राक्षासवाच्या पिपांत बुडवून मारलेला जो क्लारेन्सचा ड्यूक, त्याचा पुत्र होता, आणि हेन्रीनें पूर्वीच सावधगिरी करून त्याला टौअरमध्यें ठेवलेलें होतें. परंतु १४८७ त एक बहाण्याचा वारिकचा अर्ल आयर्लंडांत प्रकट झाला, आणि त्याला किल्डेरच्या अर्लोचा आश्रय होता त्यामुळें, डब्लिन एथील कथीड्रलांत (बिशपाची गादी असलेल्या देवळांत) त्याला खरोखर राज्याभिषेक केला. हेन्रीनें खऱ्या वारिकच्या अर्लोला लंडनच्या लोकांस दाखवून, आणि १४८७ च्या जून महिन्यांत त्या तोतया अर्लोच्या फौजेचा न्यूआर्कोच्या नजीक स्टोक एथें पराभव करून, तें पाखंड मोडलें. तो तोतया करणारा, अखेरीस आक्सफर्ड एथील एका सांधकाम्या सुताराचा लांबर्ट सिम्नेल नांवाचा मुलगा ठरला, आणि तो राजाच्या बवरचीखान्यांत भांडेघांशा होऊन राहिला.

गादी हेन्रीच्या वारसांना मिळावी असा ठराव होतो.

यॉर्किस्ट, म्हणजे यॉर्कच्या घराण्याच्या पक्षाचे लोक, ह्यांचीं बंडे.

लांबर्ट सिम्नेल, १४८७.

ह्या बंडामुळें **हेन्रीचें** लक्ष्य **आयर्लंडाकडे** वळलें. तेथें जे **इं-ग्लिश** लोक जाऊन समुद्रकांठालगतच्या जमिनीच्या एका चिरोटींत (ह्या चिरोटीला **"पेल"** म्हणजे कुंपण घालून कुडलेलें अवाड असें म्हणत) वस्ती करून राहिलेले होते ते, आपआपसांत, आणि त्या बेटाच्या आंतल्या भागांतील रजवाड्यांशीं लढाया करीत, आणि आपणच नेमलेल्या **पार्लमेंटांत** पसंत वाटतील ते कायदे करीत असत. १४९४ त **हेन्रीनें**, त्या देशांतील राज्यव्यवस्था शिस्तीस लावण्याचा आणखी एकवेळ प्रयत्न करण्यासाठीं, **सर हेन्री पॉयनिंग्स** नांवाच्या वाकबगार सरदारास पाठविलें. **पॉयनिंग्स** ह्यानें न्यायाधीश आणि इतर कामदार **इंग्लिश** नेमले, **किल्डेर** नांवाचा एक बंडखोर होता, त्याला पकडून **इंग्लंडास** रवानाकेलें, आणि **इंग्लिश** कायदे **आयर्लंडाला** लागू केले आहेत, आणि राजाच्या कौन्सिलाच्या अनुमोदनावांचून **पेलांतील पार्लमेंटानें** कोणताही नवीन कायदा करूं नये, असा त्यानें एक **आक्ट** (कायदा) केला. नंतर **किल्डेर** ह्यानें, मी प्रजाधर्मानें वर्तेन, असें वचन दिलें, तेव्हां त्या देशावर अमल करण्यासाठीं त्याला **लार्ड डेप्युटी** (मुतालीक) नेमून माघारें जाऊं दिलें.

आयर्लंडाची स्थिति.

पॉयनिंग्स ह्याचा आक्ट, १४९४.

सिम्नेलच्या बंडापासून दुसरें एक कार्य झालें, तें हें. **यार्किस्ट** तरफेचे लोक शांत होऊन त्यांची खवदव मोडेल ह्या आशेनें **हेन्रीनें एलिझाबेथला** राणी ह्या नात्यानें राज्याभिषेक करविण्याची त्वरा केली. नंतर, ज्या शतशः बलाढ्य अपराध्यांना न्यायाचीं कोडलें ढका लावण्यास भीत असत, त्या अपराध्यांची चौकशी करून त्यांना शासन करण्यासाठीं त्यानें, **पार्लमेंटच्या संमतीनें**, **आ-**

पल्या प्रिव्हि कौन्सिलापैकीं निवड करून एक कमिटी नेमून, तिला तें काम करण्याविषयीं अधिकार दिला. ह्या कमिटीला, ज्या दिवाणखान्यांत ती भरे त्या दिवाणखान्यावरून, "कोर्ट आफ् धि स्टार चेंबर" (तारकांकित दिवाणखान्यांतील कोडत) हें नांव पडलें. पुढील कारकीर्दींत, तें कोडत फार अपायकारक झालें, परंतु ह्या काळीं पुनः पूर्ववत् व्यवस्था करण्याला तें मोठ्या उपयोगाचें झालें. लांब लांब चौकश्या न करतां ज्या कोडताला शासन करण्याचा अधिकार होता, त्या कोडतानें पुंडावा करणारे जमाव, आणि बंडाविषयीं प्रयत्न, पूर्वीपेक्षां भारी त्वरेनें मोडून टाकले, हें सांगणें नलगे. हेन्रीनें त्या कोडताच्या साधनानें "मेन्टिनन्स" म्हणून जो रिवाज होता (२६४ वें पृष्ठ पहा) तो बंद केला. त्या रिवाजानें लार्ड्स, म्हणजे वडे लोक, लोकांवर जुलूम जबरी करण्याला, न्यायाधीशांना दरारा घालण्याला, आणि शेरिफ्फांच्या निवडणुकी आपल्या लगामीं ठेवण्याला, समर्थ झाले होते. सारांश हेन्रीनें मोठमोठ्या लार्डांना आपल्या मुठींत आणून ठेवण्याचा निश्चय केला होता, आणि ते आतां फारसे राहिलेही नव्हते त्यामुळें, त्यांच्याशीं त्या धोरणानें वागण्याला तो समर्थ होता.

कोर्ट आफ् धि स्टार चेंबर.

मध्यावसरांत, दुसरा एक संगनमताचा कट घांटत होता. कोणा एका पर्किन वार्बेक नांवाच्या तरुण माणसानें (तो पुढें टूर्ने एथें जन्म पावलेला माणूस ठरला), टौअरमध्यें कैदेंत ठेवलेल्या त्या अल्पवयस्क दोघां राजपुत्रांपैकीं धाकटा, यार्कचा ड्यूक, रिचर्ड जो, तो मी, आणि माझा वडील भाऊ पांचवा एड्वर्ड

पर्किन वार्बेक, १४९२-१४९७ पर्यंत.

ह्याचा जेव्हां खून झाला तेव्हां, मी बचावून पळून गेलों, असें ढोंग मढावलें. त्यानें, **फ्रान्स** देशाचा राजा, आणि **बर्गंडीची मार्गरेट**, ह्या दोघांना आपणाला खरा मानण्याविषयीं समजूत करून प्रवृत्त केलें, आणि त्या परदेशीय दरबारांत त्याचा आदरसत्कार झाला; इतकेंच नाहीं, परंतु पुढें **आयर्लंडांत** त्याची बी रुजली नाहीं तेव्हां, तो **स्काट्लंडांत** गेला, तेथें **चौथ्या जेम्स** राजानें आपली **काथरिन गॉर्डन** नांवाची चुलत, माऊस, किंवा मामे बहीण, हिच्याशी त्याचें लग्न केलें, आणि १४९६ त **इंग्लंडावर** स्वारी करण्याला त्याला मदत केली. परंतु त्या स्वारींत त्याचा **सरीच्या अर्लानें** पराभव केला, आणि नंतर तो **पर्किन आयर्लंडांत** माघारा गेला, आणि तेथून समुद्र ओलांडून तो, **कार्नवाल** प्रांतांत आला. तेथील लोकांनीं आपणांवर कर फार जबरदस्त बसले म्हणून दंगा केलेला होता. तेथें फौज जमवून, तो **एक्झीटरकडे** कूचकरून गेला. परंतु त्याची राजाच्या फौजेशीं **टान्टन** एथें गांठ पडून, त्याचें धैर्य खचलें, आणि तो **बोल्यू** एथील **आबींत** (मठांत) पळून गेला. तेथें त्याला पकडून कैदकेलें, आणि १४९७ त **टौअरमध्यें** पाठविलें.

पर्किन ह्याला टौअरांत पाठविलें, १४९७.

ह्या फंदफितुरांनीं राजाला मात्र कांहींसा उपद्रव झाला. देशांत त्यांपासून कांहीं फारसा अनिष्ट परिणाम झाला नाहीं. देशांत त्याहून विशेष महत्वाच्या घडामोडी चालल्या होत्या. **हेन्रीचा आर्चबिशप मार्टन** हा काबील प्रधान होता, त्याच्या मदतीनें त्यानें आपल्या जामदारखान्यांत द्रव्याच्या राशि जमविण्याचा उद्योग चालविला होता. कोणाही लार्डानीं वाजवीपेक्षां फाजील परिवार ठेवून कायदा मोडला, कीं त्यांना भारी दंड होई. **आ-**

क्सफर्डाच्या अर्लाला हेन्री एकवेळ भेटावयास गेला असतां, त्या **अर्लानें** नौकर लोकांना पेहरावांनीं सजवून अतिशयच थाटमाट केला होता, त्यामुळें त्याला १५००० पौंड दंड भरावा लागला असें म्हणतात. **"बेनेव्होलेन्सिझ"** (धर्मार्थ देणग्या) हा कर **रिचर्डानें** बंद केला होता, तो पुनः वसूल होऊं लागला, आणि आपआपसांतलीं युद्धें चालू असतां सौरा घप्पाघोळ मातला होता, त्याचा **हेन्रीनें** आपल्याला उपयोग करून घेतला तो असा. सरकारच्या येण्याच्या पुष्कळ रोकडीच्या बाक्या काढून त्या तो हक्कानें मागूं लागला, आणि पुष्कळ जमीनदार लोकांजवळ आपल्याला वतनी जमिनी कशा मिळाल्या ह्याविषयीं सनदा, दानपत्रें वगैरे, ह्यांसारखे चांगले पुरावे नव्हते, त्यांच्या जमिनी तो काढून घेऊं लागला. ह्याप्रकारें त्यानें दोन गोष्टी साधल्या. जे अति बलाढ्य होते त्यांना त्यानें बलहीन केलें, आणि आपला जामदारखाना भरला. त्यानें **फ्रान्स** देशाच्या गादीवरील **इंग्लिश** राजांच्या प्राचीन हक्काचा देखील उपयोग करून घेतला, आणि **बूलोन** एथील आपली फौज उठवून नेण्याकरितां त्यानें **फ्रेंच** राजापासून मोठी द्रव्याची रकम मिळविली. ह्या आणि दुसऱ्या मार्गांनीं त्यानें पैक्याच्या मोठमोठ्या रकमा जमा केल्या, आणि परदेशांशीं युद्धांबद्दल त्यानें बिलकूल खर्च केला नाहीं, म्हणून, तो मरण पावला तेव्हां, त्यानें आपल्या पुत्राला उधळण्याला, जवळजवळ वीस लक्ष पौंड मागें ठेवले. दुर्दैवानें, ही बहुतेक संपत्ति अन्यायानें व जुलूमजबरदस्तीनें उकळलेली होती, आणि **एम्पसन** आणि **डडूले** ह्या नांवांचे दोघे वकील राजाचें हें गवळ

हेन्री जबरदस्तीनें पैसा घेतो.

काम करीत असत, त्यांचा लोक फार द्वेष करीत. परंतु **हेन्रीनें** दुसरा एक फायदा साधला. ह्याप्रकारे त्याने द्रव्य मिळविलें, त्यामुळे त्याला **पार्लमेंटा**वर द्रव्याकरितां अवलंबून राहवे लागले नाही. त्याच्या कारकीर्दीच्या शेवटच्या तेरा वर्षांत त्याने **पार्लमेंट** एकवेळ पाचारण करून भरविले होते. म्हणून तो प्रायः मुखत्यार किंवा अनिर्बंध राजा बनलेला होता.

पार्लमेंटावाचून हेन्री अमल करतो.

परदेशांशीं सख्य किंवा सल्ला राखाव्या ही त्याला दुसरी हौस होती. ती गोष्ट साधण्यामध्ये त्याने फार चातुर्य प्रदर्शित केले. त्या समयीं **यूरोपांत** मोठे एकमेकाचे प्रतिस्पर्धी म्हटले म्हणजे, **आठवा चार्लस** व त्याच्या मागून त्याच्या गादीवर बसणारा **बारावा लूइ**, हे **फ्रान्सचे** राजे, आणि **आरागानचा** राजा **फर्डिनांड**, हे होते. आतां **फ्रान्स** देश तर बलाढ्य झालेला होता, म्हणून **फ्रान्सच्या** विरुद्ध **इंग्लंडाला** कोणीतरी साहाय्यसंकेती दोस्त असणे हे महत्वाचे होते. ह्याचे मुख्यत्वे कारण, **फ्रेंच** लोक **स्काटांना** मदत करण्याला नेहमी सिद्ध असत. **फर्डिनांडही इंग्लंडचा** आश्रय मिळविण्याविषयीं तितकाच उत्सुक होता. म्हणून १५०१ त **हेन्रीचा** सर्वांत वडील मुलगा **आर्थर, प्रिन्स आफ् वेल्स**, ह्याचे, **फर्डिनांडची** कन्या, **आरागानची काथरिन**, हिच्याशी लग्न जुळविले. ते लग्न होण्याच्या पूर्वी, **वारिकचा** अल्पवयस्क **अर्ल**, आणि **पर्किन वार्बेक**, ह्या दोघांना, **टौअरमधून** पळून जाण्याचा यत्न केला अशा सबबेने, देहांत शासन केले. परंतु गादीविषयीं प्रतिस्पर्धी

आर्थराचें आरागानची काथरिन हिच्याशीं लग्न.

असतील तेवढे सर्व नाहींसे केले पाहिजेत असा फर्डिनांडचा आग्रह पडला असावा हें हजार वांट्यांनीं त्यांचे प्राण घेण्याचें कारण दिसतें. पुढील सालीं हेन्रीनें आपली मुलगी मार्गरेट हिचा स्काटूलंडचा राजा चौथा जेम्स ह्याच्याशी विवाह केला, आणि त्यायोगें त्यानें त्या देशाशीं सख्य जोडलें.

मार्गरेटचें स्काटूलंडचा राजा चौथा जेम्स ह्याच्याशी लग्न.

दुर्दैवानें राजपुत्र आर्थर हा स्पेनच्या राजाच्या कन्येशी लग्न झाल्यावर तीन महिन्यांनीं मरण पावला. पुढें काथरिनचें काय व्हावें हा प्रश्न उत्पन्न झाला. फर्डिनांड, आणि हेन्री, हे उभयतांही झालेला शरीरसंबंध तोडण्याला नाराजी होते, म्हणून त्या उभयतांचा करार झाला की, ज्यापक्षीं तिचा आर्थराशी केवळ यथाविधि विवाह मात्र झाला, त्यापक्षीं त्याचा भाऊ, म्हणजे हेन्री राजाचा दुसरा मुलगा, जो पुढे आठवा हेन्री झाला, त्याच्याशीं लग्न करण्यासाठीं तिनें इंग्लंडांतच राहवें. पोपाकडून डिस्पेन्सेशन, म्हणजे जे विधीनें निषिद्ध तें करण्याविषयीं आज्ञा, आणविली, आणि हेन्री हा अजून केवळ पोरवयाचा असतां त्याचा त्याच्याहून सहावर्षांनी वडील अशा त्याच्या भावाच्या विधवा स्त्रीशीं विवाह करण्याची योजना करून वाग्दान केलें. ह्या मनुष्यधर्माच्या विरुद्ध, विवाहापासून, पूर्वी कोणाच्याही ध्यानीमनीं आले नाहींत, असे काय परिणाम झाले, हें थोड्या वेळांत पाहण्यांत येईल.

हेन्री प्रिन्स आफ् वेल्स ह्याचें आपल्या भावाच्या विधवेशीं लग्न होणें.

ह्याप्रकारें एकीकडे यूरोपांतील राजे, अशीं राजकीय लग्नें करून, आपआपली सत्ता सुदृढ करीत होते तों दुसरीकडे, कांहीं साहसी पुरुष,

परिणामीं साऱ्या दुनियेला फार महत्वाचे होणार होते असे, नवीन शोध लावीत होते. **क्रिस्टॉफर कोलंबस** नांवाच्या **जेनोवा** एथें जन्म पावलेल्या पुरुषानें १४९२ त **अट्लांटिक** महासागरावरून **हिंदुस्ताना**ला पोहोंचण्याचा मार्ग शोधून काढण्याचा प्रयत्न केला, आणि त्यानें त्या सफरींत **अमेरिका** खंडाच्या किनाऱ्याबाहेर असलेल्या कित्येक बेटांचा शोध लावला; त्या बेटांना त्यानें **वेस्ट इन्डिझ** हें नांव दिलें. पुढें थोड्या वर्षांनीं १४९७–९८ त **व्हास्को डि गामा** नांवाच्या **पोर्टुगीसानें, केप् आफ् गुडहोप** (चांगल्या आशेची भूशलाका) ह्या भूशलाकेला वळसा घालून समुद्रावरून **हिंदुस्तानास** जाण्याचा मार्ग शोधून काढला; आणि त्याच वर्षी, एक **सिबास्टियन काबट** नांवाचा **व्हिनीशियन** (व्हेनिसचा रहिवासी) हा, **सातव्या हेन्री**च्या परवानगीनें **ब्रिस्टल** बंदरांतून, जहाज हाकारून वायव्य दिशेकडील समुद्राचा छडा लावण्यासाठीं गेला. तो आपल्या बापाबरोबर पूर्वींच्या वर्षी तिकडे गेलेला होता. त्या समुद्रांतून **लाब्रडोर** नांवाच्या द्वीपकल्पाच्या किनाऱ्यानें जहाज हाकारून वर जाऊन, जेथें ध्रुवालगतच्या प्रदेशांत राहणारीं अस्वलें चरतात, त्या बर्फाच्या डोंगरांमध्यें प्रवेश करून, त्यानें **न्यूफौंडलंड** बेटाच्या आसपासच्या समुद्रांत काड नांवाचे मासे मारण्याचीं ठिकाणें खुलीं करून दिलीं.

कोलंबसानें लावलेले शोध, १४९२.

व्हास्को डि गामा, आणि काबट, १४९७–१४९८.

हे शोध लागतात तोंच, **इटलींतून इंग्लंडांत** नवीन विद्या येऊं लागली होती. १४५३ त तुर्क लोकांनीं **कान्स्टांटिनोपल** शहर घेतलें तेव्हां तेथले पुष्कळ विद्वान **ग्रीक** लोक **इटलींत** पळून

गेले. त्यांनीं, पश्चिमेकडील देशांतल्या लोकांना **ग्रीक** भाषेंतील विद्याग्रंथकलाप आणून दिला. ही नवीन विद्या, आणि छापील पुस्तकांचा प्रसार, ह्या दोहों गोष्टींनीं **ग्रीक** तत्त्वमीमांसकांचे ग्रंथ, आणि **ग्रीक टेस्टामेन्ट** (ख्रिस्ती धर्मपुस्तकाचे जुनाकरार आणि नवाकरार असे दोन भाग आहेत त्यांतून कोणताही एक ग्रीक भाषेंत लिहिलेला) ह्यांचा अभ्यास करण्याची लोकांमध्यें प्रवृत्ति उत्पन्न झाली. ह्या काळापूर्वीं धर्माध्यापकांनीं देखील, फक्त **व्हल्गेट,** म्हणजे **लाटिन** भाषेंत केलेलें **ख्रिस्ती** धर्मपुस्तकाचें भाषांतर, वाचलेलें असे. **कॉलेट** नांवाचा एक **इंग्लिश** धर्माध्यापक, **इटलीस** जाऊन आलेला होता, त्यानें **१४९६** त **आक्सफर्ड** एथें एक व्याख्यानमाला दिली. तीं व्याख्यानें नवीन विचारांनीं भरलेलीं होतीं. **ग्रीक** भाषावेत्ता विख्यात पंडित आणि प्रतापी धर्मसुधारक, असा एक **इरास्मस** नांवाचा **डचमन** (हालंडचा रहिवासी), १४९७ त **इग्लंडां**त पहिल्यानेंच आला. ह्या विद्वान लोकांचा मित्र, महान् **इंग्लिश** धर्मशास्त्रवेत्ता, **सर टामस मोर,** ह्यानें १५०४ त आपलें **पांचव्या एड्वर्डा**चें चरित्र लिहिलें. तो, अर्वाचीन **इंग्लिश** गद्यांत लिहून प्रसिद्ध केलेला पहिलाच ग्रंथ होय. युनिव्हर्सिट्यांमध्यें नवीन चेष्टित करणारा जीव भरला, आणि **लूथर** हा **जर्मनीं**त नुकताच व्याख्यानें देऊं लागला होता. इतक्यांत **सातवा हेन्री, रिच्मंड** एथें त्यानें जें राजमंदिर बांधविलें होतें त्यांत मरण पावला, आणि **वेस्टमिन्स्टर आबीं**त, जें सुंदर भजनमंदिर त्याचें म्हणून मोडतें त्या भजनमंदिरांत त्याचें शव पुरलें. त्याच्यामागें त्याचीं तीन मुलें

नवीन विद्या, १४९६.

सातव्या हेन्रीचा मृत्यु, ता. २१ एप्रिल १५०९.

राहिलीं. (१) **मार्गरेट,** ही **स्काट्लंड**च्या **चौथ्या जेम्सा**ची बायको; (२) **मेरी,** हिनें पुढें **फ्रान्स** देशचा **बारावा लूइ** ह्याच्याशीं विवाह केला; आणि (३) **हेन्री,** हा अठरावर्षांचा तरणा राजबिंडा होता, ह्याची कारकीर्द आमच्या देशाला मोठी उलटापालटीची होणार होती.

आठवा हेन्री, १५०९–१५४७.

आठव्या हेन्रीचे गुणदोष.

आठवा हेन्री राजा झाला तेव्हां सर्व **इंग्लंड** खुश झालें, त्याच्या देहांत, **यार्क** आणि **लांकास्टर** ह्या दोन्ही घराण्यांचें रक्त होतें. तो शरीरानें निकोप किंवा टणका आणि तोंडचा भला होता. प्रत्येक माणसाला त्याच्या तोंडून कांहीं तरी कृपाळूपणाचा शब्द आणि कांहीं तरी मस्करीचें भाषण निघावयाचेंच, आणि त्याचा स्वभाव उदार असे, त्यावरून तो आपल्या बापासारखा अधाशी किंवा लोभी निपजणार नाहीं असें चिन्ह दिसत होतें. त्याच्याकडून विद्याध्ययन फार चांगलें करविलेलें होतें, कारण, त्याचा वडील भाऊ जिवंत होता तोंपर्यंत, **हेन्री**नें **कांटर्बरी**चा **आर्च-बिशप** व्हावें अशी योजना केलेली होती. तो गाण्यावाजविण्याच्या कलेंत उत्कृष्ट निपुण होता, आणि तो आश्चर्यकारक प्रकारचा घोड्यावर बसणारा आणि कुस्ती करणारा होता. जरी त्याची इच्छा किंवा निश्चयशक्ति खंबीर होती, आणि तो पराकाष्ठेचा अभिमानी होता, तरी त्याच्यांत समज किंवा वकूब पुष्कळ होता, आणि आपल्या प्रजाजनांना आपण प्रिय व्हावें अशी त्याची इच्छा होती.

त्यानें गैरवाजवी कृत्यें पुष्कळ केलीं, तथापि तीं मनांत न आणून ते प्रजाजन **"ब्लफ किंग हाल,"** म्हणजे आपला जवानमर्द राजा **हाल** (हेन्री) ह्यावर प्रेम करण्याला कधींही खळले नाहींत. त्याचा मुख्य दोष म्हटला म्हणजे अचाट आपलपोटेपणा हा होता. त्याला कोणतीही गोष्ट पाहिजे झाली म्हणजे ती मिळविण्याकरितां, किंवा आपल्यावरील लोकप्रीति रक्षण करण्याकरितां, आपली चाकरी ज्यांनीं अत्यंत इमानीपणानें केलेली होती, त्यांची देखील त्यानें निर्दयपणानें आहुति दिली. अहंममता किंवा आत्मप्रीति हिला कह्यांत न ठेवतां मोकळी सोडली तर, ती वय जसजसें वाढेल तसतशी वाढते हा नियम आहे. त्या नियमाप्रमाणें, त्याच्या हयातीच्या उत्तरभागांत तो रानवट, पशुतुल्य क्रूर, जुलूम करणारा राजा बनला. लोकांची अप्रीति होईल ह्या भीतीनें मात्र तो अटकेंत राही.

आरागानची **काथरिन** हिच्याशीं लग्न करावयाचें म्हणून त्याचा वाग्दानसंस्कार पूर्वीं झालेला होता. तिच्याशीं त्यानें बापाच्या मृत्यूनंतर लवकरच यथाविधि लग्न केलें, आणि त्या राणीसह त्याला १५०९ त जूनच्या २४ व्या तारिखेस राज्याभिषेक झाला. नंतर **एम्पसन** आणि **डड्ले** ह्यांच्यावर खटला उभा करण्यास त्यानें हुकूम दिला. हें त्यानें प्रथम जीं कृत्यें केलीं त्यांपैकीं एक होतें. त्या दोघांना देहांत शासन केलें. तदनंतर त्यानें **इंग्लंडा**च्या जहाजांकडे लक्ष्य वळविलें. अजूनपर्यंत त्याचें लढाईचें जहाज **ग्रेट हारी** नांवाचें फक्त एकच होतें. तें त्याच्या बापाच्या कारकीर्दींत बांधलेलें होतें. परंतु १५११ त **धि लायन** नांवाचें एक मोठें जहाज **स्काटां**पासून लढाईत पाडाव करून घेतलें. पुढील सालीं **धि रीजेन्ट** नांवाचें १००० टन ओझें

आठवा हेन्री हा आमच्या अर्वाचीन कालच्या अरमाराचा जनक.

वाहण्याजोगें दुसरें एक जहाज बांधविलें. ह्या नवीन जहाजाचा **फ्रेंचांनीं** नाश केला. तेव्हां त्याच्या जागीं **हेन्री ग्रेस डि ड्यू** ह्या नांवाचें त्याहून मोठें जहाज बांधविलें, आणि त्या नव्या जहाजामागून पुष्कळ दुसरीं जहाजें बांधविलीं. ह्याखेरीज त्या राजानें पहिली **अरमार**संबंधी **कचेरी, १५१३** त आणि **ट्रिनिटि हौसचें** (व्यक्तित्रयात्मक देवतागृह ह्या नांवचें) **कार्पोरेशन** (एक होऊन काम करणारें सनदी मंडल) ह्या नांवचें अधिकारी मंडल स्थापलें. धोक्याच्या जागा अमुक ठिकाणीं आहेत अशी सूचना करणारे आकाशदीप लावण्यासाठीं मनोरे, किंवा स्तंभ, आणि दीपगृहें बांधविणें, परवाने देऊन बंदरवाटाडे नेमणें, तारवांसंबंधी कायदे करणें, आणि दग्याच्या जागीं तरते बोयरे खुटवून ठेवणें, ह्या गोष्टी करून त्या मंडलानें आजपर्यंत फारच चांगलें काम केलें आहे. आणखी त्या राजानें **डेट्फर्ड, वूलिच,** आणि **पोर्ट्स्मौथ** ह्या तीन बंदरांत गोद्या बांधविल्या, हें ह्या वर्णनांत भरतीला सांगितलें म्हणजे, आमच्या अर्वाचीन कालच्या अरमाराचा संस्थापक म्हणवून घेण्याला **हेन्री**ला हक्क आहे, असें दिसून येईल.

बाटल आफ् धि स्पर्स (मंबरेजांची लढाई), ता. १६ आगस्ट १५१३.

पुढें, कमी अक्कलेनें, त्यानें परदेशीय युद्धांत उडी घातली, आणि **पोपाचें** राज्य **फ्रान्स**च्या राजापासून रक्षण करण्यासाठीं, **स्पेन** आणि **जर्मनी** ह्यांनीं **होली लीग** (पवित्र कट) नांवाचा कट केला होता त्यांत तो मिळाला. त्या युद्धाबद्दल भारी खर्च झाला, आणि **इंग्लिशांनीं फ्लांडर्स** देशांतील **टूर्ने**

नांवाचें शहर मात्र त्या युद्धांत मिळविलें. तें शहर, "**बाटल आफ् धि स्पर्स**" (मंबरेजांची लढाई) ह्या नांवाच्या लढाईत जिंकून घेतलें. त्या लढाईला तें नांव पडण्याचें कारण, **फ्रेंचां**कडील शिपायांनीं, अकस्मात दहशत पडून घोड्यांना मंबरेजांनीं टांचळून पळ काढला. १५१४ त **फ्रान्स** देशाशीं तह झाला, आणि **हेन्री**ची कनिष्ठ बहीण, **मेरी,** हिचें **बारावा लूइ** ह्याच्याशीं लग्न केलें. पुढें तीन महिन्यांनीं **लूइ** वारला तेव्हां, त्याचा पुत्र **पहिला फ्रान्सिस** हा **फ्रान्स**चा राजा झाला.

पहिला फ्रान्सिस हा फ्रान्स देशचा राजा होतो, १५१४.

मध्यावसरांत, **फ्रान्स**शीं नेहमी मित्रभावानें असणारे **स्काट** लोक ह्यांनीं १५१३ त **इंग्लंडा**वर हल्ला केला होता. त्या समयीं **हेन्री** परदेशीं असल्यामुळें **सरी**चा **अर्ल** ह्यानें जाऊन त्यांना गांठलें, आणि **फ्लॉड्डन** एथील विख्यात लढाईत त्यांचा त्यानें पराभव केला. त्या लढाईत **चौथा जेम्स** ठार मारला गेला. त्याची बायको **मार्गरेट** ही **हेन्री**ची बहीण होती, तिचा पुत्र **पांचवा जेम्स** वयानें फक्त दोन वर्षांचा असल्यामुळें, राजप्रतिनिधीसारखी **स्काटलंड**चा राज्यकारभार चालविणारी तीच मागें राहिली होती. **स्काच** बडे लोक पुष्कळ वर्षेंपर्यंत आपआपसांत कलह करण्यांत अतिशय व्यग्र असल्यामुळें त्यांच्याकडून **इंग्लंडा**स उपद्रव करणें झालें नाहीं. परंतु पुढें सत्तावीस वर्षांनीं, **हेन्री**च्या कारकीर्दीच्या अखेरीच्या सुमारास, ह्या तरुण **पांचव्या जेम्सा**नें पुनः **इंग्लंडा**वर हल्ला केला;

फ्लॉड्डनची लढाई, तारीख ९ सेप्टेंबर १५१३.

सॉल्वे मॉस्सची लढाई, १५४२.

आणि **सॉल्वे मॉस्स** एथें १५४२ त नोव्हेंबरच्या २५ व्या तारिखेस लढाई झाली तींत त्याचा पराभव झाला, आणि तो त्या दुःखानें मरण पावला. त्याच्या मागें तान्हें लेंकरूं अशी त्याची एक मुलगी राहिली, तीच **स्काटांची राणी** हतभाग्य **मेरी.**

आणि आतां ज्या घडामोडी झाल्या त्या ध्यानांत येण्याला, आपणांला लक्ष्य जागृत ठेवलें पाहिजे. कारण **आठव्या हेन्री**ला एकामागून एक, कोणी तरी पुरुष, किंवा स्त्री, कांहीं वेळपर्यंत भारून टाकी, आणि नंतर त्याच्या किंवा तिच्या जागीं दुसरें कोणी तरी प्रतिस्पर्धी तसेंच भारणारें येई. ह्यामुळें त्या **आठव्या हेन्री**ची कारकीर्द म्हटली म्हणजे नाटकगृहांत होणाऱ्या एकाद्या नाटकासारखी आहे. अशा ह्या भारणारांपैकीं पहिला आणि अति प्रबल भारणारा म्हटला म्हणजे, **वूल्सी** नांवाचा एक तरुण पुरुष होता, तो **इप्स्वुइच** शहरांत राहणाऱ्या एका श्रीमंत गृहस्थाचा पुत्र होता.

वूल्सीचा राज्यकारभार, १५१५–१५२९.

तो **सातव्या हेन्री**चा चाप्लन (धर्मोपाध्याय किंवा पाद्री) होता आणि तो **आठव्या हेन्री**ला **फ्रान्स** देशीं फार उपयोगीं पडलेला होता. **आठवा हेन्री** आणि तो **वूल्सी** हे दोघे **फ्रान्स** देशाहून **इंग्लंडास** परत आले तेव्हां, **हेन्रीनें** त्या **वूल्सीला यार्कचा आर्चबिशप** आणि चान्सेलर (पंडितराव) केलें; आणि **पोपानें** पुढें त्याला **कार्डिनल** (रोमन काथलिक पंथांतील धर्माधिकारी विशेष) आणि **पेपल** (पोपाकडील म्हणजे आपला) **लेगेट** (वकील) केलें. ह्या गोष्टींनीं त्या **वूल्सी**च्या हातीं मोठी सत्ता आली. चान्सेलर ह्या नात्यानें तो राज्यांत मुख्य अधिकारी होता. **लेगेट** ह्या नात्यानें धर्मसंबंधी खात्यांत तर त्याचा अधिकार सर्वश्रेष्ठ,

किंबहुना **कांटर्बरीच्या आर्चबिशपाच्या** देखील वरचा, होता. **वूल्सी** हा समर्थ ज्ञानी पुरुष होता. त्यानें विद्येला उत्तेजन दिलें, आणि **आक्सफर्ड** एथें **क्राइस्टचर्च** (खिस्ती धर्मसंबंधी) नांवाचें **कालेज** (पाठशाळा) स्थापलें, आणि तो परदेशीय राजकारस्थानांत फार कुशल होता. जरी देशांतील राज्यकारभाराला त्यानें आपल्यांत असलेला सारा जोम वाहिलेला होता, तरी दुर्दैवानें तो एकचित्त नव्हता. राजाची सत्ता सुदृढ करणें आणि स्वतःला प्रतिष्ठा आणि संपत्ति मिळविणें ह्या दोन गोष्टींविषयीं तो अति चिंतातुर असे. त्यानें बेनेव्होलेन्सिझ (उपकार बुद्धीनें देणग्या) नांवाची पट्टी बसवून, आणि जुलुमानें कर्जें म्हणून घेऊन, पैसा उकळला, आणि लोकांपासून दंडाच्या रूपानें द्रव्य पिळून घेण्यासाठीं त्यानें न्यायाच्या कोडतांना हातीं धरलें. त्यानें एकीकडे राजाचा जामदारखाना भरला, आणि दुसरीकडे **हेन्री** राजाकडून त्याला बक्षिसें मिळत त्यांवर तो श्रीमंत झाला; इतका कीं, **हाम्टनकोर्ट** आणि **यार्क हौस** (ह्यालाच पुढें **व्हाइटहाल** म्हणूं लागले) ह्या नांवांच्या आलिज्याहां राजमंदिरतुल्य हवेल्या खुद्द आपणास राहण्याकरितां म्हणून बांधविण्याचें त्याला सामर्थ्य आलें.

ही सारी संपत्ति त्याला **इंग्लंडांतूनच** मिळाली नाहीं. ह्या काळीं साऱ्या **यूरोपांत** सर्वांत अतिथोर राजा म्हटलें म्हणजे **पांचवा चार्लस बादशाहा** हा होता. तो, त्याच्या मातृपक्षाकडील आजा **फर्डिनांड** ह्याच्यामागून **स्पेन**चा राजा झाला असून, त्याच्या पितृपक्षाकडील आजा **माक्सिमिलियन,** ह्याच्या मृत्यूनंतर त्याला **जर्मनीचा बादशाहा** निवडून नेमलेलें होतें. ह्याशिवाय त्याला

जर्मनी.
माक्सिमिलिअन, (बादशाहा)
ह्याची बायको बर्गंडीची मेरी.

स्पेन.
आरागानचा फर्डिनांड, ह्याची बायको
कास्टीलची इसाबेला.

आर्चड्यूक फिलिप, ह्याची बायको···जुआना.

काथरिन, ही इंग्लंडच्या
आठव्या हेन्रीची बायको.

पांचवा चार्लस,
(बादशाहा).

दुसरा फिलिप, ह्याची बायको·········**राणी मेरी** इंग्लंडची.

यूरोपांतील राज-
कारस्थानें.

त्याच्या बापाची आई **बर्गंडीची मेरी** हिचा वारस ह्या हक्कानें **नेदर्लंड्स** हा देश मिळाला होता. हा बलाढ्य बादशाहा, **हेन्रीची** राणी **काथरिन** हिचा भाचा होता, आणि तो, व **फ्रान्सचा पहिला फ्रान्सिस,** हे दोघेही **इंग्लंडचें** पाठबळ मिळविण्याविषयीं चिंतातुर होते. **वूल्सीनें** त्या उभयतांकडून बक्षिसें घेतलीं, आणि त्यांना तो एकमेकाच्या विरुद्ध खेळवूं लागला. १५२० त **पांचवा चार्लस, हेन्री** राजाला **कांटर्बरी** एथें भेटावयास आला. पुढें थोड्या महिन्यांनीं **फ्रान्सिस** ह्यानें **हेन्रीला फ्रान्सांत** भेटावयास बोलावलें, आणि त्या दोघां राजांनीं एकामेकास **बूलोनाहून** जवळच **ग्विनेझ** एथें "**सोन्याच्या कापडाच्या मैदानावर**" मेजवान्या, आणि भालेकरोल्या करवून आदरआतिथ्य केलें. त्या स्थानाला "सोन्याच्या कापडाचें मैदान" म्हणण्याचें कारण, तेथें जी रोशनाई आणि थाटमाट केला होता, तें होतें. इतका प्रकार घडला असून, **हेन्री** स्वदेशीं माघारा येऊं लागला, तेव्हां तो पुनः **पांचव्या चार्लसाला** भ्यान्हलेंन

सोन्याच्या कापडाचें
मैदान, १५२०.

एथें भेटला, आणि पुढें दोन वर्षांनीं त्याला त्यानें **फ्रान्सिसा**शीं युद्ध करण्याच्या कामीं कुमक केली.

ह्या सर्व गोष्टींचें गुह्य हें होतें कीं, **हेन्री**ला त्या दोघां राजांच्या बलाचीं पारडीं समतोल ठेवावयाचीं होतीं, आणि **वूल्सी**ची **पोप** होण्याची इच्छा असून, त्या कामीं त्याला त्या दोघांतून जो कोणी उत्तम मदत करील, त्याचा पक्ष त्याला धरावयाचा होता. **पांचव्या चार्लसानें वूल्सी**ला मी आपलें वजन तुमच्या कामीं खर्च करीन असें वचन दिलें होतें. परंतु तसें करण्याच्या दोन संधि येऊन त्या निसटून गेल्या, तेव्हां **वूल्सी**ला **चार्लसा**विषयीं शंका येऊन, तो त्याचा पक्ष सोडून **फ्रान्सिसा**च्या पक्षाला मिळाला. १५२५ त **चार्लस** बादशाहानें **इटली** देशांत **पाव्हिया** एथें लढाई झाली तींत **फ्रान्सिसा**ला धरून कैदकेलें आणि तो बादशाहा इतका बलाढ्य होत चालला कीं, **हेन्री** आणि **वूल्सि** ह्यांना भीति पडली. मग, पहिल्यानें एका पक्षाशीं, आणि नंतर दुसऱ्या पक्षाशीं, ह्याप्रमाणें त्यांनीं दोस्तीविषयीं बोलणीं करून, शेवटीं **फ्रान्सा**शीं सख्य केलें. त्या सख्यानें **इंग्लिश** लोक नाखुश झाले, कारण **पांचवा चार्लस** हा **नेदर्लंड्स**चा राजा होता, त्यामुळें, **फ्लांडेस** देशाशीं चाललेल्या **इंग्लिशां**च्या लोंकरीच्या व्यापाराला त्या सख्यानें धक्का बसला. **हेन्रीनें** झाल्या गोष्टीबद्दल सारा दोष **वूल्सी**वर लादूं दिला, आणि करही फार भारी बसले होते, त्यांमुळें तो **कार्डिनल** लोकांना अप्रिय होऊं लागला.

फ्रान्स देशाशीं सख्य.

आतां **हेन्री**चें एकुलतें एक मूल, राजपुत्री **मेरी**, हिचा **फ्रेंच** राजाच्या पुत्रांतून एका पुत्राशीं विवाह करावा असा उहू निघाला. परंतु **टार्बच्या बिशपानें** त्या लग्नाला हरकत काढली. तो म्ह-

जर्मनी.
माक्सिमिल्लिअन, (बादशाहा)
ह्याची बायको बर्गंडीची मेरी.

स्पेन.
आरागानचा फर्डिनांड, ह्याची बायको
कास्टीलची इसाबेला.

आर्चड्यूक फिलिप, ह्याची बायको‥‥जुआना.

काथरिन, ही इंग्लंडच्या
आठव्या हेन्रीची बायको.

पांचवा चार्लस,
(बादशाहा).

दुसरा फिलिप, ह्याची बायको‥‥‥‥**राणी मेरी** इंग्लंडची.

यूरोपांतील राजकारस्थानें.

त्याच्या बापाची आई **बर्गंडीची मेरी** हिचा वारस ह्या हक्कानें **नेदर्लंड्स** हा देश मिळाला होता. हा बलाढ्य बादशाहा, **हेन्रीची** राणी **काथरिन** हिचा भाचा होता, आणि तो, व **फ्रान्सचा पहिला फ्रान्सिस,** हे दोघेही **इंग्लंडचें** पाठबळ मिळविण्याविषयीं चिंतातुर होते. **वूल्सीनें** त्या उभयतांकडून बक्षिसें घेतलीं, आणि त्यांना तो एकमेकाच्या विरुद्ध खेळवूं लागला. १५२० त **पांचवा चार्लस, हेन्री** राजाला **कांटर्बरी** एथें भेटावयास आला. पुढें थोड्या महिन्यांनीं **फ्रान्सिस** ह्यानें **हेन्रीला फ्रान्सांत** भेटावयास बोलावलें,

सोन्याच्या कापडाचें मैदान, १५२०.

आणि त्या दोघां राजांनीं एकामेकास **बूलोनाहून** जवळच **ग्विनेझ** एथें **"सोन्याच्या कापडाच्या मैदानावर"** मेजवान्या, आणि भालेकरोल्या करून आदरआतिथ्य केलें. त्या स्थानाला "सोन्याच्या कापडाचें मैदान" म्हणण्याचें कारण, तेथें जी रोशनाई आणि थाटमाट केला होता, तें होतें. इतका प्रकार घडला असून, **हेन्री** स्वदेशीं माघारा येऊं लागला, तेव्हां तो पुनः **पांचव्या चार्लसाला ग्राव्हलेन**

एथें भेटला, आणि पुढें दोन वर्षांनीं त्याला त्यानें **फ्रान्सिसा**शीं युद्ध करण्याच्या कामीं कुमक केली.

ह्या सर्व गोष्टींचें गुह्य हें होतें कीं, **हेन्री**ला त्या दोघां राजांच्या बलाचीं पारडीं समतोल ठेवावयाचीं होतीं, आणि **वूल्सी**ची **पोप** होण्याची इच्छा असून, त्या कामीं त्याला त्या दोघांतून जो कोणी उत्तम मदत करील, त्याचा पक्ष त्याला धरावयाचा होता. **पांचव्या चार्लसा**नें **वूल्सी**ला मी आपलें वजन तुमच्या कामीं खर्च करीन असें वचन दिलें होतें. परंतु तसें करण्याच्या दोन संधि येऊन त्या निसटून गेल्या, तेव्हां **वूल्सी**ला **चार्लसा**विषयीं शंका येऊन, तो त्याचा पक्ष सोडून **फ्रान्सिसा**च्या पक्षाला मिळाला. १५२५ त **चार्लस** बादशाहानें **इटली** देशांत **पाव्हिया** एथें लढाई झाली तींत **फ्रान्सिसा**ला धरून कैदकेलें आणि तो बादशाहा इतका बलाढ्य होत चालला कीं, **हेन्री** आणि **वूल्सि** ह्यांना भीति पडली. मग, पहिल्यानें एका पक्षाशीं, आणि नंतर दुसऱ्या पक्षाशीं, ह्याप्रमाणें त्यांनीं दोस्तीविषयीं बोलणीं करून, शेवटीं **फ्रान्सा**शीं सख्य केलें. त्या सख्यानें **इंग्लिश** लोक नाखुश झाले, कारण **पांचवा चार्लस** हा **नेदर्लंड्स**चा राजा होता, त्यामुळें, **फ्लांडर्स** देशाशीं चाललेल्या **इंग्लिशां**च्या लोंकरीच्या व्यापाराला त्या सख्यानें धक्का बसला. **हेन्री**नें झाल्या गोष्टीबद्दल सारा दोष **वूल्सी**वर लादूं दिला, आणि करही फार भारी बसले होते, त्यामुळें तो **कार्डिनल** लोकांना अप्रिय होऊं लागला.

फ्रान्स देशाशीं सख्य.

आतां **हेन्री**चें एकुलतें एक मूल, राजपुत्री **मेरी**, हिचा **फ्रेंच** राजाच्या पुत्रांतून एका पुत्राशीं विवाह करावा असा उद्गू निघाला. परंतु **टार्ब**च्या **बिशपा**नें त्या लग्नाला हरकत काढली. तो म्ह-

णाला, **मेरी** ही यथाशास्त्र लग्न झालेल्या बायकोच्या पोटची नव्हे, कारण **हेन्रीनें** आपल्या भावाच्या विधवेशीं लग्न केलेलें होतें. ह्या हरकतीनें **हेन्रीच्या** मनांत विचार उद्भवूं लागला. त्याला **काथरिनचा** कंटाळा आला होता. त्यांचें लग्न होऊन अठरा वर्षें झालेलीं होतीं, आणि **मेरी** एवढेंच काय तें तिचें जिवंत मूल होतें, आणि त्याला तर पुत्र पाहिजे होता.

हेन्री हा काथरिनपासून विवाहसंबंध तोडूं पाहतो.

शिवाय **काथरिनच्या** ज्या सन्मानाच्या दासी होत्या त्यांपैकीं एका **आन बुलिन** नांवाच्या दासीवर त्याचें प्रेम जडलेलें होतें. म्हणून, त्यानें १५२७ त **पोप, सातवा क्लेमेंट,** ह्याला सांगून पाठविलें कीं, **काथरिन** ही माझी खरी यथाशास्त्र बायको अशी मला वाटत नाहीं, ह्यास्तव माझा आणि तिचा विवाहसंबंध आपण तोडला पाहिजे. **पोप** ह्या कामीं आपल्याला पाठबळ देईल असें त्याला वाटलें होतें, कारण, फक्त पांचा वर्षांपूर्वी, **हेन्रीनें** धर्मसुधारक **लूथर** ह्याच्या खंडनपर एक ग्रंथ लिहिलेला होता, आणि **दहावा लीओ** ह्या नांवाच्या **पोपानें** त्याला **"डिफेन्डर आफ् धि फेथ"** (धर्मसंरक्षक) हा किताब दिला होता. परंतु **सातवा क्लेमेंट** हा **पोप काथरिनचा** भाचा, **पांचवा चार्लस,** ह्याची मर्जी खप्पा करण्याला भीत होता. त्या **चार्लसाच्या** सैन्यानें **रोम** शहर ह्यापूर्वीच लुटून, त्या **पोपाला** धरून कैद केलेलें होतें. म्हणून त्या **पोपानें कार्डिनल कांपेज्जिओ** नांवाचा ह्या कार्यासाठीं एक मुजरतचा वकील **इंग्लंडास** पाठविला. त्यानें **काथरिनला** जोग घेऊन जोगणींच्या मठांत जाण्याविषयीं पुष्कळ समजूत घालून सांगितलें, परंतु ती आपला आणि आपल्या मुलीचा हक्क खरा करून देण्यास कमर बांधून उभी

राहिली, ह्यास्तव **पोपानें** त्या वादाचा निर्णय करण्यासाठीं **हेन्रीला रोम** एथें येण्याविषयीं अधिकारानें बोलावणें केलें.

आतां राजाची नौकरी करून त्याच्या उपयोगीं पडावें अशी जरी **वूल्सी**ची इच्छा होती, तरी राजानें **आन बुलिन** हिच्याशीं विवाह करावा हें शाहणपणाचें काम असें **वूल्सी**ला वाटलें नाहीं. **आन बुलिन** हिला ही गोष्ट कळलेली होती, आणि ह्या वेळेच्या सुमारास **हेन्री**वर तिचें वजन पराकाष्ठेचें बसलेलें होतें, म्हणून तिनें, **हेन्री**ला चिथवून, त्याच्या विश्वासू प्रधानावर त्याची इतराजी करविली. तेव्हां आपणावर संकट गुदरलें असें **वूल्सी**च्या लक्ष्यांत आलें. म्हणून त्यानें त्वरा करून आपल्या सुंदर हवेल्या राजाला देऊन, सरकारी काम सोडून **यार्क** एथील आपला **आर्चबिशप्रिक,** म्हणजे आर्चबिशप ह्या नात्यानें धर्माधिकाराचा प्रांत, ह्यांत राहवयास गेला. परंतु तो तेथें इतका लोकप्रिय होता कीं, **हेन्री**ला त्याविषयीं अधिकच मत्सर वाटूं लागला, आणि पुढें एका वर्षानें त्यावर घोर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्याला पकडून कैदकेलें. तेव्हां, त्याचें वय फक्त एकुणसाठ वर्षांचें असतांही तो कार्डिनल कामकारभाराच्या मेहतीनें जर्जर झालेला असून, तशांत आजारीही होता, म्हणून, त्याला **लंडनास** आणीत असतां, मार्गांत **लेस्टर** एथील **आबींत** विसाव्याकरितां राहूं देणें भाग आलें. तेथल्या मंकांना (जोग्यांना) तो म्हणाला, " मी तुम्हांमध्यें माझीं " हाडें ठेवण्यासाठीं आलों, ... मीं जितक्या तत्परतेनें राजाची " सेवा केली तितक्या तत्परतेनें जर **देवा**ची सेवा केली असती, तर " माझ्या वृद्धापकालांत त्यानें मला सोडून दिलें नसतें," आणि

वूल्सीचा अपकर्ष, १५२९–१५३०.

त्या आर्बीतच तो, १५३० त नोव्हेंबरच्या २८ व्या तारिखेस, मरण पावला.

त्याच्या चान्सेलरच्या हुद्द्यावर **सर टामस मोर** ह्याची नेमणूक करून तो ह्यापूर्वीच भरून टाकलेला होता. तो **मोर,** न्यायी, आणि सुजन होता, तथापि **हेन्री**च्या इच्छेविरुद्ध त्याला कांहींच करतां येईना. सहा वर्षेपर्यंत **पार्लमेंट** भरविलेलें नव्हतें, कारण मागल्या **पार्लमेंटानें,** राजाला पाहिजे होतें तितकें द्रव्य देण्याचें नाकारिलें होतें. आतां १५२९ त नवीन **पार्लमेंट** पाचारण करून भरविलें. तें सात वर्षेपर्यंत टिकलें, कारण त्यांत सर्व लोक राजाच्या आज्ञेप्रमाणें वागणारे होते. हें **पार्लमेंट** होतें त्या काळांत **इंग्लंडां**त कांहीं फार महत्वाच्या घडामोडी केल्या.

सात वर्षांचें पार्लमेंट, १५२९–१५३६.

काथरिनशीं असलेला आपला विवाहसंबंध तोडतां यावा म्हणून, **पोपा**च्या अमलापासून मुक्त व्हावें, ही **हेन्री**ची आतां मोठी इच्छा होती, आणि त्याला एक नवीन समर्थ प्रधान मिळाला, त्यानें त्या अडचणींतून पार होण्याला त्याला साहाय्य केलें. **टामस क्राम्वेल** हा माणूस पूर्वी **वूल्सी**च्या पदरीं नौकर होता, तो १५३० त राजाचा **सेक्रेटरी** (चिटणीस) झाला. त्यानें, **तिसरा एड्वर्ड,** आणि **दुसरा रिचर्ड,** ह्यांच्या **"प्रेम्युनायर"**च्या कायद्यांचें (२००, २११ हीं पृष्ठें पहा) **हेन्री**ला स्मरण दिलें. त्या कायद्यांनीं, जे लोक **रोम**च्या दरबाराचा अधिकार मध्यें आणून राजाला किंवा त्याच्या राज्याला आडवे येत ते सर्व लोक विस्तापहाराच्या आणि कैदेच्या शिक्षेला पात्र होत असत. **वूल्सीनें पोपा**च्या लेगेटचा (वकिलाचा) अधिकार आ-

टामस क्राम्वेल ह्याचा राज्यकारभार, १५३०–१५४०.

पणच चालवून हा बहुशः विस्मृतींत पडलेला कायदा मोडलेला होता, आणि ती गोष्ट राजाच्या परवानगीनेंच झालेली होती तरी, आतां त्या **कार्डिनलावरच**, तो कायदा मोडल्याचा दोष ठेवला, आणि धर्मोपदेशकांनीं त्याला अनुसरून वर्तन केलेलें होतें म्हणून, त्याच्या मृत्यूनंतर, त्या सर्वांवरही त्याच दोषाचा आरोप केला. तेव्हां आपल्या प्राप्तींना मुकून आपण तुरुंगांत पडतों कीं काय अशी त्या धर्मोपदेशकांना धास्ती पडली, आणि ते फसून सांपळ्यांत पडले. त्यांनीं राजापासून क्षमा मागण्याकरितां एक अर्ज पाठविला त्यांत, **क्राम्वेल्लानें** त्यांकडून **हेन्रीला "धर्माचा संरक्षक आणि एकच सर्वश्रेष्ठ अधिकारी"** म्हणविलें. जान राजाच्या काळापासून **पोप** ज्या त्या कामांत हात घालूं लागल्यामुळें

हेन्रीला धर्माचा सर्वश्रेष्ठ अधिकारी ठरविलें, १५३५.

पार्लमेंट तडफडतच होतें. त्यानें तदनंतर १५३३–१५३४ त दोन वेगळाले कायदे केले. त्या कायद्यांनीं **पोपाचा इंग्लंडांतील** अधिकार तमाम नाहींसा केला, आणि धर्माधिकाऱ्यांनीं त्यापुढें **पोपाला "आन्नेट्स,"** म्हणजे त्यांच्या वृत्तींचें पहिल्या सालचें उत्पन्न, देतां कामा नये अशी मनाई केली. धर्माधिकाऱ्यांनींही, आपल्या पक्षीं, **कान्व्होकेशनामध्यें** (धर्माधिकाऱ्यांच्या मंडलामध्यें) धर्माधिकार प्रकरणीं कायदे करण्याचा हक्क त्यांना होता तो सोडून दिला. ह्याप्रकारें **इंग्लंडांतील पोपाच्या** सत्तेची समाप्ति झाली. पुढें १५३५ त, **"आक्ट आफ् सुप्रेमसी"** (धर्म प्रकरणांत सर्वश्रेष्ठाधिकारसंबंधी कायदा) नांवाचा एक कायदा केला, त्यांत **हेन्रीला "धर्मप्रकरणीं सर्वश्रेष्ठाधिकारी** केलें; आणि **पार्लमेंटा**सहवर्तमान राजा, तेव्हांपा-

सून, कोणाही परदेशीयाच्या इतल्ल्याबांचून, **धर्मप्रकरणीं** सर्व गोष्टींचा निर्णय करीत आला आहे.

मध्यावसरांत, **हेन्री** आपला विवाहसंबंध तोडण्याची तजवीज पुढें चालविण्यास समर्थ झाला. **क्रान्मर** नांवाचा **केंब्रिज** एथील युनिव्हर्सिटींतला पंडित, ह्यानें ह्यापूर्वीच राजाचा पक्ष स्वीकारलेला होता, त्याला **कांटर्बरी**चा **आर्चबिशप** केलेलें होतें. त्यानें बिशपांच्या एका मंडलाच्या साहाय्यानें, **कथरिनशीं** झालेला राजाचा विवाह रद्द ठरविला. १५३३ त **हेन्रीनें आन बुलिन** हिच्याशीं लग्न केलें, आणि त्याच सालच्या सेप्टेंबर महिन्यांत **राजपुत्री एलिझाबेथ** हिचें जन्म झालें.

काथरिनशीं विवाहसंबंध तोडून आन बुलिनशीं विवाह होतो, १५३३.

वूल्सीच्या दाबांतून मुक्त होऊन, **धर्म** व राज्य ह्यांचा कुलमुखत्यार बनलेला **हेन्री** हा, ह्या वेळेपासून आपली जातीची इच्छा, आणि **क्राम्वेल्ल**ची प्रेरणा ह्या दोहोंना अनुसरून वागूं लागला. तो **क्राम्वेल्ल** कठोर, निग्रही, पुरुष होता, आणि राजाचा अधिकार वाढविण्याविषयीं तो काळजी बागवीत होता. **क्राम्वेल्लानें** सर्व राज्यभर हेर ठेवलेले होते, आणि जो कोणी त्याला आड येई त्याला त्याकडून माफी मिळत नसे. तथापि इतकें सांगणें रास्त आहे कीं, देशांतल्या राज्यकारभाराला तो वाहिलेला होता, आणि **वूल्सी**सारखें त्यानें आपल्याला श्रीमंत देखील करून घेतलें नाहीं. त्याच्याच अमलांत, **वेल्स**चा **इंग्लंडा**शीं शेवटीं पुरा संयोग झाला. त्या देशाला **इंग्लिश** कायदे लागू करून **इंग्लिश** लोकांसारखें स्वातंत्र्य दिलें. परंतु दुसऱ्या पक्षीं, हाइ ट्रीझन, म्हणजे घोर राजद्रोह, ह्या अपराधाचा

वेल्स देश इंग्लिश कायद्यांखालीं येतो, १५३६.

आरोप ज्या माणसांवर ठेवला असेल, त्या मनुष्यांचें आपल्या बचावाकरितां बोलणें ऐकून घेण्याची देखील मनाई करणारा, असा जो अपकीर्तिकारक कायदा, तो करविणारा तोच पुरुष होता.

हाइ ट्रीझनचा कायदा.

विचित्र गोष्ट सांगावयाची ती ही कीं, जेव्हां त्याचीच उचलबांगडी झाली, तेव्हां ह्या कायद्यापासून पहिलें नुकसान त्याचेंच झालें.

हेन्रीचें नवें लग्न झालेलें प्रसिद्ध होतांच, दोन **आक्ट** (कायदे) केले. त्यांतील एकानें **राजपुत्री मेरी** हिला एकीकडे सारून **आन**च्या मुलांना गादी मिळावी असें ठरविलें; आणि दुसऱ्यानें, **आक्ट आफ् सुप्रेमसी** (सर्वश्रेष्ठाधिकारसंबंधी कायदा) हा कायदा अमान्य करणें हें राजद्रोहाचा गुन्हा करणें होय असें ठरविलें. हे दोनही कायदे मला मान्य आहेत अशी कोणाही माणसाला शपथ घेण्यास कोणत्याही वेळेस पाचारण होण्याचा संभव होता, म्हणून पुष्कळांना आपल्या अंतःकरणाखातर क्लेश, किंबहुना, देहांतदंड भोगावे लागले. पहिल्यानें ज्या लोकांवर हा प्रसंग गुदरला त्यांमध्यें, **हेन्री**चा सर्वोत्तम मित्र आणि मंत्री, **सर टामस मोर,** हा एक होता. त्याची सचोटी, आणि विद्वत्ता, आणि साधा, प्रामाणिक, स्वभाव, ह्यांकरितां लोक त्याला फार मानीत. तथापि, ते कायदे मला मान्य आहेत अशी शपथ घेण्याकरितां, राजानें त्याला इतकी सख्त निकड लावली कीं, तो विवाहसंबंधभंग, किंवा तो सिद्धीस नेण्याचा प्रकार, मला पसंत वाटला नाहीं असें त्याला कबूल करणें भाग आलें. तो आणि **राचेस्टर**चा **बिशप, फिशर,** ह्या उभयतांना **टौअर**मध्यें पाठवून त्यांचा शिरच्छेद केला. **मोर** जसा सुखासमाधानानें जन्मभर राहिला होता, तसाच सुखासमाधानानें

सर टामस मोर.

तो मेला. शिरच्छेदाकरितां माचोळी केली होती, तिला लावलेली शिडी, वर चढतांना लटलटूं लागली, तेव्हां तो **टौअर**च्या गव्हर्नराला (सुभेदाराला) म्हणाला, "मला वर सुरक्षित पावलेला पहा, खालीं येतांना माझा मी आपल्याला संभाळीन." ठोकळ्यावर मान ठेवतांना त्यानें आपली दाढी एका बाजूस सारली. नंतर तो म्हणाला, ज्या "बेट्या शिरानें राजद्रोह केला नाहीं तें कापलें जातें ह्या गोष्टीची कींव वाटते."

लोकांची स्थिति.

इंग्लंडाला हा काळ दुःखाचा होता, कारण हरएक गोष्ट अस्थिर होती. मागल्या कांहीं दिवसांपासून गोरगरीब लोक हाल भोगीत होते. प्राचीन बडे लोकांच्या जमिनी ज्या नव्या लोकांनीं घेतल्या होत्या, त्या लोकांना, त्या जमिनींवर धान्य पिकवून पैसा व्हावयाचा, त्याहून मेंढरें चारून ज्यास्त पैसा उत्पन्न करतां येई, म्हणून, पूर्वींहून लागवडी खालीं जमीन थोडी असे, आणि त्यामुळें मजूर पूर्वीपेक्षां थोडे कामाला लावीत. पुष्कळ धारेकरी आणि मजूर ह्यांना घरादारांतून काढून दिलें; गांवच्या समाईक गायरानांत त्यांचीं जनावरें चरत, त्या जमिनीपैकीं पुष्कळ जमीन श्रीमंत लोकांच्या हितासाठीं आतां आवारें घालून कुडून टाकली. ह्या लोकांखेरीज, प्राचीन बडे लोकांच्या पदरचीं माणसें चाकऱ्या जाऊन बेरोजगार झालीं, त्यामुळें भणंग भिकारी आणि उनाड लोकांचा समुदाय फार वाढला. इतका कीं, पुष्कळ माणसें चोऱ्या आणि खून करून पोटाला मिळवूं लागलीं.

ह्यांत भरीला, माणसांचीं मनें धर्माविषयीं फार अस्थिर किंवा चंचल झालीं. जुनीं बंधनें तुटलीं, आणि नवीं बंधनें अजून तयार झालीं नव्हतीं. **जर्मनींत** आणि **स्विट्झर्लंडांत** त्या काळीं ज्या मोठमोठ्या गोष्टी घडत होत्या त्यांनीं, **इंग्लंडांतील** लोकांत फार

गडबड उडाली होती. **जर्मनींत** आणि **स्विट्झर्लंडांत, लूथर,** आणि त्याचा सहधर्मसुधारक, **झ्वुइंग्ली,** हे, **पोपानें** आणि धर्माधिकाऱ्यांनीं केलेल्या पुष्कळ गोष्टी (प्रोटेस्टिंग अगेन्स्ट) म्हणजे आम्हांला मान्य नाहींत म्हणून त्या गोष्टींचा प्रतिज्ञापूर्वक निषेध करीत होते, आणि धर्माधिकाऱ्यांनीं केलेल्या बोधाबदली **बाइबल** (ख्रिस्ती धर्मपुस्तक)च मार्गप्रदर्शक म्हणून स्वीकारूं लागले. ह्या नवीन धर्मोपदेशाला अनुसरून जे लोक वागूं लागले त्यांना १५२९ त पहिल्यानेंच **प्राटेस्टंट्स** (रोमनक्याथलिक मताला अमान्य ख्रिस्ती) असें म्हणूं लागले, आणि त्या लोकांमध्यें पुष्कळ **जर्मन** राजे होत. आतां तो सुधारलेला धर्म **इंग्लंडांत** आणण्याची **हेन्रीला** इच्छा नव्हती, कारण त्यानें स्वतः उत्तर देऊन **लूथराचें** खंडण केलेलें होतें. परंतु त्यानें **पोपाचा** आपणावरील अधिकार झुगारून देऊन, त्यानेंच न समजतां, एक मोठी चळवळ चालू केली होती, आणि ती त्याच्यानें बंद करवली नाहीं. त्यानें **क्राम्वेल्ल** आणि **क्रान्मर** ह्यांच्या देखरेखीखालीं एक धर्मतत्त्वावलि तयार करविली, मूर्ति, आणि साधु पुरुषांच्या शवांचे अवशिष्टांश, ह्यांची पूजा बंद केली, आणि **माइल्स काव्हर्डेल** ह्यानें शोधून दुरुस्त केलेलें **टिन्डेल** ह्यानें केलेलें **बाइबलाचें** (ख्रिस्ती धर्मपुस्तकाचें) भाषांतर छापवून तें सर्व देवळांत ठेवविलें. ह्या फेरफारांनीं नवीन विद्येचे मित्र (भक्त), आणि **वुइक्लिफ** आणि **लॉलर्ड्स** ह्यांचे उपदेश ज्यांना स्मरत होते ते, संतोष पावले; आणि त्या योगें, **क्राम्वेल्लाच्या** मनांत एक बेत होता तो सिद्धीस नेण्यास, आणि मानस्टरिझ (मठ) मोडून टाकण्यास त्या **क्राम्वेल्लाला** मार्ग सोपा झाला.

लूथर आणि झ्वुइंग्ली.

इंग्लंडांतील धर्मसंबंधीं फेरफार.